नोव्हेंबर २०१५ / पाने ६८ / किंमत ₹१०

# लोकराज्य



# वचनपूर्ती




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाची सूत्रे हाती घेतल्यावर इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणार असल्याचे वचन राज्यातील जनतेला दिले होते. सरकारचे एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच इंदू मिलची जमीन स्मारकासाठी हस्तांतरीत करून घेण्यास मुख्यमंत्र्यांना यश आले. ११ ऑक्टोबर २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या स्मारकाचे भूमिपूजन करून त्यांनी वचनपूर्ती केली.



इंदू मिलच्या जागेवर होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाचे संकल्पचित्र

वर्ष ६७ वे | अंक ५ | नोव्हेंबर २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — संतोष सुतार

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in




## अंतरंग

गतिमान परिवर्तन (मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस)....६
नव्या सुधारणा, उपयुक्त बदल (श्री. एकनाथराव खडसे, महसूल मंत्री)....१२
पुन्हा आघाडीवर (श्री. सुभाष देसाई, उद्योगमंत्री)....१६
अर्थ विकासाला नवे समाजभान (श्री. सुधीर मुनगंटीवार, वित्त व वनमंत्री)....२०
सुरक्षित आणि गतिमान (श्री. दिवाकर रावते, परिवहन मंत्री)....२४
चैतन्य शिक्षणातले... (श्री. विनोद तावडे, शिक्षणमंत्री)....२६
हरित पर्यावरण, हरित महाराष्ट्र (श्री. रामदास कदम, पर्यावरण मंत्री)....३०
घरकूल हक्काचे (श्री. प्रकाश महेता, गृहनिर्माण मंत्री)....३२
स्मार्ट शहरांसाठी सुंदर रस्ते (श्री. एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री)....३४
समृद्धीचे महामार्ग (श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, सहकार मंत्री)....३६
सुदृढ आणि निरोगी (डॉ. दीपक सावंत, सार्वजनिक आरोग्यमंत्री)....३८
गाव समृद्धी ते जलसमृद्धी (श्रीमती. पंकजा मुंडे, ग्रामविकास मंत्री)....४०
नवी दिशा, नवा विश्वास (श्री. विष्णू सवरा, आदिवासी विकास मंत्री)....४४
स्वस्त आणि मुबलक (श्री. गिरीश बापट, अन्न व नागरी पुरवठा मंत्री)....४६
जलसाठ्यात वाढ, सिंचनात वृद्धी (श्री. गिरीष महाजन, जलसंपदा मंत्री)....४८
शाश्वत ऊर्जा, मुबलक वीज (श्री. चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जामंत्री)....५०
घरात शौचालय दारात पाणी... (श्री. बबनराव लोणीकर, पाणीपुरवठा मंत्री)....५२
समतेच्या दिशेने (श्री. राजकुमार बडोले, सामाजिक न्यायमंत्री)....५४

### राज्यमंत्री


नव्या आशा (श्री. दिलीप कांबळे)....५६
लोकाभिमुख (श्री. संजय राठोड)....५६
समर्थ आणि सक्षम (श्रीमती. विद्या ठाकूर)....५७
सहकाराचा आधार (श्री. दादाजी भुसे)....५७
सुरक्षिततेला प्राधान्य (श्री. राम शिंदे)....५८
सिंचन समृद्धी (श्री. विजय शिवतारे)....५८
कामगारांना दिलासा (श्री. विजय देशमुख)....५९
सर्वसमावेशक विकास (श्री. दीपक केसरकर)....५९
सक्षमीकरण (श्री. राजे अम्ब्रीशराव राजे सत्यवानराव अत्राम)....६०
सुधारणा आणि नावीन्य (श्री. रविंद्र वायकर)....६०
कौशल्य आणि सुविधा (डॉ. रणजित पाटील)....६१
पारदर्शक कारभार (श्री. प्रवीण पोटे पाटील)....६१

एक वर्ष महासंचालनालयाचे : गतिमान आणि स्मार्ट

### स्वच्छ महाराष्ट्राची प्रतिमा

राज्याच्या विकासाचा आरसा, स्वच्छ महाराष्ट्राची प्रतिमा म्हणजे लोकराज्य. शासन निर्णय, विशेषवृत्त, योजनांच्या माहितीसोबतच विविधांगी माहितीचा वारसा म्हणजे लोकराज्य. प्रत्येक अंकाप्रमाणे ऑगस्टचाही अंक खूप आवडला. स्वच्छ महाराष्ट्राच्या दिशेने सुरू असलेली यशस्वी वाटचाल या अंकातील यशकथांतून अधोरेखित होते. त्यासोबत मुख्यमंत्र्यांच्या दुष्काळग्रस्त भागातील दौऱ्याचे सविस्तर वृत्तांकन आवडले. ग्रामीण भागातील तीन स्वच्छता दूतांचा सन्मान व ओळखही भावली. यातून स्वच्छतेविषयीच्या जाणीवा प्रगल्भ होण्यात मदत होईल. शिवाय इतर सदरे नेहमीप्रमाणेच माहितीपूर्ण आणि वाचनीय आहेत.

**– अंकिता गावंडे, दाताळा, बुलडाणा**




### मोठे संदर्भमूल्य

सप्टेंबर २०१५ चा अंक वाघासारखा होता. राज्यात वाघाचे संवर्धन करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ठोस पावले उचलून उत्कृष्ट कार्य केले आहे. वाघ संवर्धनाबाबतचा लेख आवडला. इतर सदरे माहितीपूर्ण असल्याने अंकाचे संदर्भमूल्य अधिक आहे.


**– दीपक सातोरे, नांदेड**




### सर्वांगसुंदर

उत्तम छपाई, मुखपृष्ठ आणि आतील छायाचित्रे हे लोकराज्यचे मुख्य आकर्षण आहे. अंतरंगातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घडामोडी, विज्ञान जगत, उद्योग जगत अशा विविध विषयांच्या माहितीपूर्ण सदरांमुळे लोकराज्यची उपयुक्तता कळून येते. मी लोकराज्यचे अंक संग्रही ठेवले आहेत. सप्टेंबर २०१५ चा अंक आवडला. लोकराज्यला हार्दिक शुभेच्छा.

**– डॉ. अनंत चौधरी, कोतवाली वार्ड, चंद्रपूर**




### मुख्यमंत्र्यांचा लेख आवडला

लोकराज्यचा ऑगस्ट २०१५ चा अंक आवडला. शासकीय योजना, निर्णय, मुलाखती, स्पर्धा परीक्षेविषयी मार्गदर्शन, पर्यटन, संस्कृती, आरोग्य आदींविषयी माहितीचा खजिना उत्कृष्ट छपाईसह नाममात्र दरात वाचकांना उपलब्ध करून देणारे लोकराज्य हे एकमेव मासिक आहे. मुख्यमंत्र्यांनी लिहिलेला 'स्वच्छता हाच स्मार्ट शहरांचा आधार' हा लेख आवडला.

**– चंदन कुमावत, औरंगाबाद**

### विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त


लोकराज्य मासिकामधून महत्त्वपूर्ण माहिती प्रसिद्ध होते. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी मासिक फार मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरत आहे. मासिकामधून भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मनोगत वाचून इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते, अभ्यास करण्यासाठी उभारी मिळते. हे मासिक सर्वांसाठी फारच उपयुक्त आहे.

**– धनश्री कायंदे, सरपंच, रुम्हणा, जि. बुलडाणा.**

### प्रेरणादायी

लोकराज्यचा मी नियमित वाचक आहे. हे मासिक आम्हा विद्यार्थिमित्रांना प्रेरणा देणारे आहे. प्रेरणा सदराच्या माध्यमातून आम्हाला अधिकारी कसा घडतो, याचे मार्गदर्शन मिळते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवलेल्या युवकांचा प्रेरणादायी प्रवास आम्हाला प्रेरणा देऊन जातो. त्यांनी परीक्षेसाठी केलेला खडतर प्रवास, पचवलेले अपयश, नियोजन हे सर्व त्यांच्याच शब्दात वाचायला मिळत असल्याने नवस्फूर्ती जागृत होते.

**– तुकाराम ठोंबरे, रामनगर, जालना**




### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# पर्व गतिमानतेचे .... पर्व सुशासनाचे

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला ३१ ऑक्टोबर २०१५ रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. या कालावधीत मुख्यमंत्र्यांनी कार्यक्षम, लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासनावर भर देऊन सुशासनाचे नवे पर्व सुरू केले.

महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. विविध योजना कार्यान्वित केल्या गेल्या. या कालावधीत जलयुक्त शिवार, मेक इन महाराष्ट्र, आपले सरकार, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, लोकसेवा हक्क विधेयक या काही योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली.

गेल्या वर्षभरात जलयुक्त शिवार योजनेवर मुख्यमंत्र्यांनी विशेष भर दिला. ६२०० गावात हे अभियान राबवण्यात आले. त्यामुळे २४.५९ टीएमसी जलसंचय क्षमता निर्माण झाली. यामुळे ६ लाख हेक्टर क्षेत्रासाठी सिंचन उपलब्ध होऊ शकते. परंपरागत पद्धतीने या कामासाठी ७ हजार ३०० कोटी रुपये खर्च आला असता पण लोकसहभागातून गतिमान पद्धतीने केलेल्या अंमलबजावणीमुळे या कामांसाठी फक्त १४०० कोटी रुपये खर्च आला.

महाराष्ट्राचा औद्योगिक विकास आणि गुंतवणुकीसाठी 'मेक इन महाराष्ट्र' हा उपक्रम राबवला जात आहे. गेल्या वर्षभरात महाराष्ट्रात अंदाजित १ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले असून यामुळे १ लाख रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.

या योजनांशिवाय स्मार्ट सिटी, मुंबई-नागपूर-पुणे मेट्रो प्रकल्प, सागरी रस्ता, नागपूर-मुंबई द्रुतगती मार्ग, आदी महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी नुकतेच इंदू मिल परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाचे भूमिपूजन केले. यावेळी त्यांनी महू (मध्य प्रदेश) येथील बाबासाहेबांचे जन्मस्थळ, दिल्ली येथील त्यांचे वास्तव्य राहिलेले ठिकाण, रत्नागिरी जिल्ह्यातील आंबेगाव, इंदू मिल येथील स्मारक, लंडन येथील बाबासाहेबांचे वास्तव्य असलेले घर या पाच वास्तूंना स्मारकाचा दर्जा देऊन त्यांचा 'पंचतीर्थ' म्हणून विकास करण्याची घोषणा केली. ही बाब महाराष्ट्रासाठी अभिमान आणि आनंदाची आहे.

मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली सिंहस्थ कुंभमेळ्याचे अत्यंत देखणे, नेटके व प्रभावी आयोजन करण्यात आले याची देशविदेश पातळीवर दखल घेतली गेली.

शासनाच्या गेल्या वर्षभरातील या आणि अशा विविध महत्त्वाच्या विषयांची माहिती वर्षपूर्तीच्या या अंकात आम्ही समाविष्ट केली आहे.

शासनाची प्रत्येक महत्त्वाची योजना आणि निर्णय गतीने व प्रभावीरीत्या पोहोचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची लोकराज्य, महाराष्ट्र अहेड, दिलखुलास (आकाशवाणी), जय महाराष्ट्र (दूरदर्शन), महान्यूज (वेब पोर्टल) ही माध्यमे गतिमानतेने कार्यरत होती.

हा अंक आमच्या वाचकांना आवडेल अशी आशा आहे. आमचे सर्व वाचक, विक्रेते आणि वर्गणीदार यांना दिवाळीच्या मन:पूर्वक शुभेच्छा.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**



# गतिमान परिवर्तन

**कुठल्याही सरकारची कामगिरी विचारात घ्यायची झाली, तर त्या सरकारने विशिष्ट कालावधीत काय केले, काय केले नाही, काय टाळले, सरकारची विकासाची दृष्टी कशी आहे, या बाबी महत्त्वाच्या ठरतात. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे राहते ते, सरकारने जनमानसात आपली विश्वसनीयता किती निर्माण केली आहे ते आणि जनसामान्यांना सरकारबाबत काय वाटते ते. या दोन्ही बाबी एकत्रित करून विद्यमान सरकारचे मूल्यमापन करायचे झाले तर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील युती शासनाला एक उत्तम शासन' असेच प्रशस्तिपत्र द्यावे लागते. एक उत्तम शासन महाराष्ट्राला देत अधिक उत्तमतेकडे वाटचाल करणारे हे सरकार आहे.**

**सुधीर पाठक**

वर्षभरापूर्वी हे शासन अस्तित्वात आले, त्या वेळची पार्श्वभूमी वेगळी होती. अनेक घोटाळ्यांनी या पूर्वीचे सरकार त्रस्त होते आणि संवादी सुरापेक्षा विसंवादी सूर जास्त प्रभावी होता. त्याचा फटका सत्ताधारी असणाऱ्या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांना लोकसभेत बसला होता, मात्र त्याचा कोणताही धडा त्या शासनाने घेतला नाही म्हणून महाराष्ट्रातही सत्तापरिवर्तन झाले.

देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी मुंबईला बॅ. वानखेडे स्टेडियमवर अतिशय थाटात झाला होता. त्यात पैशांची उधळण नव्हती, पण एक भव्यता होती. पहिल्यांदा आपल्या आवडत्या नेत्याचा शपथविधी बघायला हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित राहिले. त्या शपथविधी सोहळ्याने अनेकांची मने जिंकून घेतली. नाथाभाऊ म्हणजे एकनाथराव खडसे व सुधीरभाऊ मुनगंटीवार वगळता सगळेच नवीन होते. स्वत: मुख्यमंत्री झालेल्या फडणवीस यांनीही यापूर्वी मंत्रिपद सांभाळले नव्हते. पहिल्या



## पंतप्रधानांकडून कौतुक

**देशातील सिंचन क्षमता वाढवणे आवश्यक आहे. पावसावर शेती अवलंबून असल्याने शेतकऱ्याला दुष्काळाचा सामाना करावा लागतो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवार योजना यशस्वीरीत्या राबवण्यास सुरुवात केली आहे, त्यामुळे महाराष्ट्र भविष्यात दुष्काळावर मात करेल, असा मला विश्वास वाटतो. फक्त १४०० कोटी रुपये खर्च करून राज्यातील ६२०० गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून सिंचनाचे काम केले आहे. विशेष म्हणजे या योजनेसाठी ३०० कोटी रुपयांचा निधी लोकवर्गणीतून जमा झाला आहे ही अभिनंदनीय बाब आहे. अशाच पद्धतीने सिंचन क्षमता वाढवून महाराष्ट्र कृषी क्षेत्रात आघाडीवर राहून देशाला नवी दिशा देण्याचे काम करेल.**

**- पंतप्रधान नरेंद्र मोदी**




अधिवेशनात शिवसेना विरोधी पक्ष म्हणून बसली होती. ठाण्याचे एकनाथ शिंदे हे विरोधी पक्षनेते झाले होते. पण लवकरच शिवसेनेने आपली भूमिका बदलली आणि ते युतीचा एक महत्त्वाचा घटक झाले. विधानसभा व परिषदेत अनुक्रमे राधाकृष्ण विखे पाटील व धनंजय मुंडे हे विरोधी पक्षनेते झाले. विधान परिषदेचे सभापतीही बदलले गेले. राष्ट्रवादीचे रामराजे निंबाळकर यांनी ती जबाबदारी सांभाळली.

साधारणत: मान्सून चांगला बरसला की, या देशातील व प्रदेश सरकार समोरील बव्हंशी प्रश्न संपतात. पण यंदा मान्सून महाराष्ट्रावर रुसला होता. खूप ओढ देऊन विश्रांती घेत पाऊस आला. मराठवाडा–विदर्भातील काही भाग, खानदेश या ठिकाणी पावसाने परीक्षा घेतली. एकदा घेतलेली पेरणी मोडावी लागली. दुबार वा तिबार पेरणी करावी लागली. शेतकऱ्यांच्या समोरील प्रश्न गंभीर झाले. आधीच उद्ध्वस्त झालेला शेतकरी जरा कुठे सावरत होता, तो दुष्काळाच्या आवर्तात सापडला. विरोधी पक्षानेच नव्हे, तर सत्ताधारी युतीतील काहींनी 'कर्जमुक्ती करा' अशी मागणी सुरू केली. सरकारला दुष्काळाचे व पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचे गांभीर्य नाही, अशी

## मेक इन महाराष्ट्र




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यापासून राज्यातील समस्यांचे मूळ काय आहे हे ओळखून त्यावर ठोस उपाय करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. ज्याप्रमाणे शाश्वत शेतीसाठी पाण्याची उपलब्धता आवश्यक आहे हे ओळखून त्यांनी जलयुक्त शिवार योजना सुरू केली, त्याच पद्धतीने राज्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा, त्यांच्या हाताला काम मिळावे, नवे उद्योजक तयार व्हावे यासाठी मेक इन महाराष्ट्रचा नारा दिला. तो प्रत्यक्षात येण्यासाठी सर्व बाजूंनी प्रयत्न सुरू केले. राज्यातील साठ टक्के जनता अद्यापही शेतीवर अवलंबून आहे. शेतीवरचे हे अवलंबित्व कमी करायचे असल्यास, राज्यात उद्योगाने भरारी घेतली पाहिजे हे ओळखून त्यांनी पावले उचलायला सुरुवात केली. उद्योग सुरू करण्यासाठी लागणारे परवाने कमीत कमी कसे लागतील, जाचक पण अनावश्यक अशा अटी कशा रद्द करता येतील याकडे त्यांनी कटाक्षाने लक्ष दिले आहे. राज्यातून उद्योग बाहेर जाताहेत, की काय अशी परिस्थिती असतानाच, मुख्यमंत्र्यांनी राज्यातील उद्योगांच्या वाढीसाठी पूरक वातावरण निर्माण करून शिवाय देश–विदेशातील उद्योगांना राज्यात गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. त्याचाच एक परिणाम म्हणून आज राज्यात एक लाख कोटी रुपयांच्यावर गुंतवणूक होणार असून लाखो लोकांना यातून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या रोजगार उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या स्वित्झर्लंडमधील डाव्होस, जर्मनी, अमेरिका, चीन, इस्राएल या देशांच्या दौऱ्यात त्यांनी उद्योगांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास उद्युक्त केले. त्याचे परिणाम आता दिसत असून महाराष्ट्रात अनेक उद्योग मोठी गुंतवणूक करणार आहेत. लघु व मध्यम गटातील उद्योजकांसाठी विभाग स्तरावर कक्ष सुरू करण्यात येणार असून प्रत्येक महसूल विभागातील उद्योग सहसंचालक कार्यालयात एक कक्ष व समिती काम करणार आहे.

टीका सुरू झाली; पण हे सरकार विचलित झाले नाही. विरोधकांच्या बहिष्कारापुढेही झुकले नाही. विरोधकांनी सभागृहात यावे, यासाठी मन वळवले. त्याला यश आले आणि मग संपूर्ण महाराष्ट्राला व शेतकऱ्यांना मुख्यमंत्र्यांचे घणाघाती भाषण ऐकता आले. २० जुलै २०१५ ला झालेले भाषण गाजलेच होते. त्यात आक्रमकता होती. सहृदयता होती. महाराष्ट्राच्या विकासाची भावी दिशा होती. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांचे भले होणार नाही, तर शेतकऱ्यांना कर्ज देणाऱ्या बँका तेवढ्या तगतील. शेतकऱ्यांना या पूर्वीच्या कर्जमाफीमुळे कुठलाही फायदा मिळाला नाही, हे सत्य त्या दिवशी महाराष्ट्राला समजले. महाराष्ट्राला हेही समजले की, कर्जमाफी झाली तर जिथे पाणीटंचाई आहे, दुष्काळाची भीषणता आहे, त्या मराठवाड्याला फारसे काही मिळणार नाही तर सर्वाधिक पात्र शेतकरी पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांच्या भागातील असतील. त्यामुळे कर्जमाफीऐवजी शेतांना पाणी मिळेल असा जलसंधारणाचा 'जलयुक्तशिवार योजना' कार्यक्रम अग्रक्रमाने राबवला जाऊ लागला. ५-१० वर्षे हा कार्यक्रम प्रामाणिकपणे राबवला, तर महाराष्ट्र जलसंपन्न प्रदेश होऊ शकतो, याची जाण महाराष्ट्राला आली. आतापावेतो या क्षेत्रात महाराष्ट्राने केलेले काम सरकारचा गौरव वाढवणारे आहे. जलयुक्तशिवार योजनेसाठी पैसा कमी पडू देणार नाही, हे आश्वासन महाराष्ट्रातील जनतेला मिळाले व प्रत्यक्ष जलयुक्त शिवार योजनेचे कामही जनतेला बघायला मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सरकारचे व विशेषत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करून त्यांचा गौरव केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींबरोबर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री दाव्होस व चीनला गेले होते. अमेरिका, चीन, जपान येथून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आली व येत आहे. जवळ जवळ १ लाख युवकांना रोजगार मिळेल, अशी शक्यता निर्माण झाली आहे. शिवाय यातील अनेक प्रकल्पांचे भूमिपूजनही पार पडले आहे. मेट्रो रेल्वेचे प्रकल्प नागपूर, पुणे, मुंबईत सुरू होत आहेत. त्यांचे भूमिपूजनही झाले आहे. याशिवाय एम्स स्थापन होण्याची संख्या

## आपले सरकार

आपले सरकार या वेब पोर्टलच्या माध्यमातून जनतेला तक्रारी आणि अभिप्रायासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले असून या तक्रारींचे २१ दिवसात निराकरण होत आहे. मुख्यमंत्र्यांशी थेट संपर्क आणि संवादाचे हे माध्यम आहे. 'आपले सरकार'च्या माध्यमातून शासन आणि जनता यांचा थेट संवाद होत असून जनतेला आपल्या तक्रारी मांडण्यासाठी हे हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

सेवा हमी कायदा, तक्रार निवारण, माहितीचा अधिकार, सहयोग या चार विभागांमध्ये नागरिकांना अर्ज दाखल करता येतो. त्यानंतर नागरिकाला दाखल केलेल्या तक्रारीचा टोकन क्रमांक मिळतो. त्या क्रमांकाचा वापर करून तक्रारीची सद्य:स्थिती जाणून घेता येते.

या पोर्टलवर नागरिकांना आपल्या तक्रारी मोबाइल क्रमांक आणि ई-मेल चा वापर करून ऑनलाइन नोंदविता येतात. तक्रार ऑनलाइन दाखल झाल्यानंतर त्याची ई-पोच मिळत असून तक्रारीची सद्य:स्थिती जाणून घेता येते.

या वेबपोर्टलवर आता नुकताच सेवा हमी कायदा विभागही सुरू करण्यात आला असून पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्यासाठीचा हा क्रांतिकारी निर्णय आहे.



## शाश्वत सिंचन

गेल्या काही वर्षांपासून राज्यात पडत असलेल्या दुष्काळावर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना सरकारने राबवली आहे. जलसंधारणाच्या विविध सरकारी योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. येत्या पाच वर्षात २५ हजार गावांना पाणीटंचाईमुक्त करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संकल्प केला आहे. पहिल्या वर्षी ५ हजारांपेक्षा अधिक गावे या योजनेत सहभागी झाली आहेत. आता जलयुक्त शिवार ही लोकचळवळ झाली आहे. सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात या चळवळीत सहभागी होत आहेत. शाश्वत सिंचन-समृद्ध जीवन हे मुख्यमंत्र्यांचे स्वप्न आहे. गेली काही वर्षे राज्याला दुष्काळाला तोंड द्यावे लागल्याने पाण्याची परिस्थिती बिकट झाली होती. मूलभूत सोयीसुविधा उभारणे हाच पाण्याच्या समस्येवरचा तोडगा आहे, हे जाणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील २५००० दुष्काळी गावांना येत्या पाच वर्षात दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला. मराठवाड्याच्या आवर्षणप्रवण गावात या योजनेचा चांगला फायदा झाला आहे. जलयुक्त शिवार योजनेमुळे गावागावांतील नद्या वाहू लागल्या, तळी, विहिरी भरली आहेत.

## स्वच्छ महाराष्ट्र, सुंदर महाराष्ट्र





**स्वच्छ भारत मिशन प्रमाणेच राज्यात स्वच्छ महाराष्ट्र मिशन सुरू करण्यात आले आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील स्वच्छतेचे प्रश्न वेगवेगळे करून स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत देश स्वच्छ करण्याचा संकल्प केला आहे तर महाराष्ट्राला २०१८ पर्यंतच स्वच्छतेचा निर्धार करून या मोहिमेला मुख्यमंत्र्यांनी गती दिली आहे. त्याचे उत्तम परिणाम दिसू लागले असून आतापर्यंत १९ शहरे उघड्यावर शौचमुक्त बनली आहेत. तर अनेक गावे हागणदारीमुक्त झाली आहेत. स्वच्छता अभियानाचा मुख्य उद्देश उघड्यावरील शौचविधी बंद करणे, हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांना या कामातून मुक्ती, नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक व शास्त्रोक्त पद्धतीचा अवलंब, स्वच्छतेच्या चांगल्या पद्धतीच्या अनुषंगाने सवयींमध्ये बदल, स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करून त्याची सार्वजनिक आरोग्याशी सांगड घालणे आणि भांडवली खर्च, कार्यान्वयन आणि देखभाल यासाठी खाजगी संस्थांच्या सहभागासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करणे हा आहे. हे उद्देश डोळ्यासमोर ठेवून नगरपालिकांनी आपली वाटचाल करत संपूर्ण स्वच्छतेच्या दृष्टीने पावले टाकली आहेत.**




महाराष्ट्रात वाढली आहे. व्यवसाय व्यवस्थापन अभ्यासक्रम शिकवणाऱ्या आय.आय.एम.चा नागपूरला प्रारंभ झाला आहे. आतापावेतो महाराष्ट्रातील फक्त एका भागात होत असलेला विकास सर्वत्र पसरला आहे. अमरावती, नाशिक, सोलापूर, औरंगाबाद या ठिकाणी विविध प्रकल्प सुरू झाले आहेत. फक्त उद्योगधंदे व उद्योग आघाडीवरच महाराष्ट्रात प्रगती सुरू आहे असे नाही, तर सर्व आघाड्यांवर प्रगती सुरू आहे. मोठ्या प्रमाणावर आर्थिक संकटे समोर असतानाही सरकारने वास्तववादी भूमिका घेतली आहे. एल.बी.टी. रद्द झाला आहे. जकात थांबली आहे, तर काही मोजक्या वस्तूंवरील व्हॅट वाढवून उत्पन्न मिळवण्याचा प्रयास सुरू आहे. यातच शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा मिळणे हा भागही आहेच.

## राष्ट्रपुरुषांचा सन्मान

**गेल्या अनेक वर्षांपासून इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक करण्याची मागणी होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यापासून या स्मारकासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. त्याचमुळे इंदू मिलची जमीन राज्यसरकारकडे हस्तांतरित झाली आणि या जागेवर डॉ. आंबडेकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते या स्मारकाचे भूमिपूजन नुकतेच झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे १९२१-२२ या कालावधीत लंडनमध्ये असताना त्यांचे वास्तव्य असलेले घरही राज्य शासनाने खरेदी केले असून तेथेही आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाला केंद्रीय पर्यावरण विभागाची मान्यता मिळाली असून येत्या काही वर्षांत येथे एक भव्य आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यात येणार आहे.**



सामाजिक समरसतेच्या आघाडीवर या शासनाने लंडनला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य ज्या ठिकाणी होते, ती वास्तू विकत घेतली आहे. इंदू मिल परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक तयार होणार आहे, त्यांचा भूमिपूजन सोहळाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडला आणि संपूर्ण महाराष्ट्राला तो बघता आला. या समारंभात आंबेडकर विचारधारेला

## ऑपरेशन कायापालट

**राज्यातील आरोग्य चांगले राहावे, यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. ऑपरेशन कायापालटांतर्गत ग्रामीण रुग्णालयांचा चेहरामोहरा बदलत आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागावर राज्य सरकारने विशेष लक्ष देऊन, तेथील आरोग्य सेवा सुधारण्यावर भर दिला आहे. शिवआरोग्य योजनेंतर्गत मेळघाट, नंदुरबार, वाडा, मोखाडा, जव्हार व नाशिक जिल्ह्यातील दुर्गम भागातील रुग्णांना अत्याधुनिक आरोग्य सेवा पुरवण्यासाठी; टेलीमेडिसिन या अत्याधुनिक यंत्रणेद्वारे शहरातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केली जात आहे. ही सेवा संपूर्ण राज्यात लवकरच सुरू केली जाणार आहे. सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात रक्त उपलब्ध करून द्यावे म्हणून रक्ताच्या पिशवीचे दर रुपये १०५० वरून रुपये ८५० पर्यंत कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे केवळ पैसे नाहीत म्हणून कोणी रुग्ण दगावणार नाही. याबरोबरच थुंकी प्रतिबंध, हेल्थ मिनिस्टर ऑनलाइन, कम्युनिटी रेडिओ अशा विविध योजनांद्वारे राज्य शासन आरोग्य सेवेत सुधारणा घडवत आहे. ऑपरेशन कायापालटांतर्गत रुग्णालयीन स्वच्छता व सोयीसुविधांवर भर देण्याबरोबरच, तेथील नीटनेटकेपणा व सुशोभीकरणास प्राधान्य दिले आहे. रुग्णांकरिता सुसज्ज व स्वच्छ प्रतिक्षालयांचीही उभारणी होत आहे. रुग्णांना तत्काळ सेवा मिळावी, यासाठी १०८ ही सेवाही सुरु करण्यात आली आहे. या अंतर्गत आतापर्यंत ३ लाख ४६ हजार ४६२ प्रकरणे हाताळली आहेत. लंडन ॲम्ब्युलेन्स सर्व्हिसच्या धर्तीवर यामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.**


मानणाऱ्या सर्व रिपब्लिकन नेत्यांना आमंत्रित करून सरकारने राजकारणविरहित विचार करण्याचा एक चांगला पायंडा पाडला आहे.

राजकीय आघाडीवर बघायला गेले, तर निवडणूक जिंकण्याचा अभिक्रम सुरू आहे. चालू आहे. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांत, महापालिकेत युतीने घवघवीत यश मिळवले आहे. आता कल्याण–डोंबिवली आणि कोल्हापूर मनपाच्या निवडणुका समोर आहेत. महाराष्ट्रात 'टोल'चा प्रश्न उग्र झाला होता, नागरिकांना त्यातूनही काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

शासनाने हे दाखवून दिले आहे की, एकदा निर्णय घेतल्यावर शासन हातपाय गाळत तो निर्णय मागे घेत नाही. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याचा निर्णय उच्चस्तरीय समितीने घेतला. त्या विरोधात आंदोलनाचा पवित्रा काही व्यक्ती, पक्ष व संघटना यांनी घेतला, पण त्यापुढे न झुकता शासनाने हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केलाच; त्याचबरोबर साहित्य अकादमी पुरस्कार मिळविणाऱ्या प्रा. भालचंद्र नेमाडे यांचाही मुंबईला गेट वे ऑफ इंडियावर सत्कार झाला. तो कार्यक्रम फारच रेखीव होता.

आतापावेतो महाराष्ट्रात दोन विचारवंत, डॉ. नरेंद्र दाभोळकर व कोल्हापूरचे गोविंदराव पानसरे यांचे खून झाले. त्यांचे मारेकरी जुन्या शासन काळात मिळाले नाहीत, पण पानसरे यांच्या हत्येसंबंधात एकाला नुकतीच अटक करण्यात आली आहे. त्याची चौकशी सुरू आहे. मात्र त्यानिमित्त, ती व्यक्ती ज्या सनातन संस्थेची कार्यकर्ता आहे, त्या संस्थेवर बंदी घालण्यात यावी; ही मागणीही पुराव्यानंतरच विचारात घेतली जाईल, असे आश्वासन सरकारने दिले आहे.

या वर्षभरात सरकारवर काही राजकीय स्वरूपाचे आरोप झाले आहेत. त्यातून भ्रष्टाचार झाला आहे, असे ध्वनित करण्याचाही प्रयास झाला.



कोणत्याही राज्याची प्रगती व्हायची असेल तर त्यासाठी पायाभूत सुविधांवर भर देणे आवश्यक आहे. राज्यात गुंतवणूक वाढली पाहिजे, रोजगारनिर्मिती झाली पाहिजे या उद्देशाने मेक इन महाराष्ट्राची घोषणा करतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दळणवळणाच्या सुविधा वाढविण्यावर भर दिला आहे. मुंबई, नागपूर, पुणे येथील मेट्रो प्रकल्पांना गती मिळाली आहे. मुंबईतील कोस्टल रोडला केंद्रीय पर्यावरण खात्याची मंजुरी मिळाली आहे. बंदरांचा विकास होत आहे. मुंबई–नागपूर द्रुतगती

## पायाभूत सुविधा

**मार्गाचे काम मार्गी लागले आहे. मुंबई महानगर प्रदेशात वाहतूक व परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने मुंबई मेट्रो रेल व्यवस्थेकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिल्ली मेट्रो रेल महामंडळाची नेमणूक केली होती. प्राधिकरणाच्या बैठकीत मुंबई मेट्रोच्या बृहत आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. या आराखड्यात ९ मेट्रो रेल्वे मार्ग असून एकूण लांबी १७२ कि. मी. आहे. त्यापैकी ३२.५० कि. मी. प्रस्तावित भुयारी मार्ग आहे तर बाकीचा उन्नत मेट्रो रेल मार्ग आहेत. अंधेरी (पूर्व) ते मानखुर्द व्हाया घाटकोपर (पनवेल पर्यंत विस्तारित) या ४६ कि.मी. जलदगती मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल पूर्ण झाला असून या मार्गामुळे छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि प्रस्तावित नवी मुंबई आतंरराष्ट्रीय विमानतळ जोडले जाणार आहेत. त्याचबरोबर मुंबई शहरातील वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी नरिमन पॉइंट ते कांदिवलीपर्यंत ३४ कि.मी. लांबीचा सागरी किनारा रस्ता मुंबई महानगरपालिकेतर्फे बांधण्यात येणार असून या रस्त्यावर वाहतुकीचे नियमन सुरळीत होण्याकरिता १२ ठिकाणी प्रवेश व निर्गमनासाठी जोड रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत.**

शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या पदवीबाबत आक्षेप घेतला गेला. त्यांनी कधीही आपण भरपूर पैसे देऊन प्रतिष्ठित महाविद्यालयातून पदवी घेतली, असे म्हटले नव्हते. उलट प्रयोगशील असणाऱ्या व त्या वेळी मान्यता असणाऱ्या ज्ञानेश्वर विद्यापीठातून त्यांनी पदवी घेतली होती. ते दहावी-बारावीही पास नाहीत, असा जावईशोध काही विरोधकांनी लावला होता. पण तो बार फुसका निघाला, तर चिक्की खरेदीही अशीच गाजवली गेली होती पण वर्षभरात एकाही बाबतीत भ्रष्टाचाराचा सिद्ध होऊ शकणारा आरोप झाला नाही, हेही या सरकारचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

मंत्रिमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:कडे गृहखाते ठेवले, हे अनेक राजकारण्यांना, राजकीय पक्षांना व माध्यमातील काही मंडळींनाही फारसे रुचले नाही. त्यामुळे गृहमंत्री या नात्याने मुख्यमंत्री किती अपयशी आहेत, हे दाखविण्याची स्पर्धा माध्यमांमध्ये लागली होती.

जणू काही मुख्यमंत्री-गृहमंत्री होण्यापूर्वी उपराजधानीत एकही गुन्हा घडत नव्हता. असे गृहीत धरून टीकास्त्र सुरू झाले. नागपुरात एक जरी गुन्हा झाला वा एखादी गुन्हेगारी घटना घडली की माध्यमांचे सुरू होत असे- मुख्यमंत्र्यांच्या नागपुरात पोलिसांचा गुन्हेगारांवर वचकच उरला नाही, मुख्यमंत्र्यांना या गुन्ह्यांकडे बघायला वेळ नाही. मुख्यमंत्र्यांचे घर नागपुरात असणे व त्यांचा मतदारसंघ नागपुरात असणे हा जणू गुन्हा आहे, अशा थाटात टीका सुरू झाली. मध्यंतरी नागपूरच्या फुटाळा तलावावर एका मुलीने स्वत:ला जाळून घेतले व या घटनेनंतर दोन-तीन तासांनी एका व्यक्तीने त्याच तलावात आत्महत्या केली. वास्तविक या दोन्ही घटना पूर्णपणे भिन्न होत्या- त्याचा परस्परांशी नाममात्रही संबंध नव्हता. पण त्या मुलीला जाळण्यात आले व त्यानंतर पश्चात्ताप होऊन एका युवकाने आत्महत्या केली, अशा बातम्या माध्यमांत झळकल्या आहेत. पोलिसांना तपासानंतर आढळले की, वस्तुस्थिती वेगळीच आहे. त्या मुलीला जाळण्यात आले नव्हते, तर तिने स्वत: आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर तात्या टोपे नगरात श्रीमती वसुंधरा बाळ यांची हत्या झाली. सकाळी मुलगा व सून नोकरीवर गेल्यानंतर त्या व त्यांची दहा महिन्यांची नात दोघीच घरी होत्या. सकाळी ९ ते १० या वेळात त्यांची हत्या झाली. घरातील सर्व वस्तू, किमती ऐवज, पैसाअडका वा त्यांच्या अंगावरील दागिनेही कायम होते. मोलकरीण घरात आल्यावर तिला हा प्रकार समजला आणि तिने शेजाऱ्यांना व त्यांनी पोलिसांना कळवले. त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा लावलेला होता. त्यातून तपास सुरू आहे. एक बाब नक्की आहे की चोरी, दरोडा यासारख्या इराद्याने हा खून झालेला नाही. पोलिसांनी अवघ्या एका दिवसात ४० जणांची चौकशी केली आहे. पण अजून तपास लागलेला नाही. प्रा. मल्हारी म्हस्के यांची गाडी जाळल्यावर, गुन्ह्याची तक्रार झाल्यावर त्या पदाधिकाऱ्याला भाजपाने तिसऱ्या दिवशी पक्षातून काढून टाकले. त्या उपाध्यक्षाचे आई-वडील, भाऊ व त्या पदाधिकाऱ्यालाही अटक झाली आहे. माध्यमांनी त्या प्रकरणीही भरपूर टीका केली.




माध्यमांना टीकेसाठी चविष्ट खाद्य मिळाले, पण सामान्य जनतेला मात्र प्रत्येक घटनेत मुख्यमंत्र्यांना खेचणे, या प्रकाराबाबत त्यांच्याविषयी सहानुभूती वाटू लागली आहे. या सहानुभूतीमुळे जनता अशा घटनांत मुख्यमंत्री तसेच गृहमंत्री यांना दोषी मानत नाही.

मुख्यमंत्र्यांच्या गावात पोलिसांनी तपासात दिरंगाई केली, वेळ गमावला, तडफेने काम केले नाही, अशी एकही तक्रार झालेली नाही. मध्यंतरी घसरलेला गुन्हे तपास आलेख वाढला आहे. शिक्षा होण्याचे प्रमाणही वाढले आहे. एक मात्र सत्य आहे, संपूर्ण महाराष्ट्रात जेवढ्या प्रमाणात कायदे मोडणारे नागरिक आहेत, तेवढेच प्रमाण नागपूरला आहे. वाहतुकीचे नियम मोडण्यात या नगरीतील प्रौढ, महिला, तरुण, मुले-मुली तेवढ्याच प्रमाणात आघाडीवर आहेत. राजकारणात जे भ्रष्टाचारी, गैरव्यवहार करणारे होते, त्यांच्या विरुद्ध पाश आवळण्यास सरकारने मागे पुढे बघितले नाही. राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ व परिवार, सुनील तटकरे आणि अजितदादा पवार यांच्या विरोधात लाचलुचपत खात्याने तपास वेगाने सुरू केला आहे. संबंधितांना समन्सही पाठवले आहेत. या कारवाईमुळे 'राजकीय क्षेत्रातही हे सरकार सत्तेसाठी तडजोड करणारे नाही, तर योग्य व कायद्याने व्हायची गोष्टच तेवढी करेल' हा विश्वास जागृत झाला आहे.

## सेवा हमी

**कार्यक्षमता आणि पारदर्शकता ही दोन्ही उत्तम प्रशासनाची महत्त्वाची लक्षणे असली तरी बहुतेक वेळा कार्यक्षम प्रशासन पारदर्शी असत नाही आणि पारदर्शी सरकार कार्यक्षम असेलच असे नाही, असे आपल्या पहिल्या पत्रकार परिषदेत सांगणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सेवा हमीसाठी 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क विधेयक' आणण्याचे आपले वचन पाळले. उत्तरदायी, गतिमान, पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी राज्य सरकारने या विधेयकाच्या माध्यमातून क्रांतिकारी पाऊल टाकले आहे. यामुळे शासनाच्या विविध विभागांच्या ११० प्रकारच्या सेवा निश्चित कालावधीत प्राप्त करण्याचा अधिकार नागरिकांना मिळाला आहे. नागरिकांना सेवा प्राप्त करण्यासाठी वेगवेगळ्या कार्यालयाला भेटी द्याव्या लागू नयेत, यासाठी आपले सरकार वेबपोर्टलवर या सेवा ऑनलाइन केल्या आहेत.**



**(लेखक हे ज्येष्ठ पत्रकार आणि राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य आहेत.)**
**संपर्क : ०८८८८३९७७२७**

# नव्या सुधारणा, उपयुक्त बदल...



**गेल्या वर्षभरात शेतकरी बांधवांच्या कल्याणासाठी राज्यात कृषिक्षेत्रात अनेक बदल करण्याचा आम्ही प्रयत्न केला. सकारात्मक योजना तयार केल्या. मात्र लहरी हवामानाचा फटका गेल्या वर्षी कृषी क्षेत्राला बसला त्यातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी आम्ही तातडीची मदत केली. केंद्र शासनाच्या मदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांना चार हजार कोटी रुपयांची मदत वितरित केली तीही थेट त्यांच्या बँक खात्यात. महसूल, मदत व पुनर्वसन आणि अल्पसंख्याक विभागासाठीही गेल्या वर्षभरात महत्त्वाचे निर्णय घेऊन नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे.**

मला ३१ ऑक्टोबर २०१४ चा शपथविधीचा दिवस आठवतो. राज्यातील कोट्यवधी जनतेच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब असणारे आमचे सरकार साकारले जात होते. मावळत्या सूर्याला साक्षीला ठेऊन आम्ही महाराष्ट्रातील जनतेच्या शाश्वत विकासासाठी सज्ज झालो होतो. कृषी, महसूल, मदत व पुनर्वसन, पदुम, अल्पसंख्याक यांसारख्या महत्त्वाच्या आणि सामान्यांच्या आशाआकांक्षांशी निगडित विभागांची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. ती यशस्वीपणे पार पाडण्यासाठी गेल्या वर्षभरात मी प्रयत्नशील होतो. खरे म्हणजे एक वर्षाचा कालावधी हा काही सिंहावलोकानाचा किंवा मागे वळून पाहण्याचा निश्चितच नाही. तरीदेखील आम्ही गेल्या वर्षभरात राज्यातील शेतकरी, सामान्य नागरिक, समाजातील दुर्बल घटकांना न्याय देण्याचा त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडवण्याचा प्रयत्न करीत आहोत. गेल्या १५ वर्षांचा आणि आमच्या सरकारच्या एक वर्षाची तुलना नाही होऊ शकत. ह्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने मी राज्यातील तमाम नागरिकांना विश्वास देऊ इच्छितो की, त्यांना अपेक्षित असलेला राज्याच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**एकनाथराव खडसे**

(महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री)

मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भाचा काही भाग, पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याला सावरण्यासाठी आम्ही त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलो आहोत.

राज्याची सूत्रे हाती आल्यावर तातडीने आम्ही जलसिंचनाचा प्रश्न सोडवण्यासाठी आणि शेतकऱ्याला दुष्काळी परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी महत्त्वाकांक्षी अशी जलयुक्त शिवार योजना सुरू केली. वर्षभरात या योजनेला मिळालेला प्रतिसाद पाहता भविष्यात बळीराजाला दुष्काळाची झळ सहन करावी लागणार नाही, अशी मला खात्री वाटते.

बदलत्या लहरी हवामानामुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी बांधव नैराश्येने ग्रासला आहे. त्याला आत्महत्येसारख्या प्रवृत्तीपासून रोखण्यासाठी शासन सर्वतोपरीने प्रयत्न करीत आहे.

शेतकऱ्यांची कर्जातून मुक्ती करण्यासाठी नैसर्गिक आपत्तिग्रस्त शेतकऱ्यांच्या रूपांतरित पीक कर्जाच्या परतफेडीचा कालावधी ३ वर्षांवरून ५ वर्षे केला आहे. व्यापारी बँकांप्रमाणेच जिल्हा बँकांच्याही पीककर्जाचे व्याजासह रूपांतरणाचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा बँकेच्या ७७१ कोटी रुपयांच्या कर्जाचे रुपांतरण पूर्ण करण्यात आले आहे. शासनाकडून प्रथमच नाबार्डच्या ६० टक्के हिश्श्यासाठी ४६७ कोटींची शासन हमी आम्ही दिली आहे.

रूपांतरित कर्जावरील २०१५-१६ चे संपूर्ण व्याज तसेच त्यापुढील चार वर्षांचे ६ टक्के दराने व्याज सरकार देणार आहे.

शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा, आरोग्यसेवा, पाल्यांच्या शिक्षणासाठी साहाय्य करण्यासाठी विविध योजना प्रभावीरित्या राबवण्यात येत आहेत. शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांकडे विशेष लक्ष पुरवण्यासाठी, 'वसंतराव नाईक स्वाभिमान शेती मिशन'ची स्थापना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा अभ्यास असलेले ज्येष्ठ कार्यकर्ते किशोर तिवारी या मिशनचे अध्यक्ष आहेत. या मिशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आत्महत्येसारख्या प्रवृत्तीपासून रोखण्यासाठी, काय प्रयत्न केले पाहिजेत, यासाठी उपाययोजना करण्यास सहकार्य होणार आहे. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेंतर्गत सेवा पुरवणाऱ्या रुग्णालयांच्या संख्येत वाढ करण्यात येत आहे. त्याचबरोबर शेतकरी कुटुंबातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शुल्कमाफी देण्यात येत आहे.

अन्नसुरक्षा देण्यासाठी २ रूपयात गहू, ३ रूपयात तांदूळ या १४ जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत ६८ लाख शेतकरी कुटुंब लाभार्थी असून दरमहा प्रतिकुटुंब २० ते ३५ किलो धान्य वाटप केले जात आहे.

### निकषात बदल

दुष्काळी परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती यामध्ये होणाऱ्या नुकसानाची भरपाई देतानाच्या निकषात बदल केले आहेत. अतिवृष्टी, वादळ, गारपीट

## दृष्काळसदृश्य स्थिती जाहीर

राज्यातील १४,७०८ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केली. अशा गावांना दिलासा देण्यासाठी कृषी पंपाच्या चालू वीजबीलामध्ये ३३.५ टक्के सवलत, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ, जमीन महसुलात सूट, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकर्स आणि टंचाई जाहीर झालेल्या गावातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपाची वीज खंडित न करणे असे निर्णय घेण्यात आले आहेत. या उपाययोजनांसाठी गाव हा घटक मानण्यात येईल. कापूस तसेच सोयाबीन, मका, धान खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्यात येतील.

ज्या २५,३४५ गावांची नजर पैसेवारी ५० टक्क्यांवर आहे अशागावांमध्ये खरीपाच्या बाबतीत दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून उपाय योजनांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. ३१ ऑक्टोबर पर्यंतच्या सुधारीत पैसेवारीची वाट न पाहता तातडीने मदतीचे ज्ञापन (मेमोरंडम) केंद्राकडे पाठवण्यात येईल. केंद्रीय कृषी सचिवांसोबत मुख्य सचिव व इतर अधिकारी या अनुषंगाने चर्चा करतील. गाव हा घटक ठेवून उपाययोजना करण्यात येतील. आर्थिकदृष्ट्या मागास शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सवलत (ईबीसी सवलत) देण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा एक लाख रुपयांवरून अडीच लाख रुपये करण्यात येईल. वीज बिल न भरल्यामुळे बंद असलेल्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे देयक अदा करून त्या मार्गी लावण्यात येतील. वीजबिलांअभावी बंद असलेल्या योजनांबाबतचा अहवाल संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवण्यात येईल, बंद पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्तीसाठीचा निधी देण्याबाबत जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांनी असलेल्या अधिकाराचा वापर करून बंद पाणीपुरवठा योजना मार्गी लावाव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत.

अशा नैसर्गिक आपत्तीत नुकसान झाल्यास भरपाईसाठी असलेली ५० टक्के नुकसानीची अट आता ३३ टक्क्यांवर करण्यात आली आहे. १४ जिल्ह्यांमध्ये १० महिन्यात ४७,२७७ नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या असून जून २०१६ पर्यंत सर्व प्रलंबित वीज जोडण्या देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

पीकविमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांचा मोठा सहभाग मिळत असून त्यांना भरीव नुकसान भरपाई देण्यात येत आहे. कृषी विमा योजनेंतर्गत सुमारे ५५ लाख शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. त्यांना २१०० कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली. खरीप २०१५ मध्ये सुमारे ७२ लाख शेतकऱ्यांचा विक्रमी सहभाग नोंदवण्यात आला. बियाणे निर्मिती कंपनीच्या नफेखोरीला आळा बसावा, यासाठी बी. टी.कापसाच्या






### बदल घडले आहेत...

- पीक कर्जाच्या परतफेडीचा कालावधी ३ वर्षांवरून ५ वर्षे
- व्यापारी बँकांप्रमाणेच जिल्हा बँकांच्याही पीककर्जाचे व्याजासह रूपांतरणाचा निर्णय
- शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांकडे विशेष लक्ष पुरवण्यासाठी वसंतराव नाईक स्वाभिमान शेती मिशनची स्थापना
- दुष्काळी परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती यामध्ये होणाऱ्या नुकसान भरपाईच्या निकषात बदल
- उत्पादनापासून - पणन व्यवस्थेपर्यंत मूल्य-साखळी विकास कार्यक्रम सुरू
- ठिबक सिंचनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवण्यासाठी विशेष प्रयत्न. १ लाख ३७ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर ४१५ कोटी रुपयांच्या अनुदानाचे थेट वाटप.
- दुष्काळसदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी हायड्रोपोनिक तंत्राद्वारे चारा उत्पादन प्रकल्प मंजूर
- शेतकऱ्यांना भूसंपादनात पाच पट मोबदला देण्याचा निर्णय
- ब्रिटिशकालीन आणेवारी पद्धत बदलण्याची प्रक्रिया सुरू
- अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मुलामुलींना उच्च शिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न
- अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा अडीच लाखांवरून सहा लाखांपर्यंत वाढवण्याचा निर्णय

किंमतीत पाकिटामागे १०० रुपयांनी कपात केली. त्याचा ५० लाख शेतकऱ्यांना फायदा झाला.

### मूल्य–साखळी

उत्पादनापासून–पणन व्यवस्थेपर्यंत मूल्य–साखळी विकास कार्यक्रम आम्ही हाती घेतला आहे. त्या अंतर्गत खाजगी कंपन्यांच्या सहभागाद्वारे विविध पिकांसाठी मूल्य–साखळी द्वारे शेतकऱ्यांसाठी पणन व्यवस्था उभी करणे, कृषी क्षेत्रात खाजगी क्षेत्राची गुंतवणूक व भागीदारी वाढवणे, या कार्यक्रमांतर्गत २० प्रकल्प मंजूर करण्यात आले असून ६० कंपन्यांनी सहभाग घेतला आहे. सुमारे २ लाख हेक्टर क्षेत्रावर हा कार्यक्रम राबवला जाणार आहे. त्याचा सुमारे १.५० लाख शेतकऱ्यांना थेट फायदा होणार आहे.

ठिबक सिंचनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. १.३७ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर ४१५ कोटी रुपयांच्या अनुदानाचे थेट वाटप करण्यात आले. २०१२–१३ पर्यंतची प्रलंबित देयके अदा केली आहेत. खताचा समतोल वापर करून शाश्वत शेतीस चालना देण्याकरिता मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले. सन २०१५–१६ करिता निर्धारित १० लाख पैकी ७.३० लाख नमुने तपासण्यात आले. शिफारशीसह एकूण ३३,००० मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण केले.

दुष्काळसदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी हायड्रोपोनिक तंत्राद्वारे चारा उत्पादन प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. वैरण विकासासाठी ७५ कोटी रुपये मंजूर करून त्या माध्यमातून सुमारे ४.६० लाख हेक्टर क्षेत्रावर चारा उत्पादनाचा कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. त्याचबरोबर ५ लाख सौरकृषी पंपांसाठी पथदर्शी प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. अवर्षणग्रस्त मराठवाड्यात कृत्रिम पावसाचा प्रयोग प्रथमच करण्यात आला. त्या माध्यमातून १७०० मिमी कृत्रिम पाऊस पाडण्यात यंत्रणेला यश मिळाले.बँकांमार्फत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला. त्यामध्ये २०१४–१५ मध्ये शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपापोटी ३४१०० कोटी रुपये देण्यात आले. शिखर बँकेमार्फत जिल्हा बँकांना गुंतवणूक कर्जापोटी ६१२ कोटी फेरकर्ज मंजूर केले आहे. नागपूर, वर्धा, बुलढाणा जिल्हा बँकांना

## अल्पसंख्याक विकास

**राज्यातील अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. या समाजातील मुलामुलींना उच्च शिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधीदेखील उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.**

**उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त २५ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. बारावीनंतरच्या सर्व अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त पाच हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीसाठी पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा अडीच लाखांवरून सहा लाखांपर्यंत वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. केंद्र शासनाच्या बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत व राज्य शासनाच्या योजनेमधून विविध जिल्ह्यांमध्ये १५ ठिकाणी प्रत्येकी १०० प्रवेश क्षमतेच्या मुलींच्या वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. प्रत्येक वसतिगृहासाठी अंदाजे पाच कोटी ते साडेपाच कोटी रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. यामध्ये दहावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. मराठी माध्यमाच्या शाळांमधून 'उर्दू' भाषा हा ऐच्छिक विषय शिकवण्यास मान्यता देण्यात आली. अमराठी माध्यमाच्या शाळांमधून 'मराठी भाषा फाऊंडेशन वर्ग' या योजनेंतर्गत मराठी भाषा शिकवणाऱ्या शिक्षकांच्या दरमहा मानधनात तीन हजारापासून ते पाच हजारापर्यंत वाढ करण्यात आली. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळासाठी २०१४–१५ वर्षाच्या ३२ कोटी रुपयांच्या तुलनेत २०१५–१६ नियतव्ययामध्ये १५० कोटी रुपये भागभांडवलाची तरतूद करण्यात आली आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची थेट कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज योजना, मुदत कर्ज योजना, महिला बचत गट योजना या अंतर्गत १७ हजार ७५३ लाभार्थींना ९० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे.**



३८० कोटी शासकीय अर्थसाहाय्य मंजूर केले. नागरी व ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांना एकूण कर्जवाटपाच्या २० टक्के मर्यादेपर्यंत शेती कर्ज पुरवठ्याची मुभा दिली. ऊस उत्पादकांना एफआरपीनुसार भाव देण्याचा निर्णय घेण्यात आला. भूसंपादनात शेतकऱ्यांना पाचपट मोबदला देण्याचा निर्णय घेतला. यामुळे खाजगी वाटाघाटीतून जमीन खरेदी शक्य होईल. २५ टक्के अतिरिक्त मोबदला व जमीन भावाच्या पाचपट मोबदला मिळणार आहे.

### साहाय्य तंत्रज्ञानाचे

कृषिविकासाठी तंत्रज्ञानाचे साहाय्य देण्यात येत आहे. तालुका पातळीवर हवामानाची अद्ययावत माहिती देण्यासाठी २ हजार ५९ केंद्रांची स्थापना करण्यात आली. ५०० गावांत पथदर्शी प्रकल्प म्हणून उपग्रह तंत्रज्ञानावर आधारित पीक विमा सर्वेक्षणाची योजना राबवण्यात येत आहे. त्यामुळे पीक नुकसानीचे अचूक सर्वेक्षण करण्यात येऊन शेतकऱ्यांना योग्य भरपाई मिळणार आहे. शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचू दंश, विजेचा शॉक बसणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, तसेच अन्य कोणत्याही कारणामुळे होणाऱ्या अपघातामुळे, अपघातग्रस्त शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक लाभ देण्याकरिता शेतकरी जनता अपघात विमा योजना सुरू करण्यात आली. लाभार्थ्यांना दोन लाख रुपयांची मदत देण्यात आली. तर राज्यातील १ कोटी ३७ लाख शेतकऱ्यांचा यात सहभाग घेतला आहे. ब्रिटीशकालीन आणेवारी पद्धत बदलण्याची प्रक्रिया देखील सुरू करण्यात आली आहे.

### नोंदणी व मुद्रांक विभाग

आमचे सरकार सत्तेच येताच पहिला निर्णय घेतला तो कोणताही मोबदला न घेता, जवळच्या नातेवाईकाला मालमत्ता हस्तांतरणासाठीचा कुलमुखत्यारपत्र करून दिल्यास नाममात्र मुद्रांक शुल्क आकारण्यात येते. तथापि, जवळच्या नातेवाईकामध्ये मुलगा या नात्याचा उल्लेख नव्हता तो समाविष्ट करण्यात आला. तसेच पती/पत्नीची आई, वडिल, भाऊ किंवा बहीण या नात्यांचा समावेश करून तत्सम जवळचे नातेवाइक हे शब्द वगळण्यात आले. रहिवासी किंवा कृषी मिळकतीचे बक्षिसपत्राचे मुद्रांक शुल्क केवळ २०० रुपये इतके कमी करण्यात आली.

### पशुधनाच्या हितासाठी

केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय गुरे पैदास कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय गोकुळ ग्राम योजना राबवण्यात येत आहे. त्यामध्ये स्थानिक देशी जातीच्या १,००० गाईंची जपणूक व त्यांच्या आनुवंशिकतेत सुधारणा करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. गोकुळग्राम योजनेमध्ये १,००० जनावरांपैकी ६० टक्के उत्पादनक्षम व उर्वरित ४० टक्के भाकड जनावरांचे संगोपन करण्यात येईल. या योजनेंतर्गत पाच प्रकल्प उभारले जाणार आहेत.

### मदत व पुनर्वसन विभाग

पुणे जिल्ह्यातील माळीण या नैसर्गिक आपत्तीने बाधित गावाचे पुनर्वसन अंतर्गत घरकुले बांधून देण्यासाठी रु. १४४ लक्ष खर्च करण्याची परवानगी दिली. नागरी सुविधा व इतर कामांसाठी माळीणकरिता एकूण रु. १० कोटी ६ लक्ष चा निधी मंजूर केला. केंद्र शासनाकडून सन २०१४ खरीप हंगामातील पीक नुकसानीसाठी निविष्ठा अनुदानासाठी रु.१९६२.९९ कोटी रक्कम मंजूर करण्यात आली.

### आपत्ती व्यवस्थापन प्रभाग




दुष्काळी परिस्थिती तसेच हवामान खात्याच्या अंदाजावरून कृत्रिम पाऊस पाडण्याचे काम सुरू केले आहे. आतापर्यंत मराठवाड्यात विविध ठिकाणी या प्रयोगामुळे अंदाजे १७०० मि.मी. पावसाची नोंद झालेली आहे.

मला सोपवलेल्या या विविध विभागांच्या जनकल्याणकारी योजनांना चालना देण्यासाठी मी प्रयत्न केले आहेत. वर्षभरात अनेक योजनांना मूर्त स्वरूप देण्याचा मी प्रयत्न केला आहे. खूप काही केले आहे असा माझा दावा नाही, अजून बरेच करायचे आहे हे मी यानिमित्ताने सांगू इच्छितो. पुढील चार वर्ष राज्यातील सामान्यांच्या शाश्वत विकासासाठी आम्ही प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही मी देतो.

**शब्दांकन : अजय जाधव**

## बदल घडले आहेत...

- **नागरिकांना अधिक जलद आणि गतिमान सेवा देण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा अवलंब**
- **महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व पारदर्शक करण्यासाठी महा-राजस्व अभियान राबवण्याचा निर्णय**
- **या अभियानांतर्गत शिबिरे घेऊन विविध दाखले प्रदान करणार, विस्तारित समाधान योजना राबवणार. अर्धन्यायिक प्रकरणे डिसेंबर-२०१६ पर्यंत अंतिम निर्णय देऊन निकाली काढणार**
- **मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत, मार्च २०१६ अखेरपर्यंत ई-फेरफार सुविधेची प्रत्येक गावात उपलब्धता, भूसंपादन केलेल्या प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तराचे अद्ययावतीकरण, पाणंद/पांधण शेतरस्ते अशा शेतावर जाण्याच्या पायमार्गांची मोकळिक, जमिनींच्या अनधिकृत अकृषिक वापराच्या प्रकरणांची शोधमोहीम व कारवाई**
- **शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे काढण्यासाठी निष्कासन मोहीम, इनाम व वतन जमिनी शर्तभंग तपासणी व कार्यवाही, भोगवटादार वर्ग -२ जमिनींचा अद्ययावत डाटा, बँकेची निर्मिती, शासकीय जमिनींवरील भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरणासाठी विशेष मोहीम**
- **कोकण विभागात किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेतीच्या उत्खननासंबंधीचे सर्वंकष धोरण. या धोरणामुळे वाळू/रेतीच्या उत्खननाच्या कामातून कोकण विभागातील जिल्ह्यात स्थानिक लोकांना रोजगाराची उपलब्धता**
- **कोकण विभागात वाळूच्या अवैध उत्खननास आळा बसून, वाजवी दराने वाळू उपलब्ध होण्यास साहाय्य.**
- **वडार समाजातील कुटुंबांना त्यांच्या पारंपरिक व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या दगडांवरील स्वामित्व धन आकारणीमध्ये सूट.**
- **मासेमारी नौकांचे आवागमन व त्यावरील खलाश्यांची माहिती मिळण्यासाठी ९१ संवेदनशील लॅन्डिंग पॉईंट्सवर खाजगी सुरक्षारक्षकाची नेमणूक.**



**महाराष्ट्र हे देशाच्या आद्योगिक विकासाचे इंजिन आहे, असे नेहमी म्हटले जाते. देशाची आर्थिक राजधानी अशी ओळख असलेल्या मुंबई शहरामुळे औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र सदैव अग्रेसर राहिला आहे. राज्याचा समतोल औद्योगिक विकास व्हावा, परकीय गुंतवणूक वाढून रोजगार निर्मितीला चालना मिळावी, यासाठी आमच्या सरकारने वर्षभरात विशेष प्रयत्न केले. 'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर 'मेक इन महाराष्ट्र' संकल्पना आम्ही प्रभावीरीत्या राबवली.त्याचे दृश्य परिणाम आता दिसू लागले असून महाराष्ट्राने पुन्हा एकदा गुंतवणूक व औद्योगिक क्षेत्रात आघाडी घेतली आहे.**

# पुन्हा आघाडीवर

**सुभाष देसाई**
(उद्योग मंत्री)

मेक इन महाराष्ट्र अभियानाचा एक भाग म्हणून आमचा दाव्होस (स्वित्झर्लंड) येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या ४५ व्या वार्षिक परिषदेत सहभाग, जर्मनी येथे हॅनोव्हर उद्योग व्यापार परिषदेत सहभाग यशस्वी ठरला. चीन, जपान या देशात औद्योगिक शिष्टमंडळ जाऊन या दौऱ्याच्या माध्यमातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणण्यात यश मिळाले. औद्योगिक गुंतवणुकीच्या वाढीसाठी हे प्रयत्न फलदायी ठरले आहेत. अमेरिकेचा दौराही यशस्वी ठरला.

देशात होणाऱ्या एकूण विदेशी गुंतवणुकीपैकी ३० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात होते. भारताच्या एकूण निर्यातीत ३० टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. देशाच्या एकूण सकल उत्पन्नात (जीडीपी) महाराष्ट्राचा वाटा १५ टक्के आहे. राज्यात उद्योगपुरक वातावरण तयार करण्यासाठी व कौशल्य आधारित रोजगार उपलब्ध करण्यासाठी शासनाने पुढाकार घेऊन स्वतंत्र कौशल्य विकास विभाग तयार केला आहे. 'इज ऑफ डुईंग बिझनेस' ही संकल्पना रुजवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

## सुलभ व गतिमान प्रक्रिया

उद्योगवाढीसाठी सुलभ व गतिमान प्रक्रिया अंमलात आणली जात आहे. औद्योगिकीरणाला गती देण्यासाठी ७६ परवानग्यांची संख्या कमी करून ३७ वर आणली आहे. दिल्ली येथे हॉटेल ताज पॅलेसमध्ये ३० सप्टेंबर २०१५ रोजी इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्पिटिटिव्हनेस आणि द मिंट (हिंदुस्तान टाइम्सचे भावंड) वतीने महाराष्ट्राला पाच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. देशात उद्योगप्रिय वातावरण निर्माण केल्याबद्दल आणि नावीन्यपूर्ण संकल्पना राबवल्याबद्दल महाराष्ट्राने उद्योग क्षेत्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. पुन्हा एकदा महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर गेला आहे.

## गुंतवणुकीत वाढ

वर्षभरात ३४ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. या प्रकल्पांच्या माध्यमातून २० हजार ८०३ कोटी रुपये एवढी गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यामुळे २० हजार २०४ व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर आकर्षित झाली आहे. जगातील वाहन उत्पादनात आघाडीवर असलेल्या जनरल मोटर्स या कंपनीबरोबर सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार ही कंपनी महाराष्ट्रात एकूण ६ हजार ४०० कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करणार आहे. अधिकाधिक वाहनांची निर्यात करता यावी, यासाठी पुणे जिल्ह्यातील तळेगांव येथील या प्रकल्पाचा विस्तार करण्यात येणार आहे. या कंपनीची तळेगाव येथील वाहन निर्मितीची क्षमता एक लाख ७० हजार युनीटस इतकी आहे. या प्रकल्पाच्या क्षमता वाढीसाठी ४.३ बिलियन अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक कारच्या वेगवेगळ्या मॉडेल्सची निर्मिती करण्यासाठी करण्यात येत आहे. यातून एक हजार लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. याशिवाय जवळपास २०० मिलियन डॉलर्सची गुंतवणूक, एक लाख ६० हजार युनीट्सचे शक्तिशाली इंजिन बनवण्यासाठी केली आहे. ही क्षमता तीन लाख युनिट्स इंजिन इतकी वाढू शकते. त्यामुळे अधिक १४०० लोकांना रोजगार उपलब्ध होईल.

डिजिटल, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात जगात अव्वल समजल्या जाणाऱ्या फॉक्सकॉन कंपनीशी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार ही कंपनी येत्या पाच वर्षांत पाच अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून त्यातून ५० हजार नवीन रोजगार निर्माण होतील. उत्पादन प्रकल्पासह संशोधन आणि विकास केंद्रही सुरू करणार आहे. एमआयडीसीने या कंपनीला रायगड आणि पुणे पट्ट्यातील काही भूखंड दाखवले असून तिथे फॉक्सकॉन गुंतवणूक करणार आहे. टीएफटी स्क्रिन आणि सेमी-कंडक्टर्सच्या उत्पादनापासून ही कंपनी सुरुवात करेल.

जनरल मोटर्सची सद्य:स्थितीची गुंतवणूक व महाराष्ट्रातील मर्सिडीज, फोक्सवॅगन, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, टाटा मोटर्स, स्कोडा इ. यांचा एकत्रित विचार करता भारतातले वाहन निर्मिती क्षेत्रातील महाराष्ट्र हे

अग्रगण्य राज्य आहे.

राज्य सरकारने वाहननिर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांसह विस्तार करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. जागतिक पातळीवरील प्रसिद्ध हॅनोव्हर येथे 'हॅनोव्हर मेसी २०१५' उद्योग मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी आम्ही जर्मनीला गेलो होतो. त्यावेळी महाराष्ट्रातील सर्व आयटीआयमध्ये प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव बॉश या कंपनीने मान्य केला. प्रशिक्षणासोबतच आपल्या उद्योगात; अभियांत्रिकी क्षेत्रातील या प्रशिक्षित तरुणांना रोजगार देण्याचे या कंपनीने मान्य केले आहे. 'बॉश' ही आघाडीची जर्मन कंपनी असून अभियांत्रिकीच्या क्षेत्रात लागणाऱ्या उपकरणांचे उत्पादन ती करते. नाशिक आणि पुणे येथे या कंपनीचे प्रकल्प आहेत. अमेरिकेतील आघाडीची बहुराष्ट्रीय सिस्को कंपनी ही नेटवर्किंग संदर्भातील साधनांची निर्मिती, संशोधन आणि विक्री करते. या कंपनीने स्मार्ट सिटी प्रकल्पास मदत करण्याचे ठरवले आहे. सायबर सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मुंबई, पुणे येथे मॉयक्रोसॉफ्टच्या साहाय्याने सुरू करण्यात आलेले डेटा सेंटर्स उपयुक्त ठरणार आहेत. मुंबई शहराला अधिक प्रगत, अद्ययावत करण्यासाठी डिजिटल सेवांची आवश्यकता होती. डेटा सेंटर्समुळे ही गरज पूर्ण होईल.

जपानबरोबर अनेक औद्योगिक व आर्थिक सहकार्याचे करार झाल्याने जपानमधून मोठ्या गुंतवणुकीचा ओघ महाराष्ट्रात सुरू होण्याची अपेक्षा आहे. जपान दौऱ्यामुळे महाराष्ट्रात डायकिन कंपनीचा वातानुकूल यंत्राचा (एअर कंडिशनर्स) उद्योग, कुबोटा तर्फे ट्रॅक्टर निर्मिती, ओरिएंटल यीस्ट कंपनीचा प्रकल्प, विजेवर चालणाऱ्या मोटारीचा नायडेक महाप्रकल्प,




गोल्डन महाराष्ट्र डेव्हलपमेंट कौन्सिलच्या मॅन्युफॅक्चरिंग समीट २०१५ मध्ये मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री सुभाष देसाई.




## बदल घडले आहेत...

- उद्योग स्थापन करण्यासाठी आवश्यक सर्व परवानग्या एक महिन्याच्या आत देण्यासाठी अधिकाऱ्यांच्या शक्तिप्रदान गटाची निर्मिती
- १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी 'मैत्री' या वेबपोर्टलच्या माध्यमातून सर्व परवानग्या एकाच ठिकाणी
- माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरण २०१५ जाहीर
- माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात ५०,००० कोटी गुंतवणूक अपेक्षित असून दहा लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य
- उद्योगवाढीसाठी सुलभ व गतिमान प्रक्रिया अंमलात. औद्योगिकीरणाला गती देण्यासाठी ६७ परवानग्यांची संख्या कमी करून ३७ वर
- वर्षभरात ३४ विशाल प्रकल्पांना मान्यता. त्यांच्या माध्यमातून २० हजार ८०३ कोटी रुपये एवढी गुंतवणूक व २० हजार २०४ व्यक्तींना रोजगाराच्या संधी अपेक्षित
- लघुउद्योगांना चालना देण्यासाठी तसेच उद्योग सुलभतेसाठी कारखाने अधिनियमन १९४८ मध्ये बदल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय
- मायक्रोसॉफ्टच्या माध्यमातून देशातील तीन डाटा सेंटर्सपैकी दोन सेंटर्स मुंबई व पुणे येथे सुरू
- औद्योगिक क्षेत्रात लघुउद्योगांना भूखंड, गाळे व पायाभूत सुविधा देणे, व्हेंचर कॅपिटलची २०० कोटी रुपयांची उभारणी




फॉक्सकॉन कंपनीच्या अधिकाऱ्यांशी सामंजस्य करार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई.

सॉफ्टबँक ग्रुपच्या सहकार्याने इलेक्ट्रॉनिक व सौर ऊर्जेच्या मशिनरीचे अनेक प्रकल्प उभारण्यासाठी करार झाले. फॉक्सकॉनसारख्या कंपन्यांनी महत्त्वाचा पुढाकार घेतला. मोटारींचे सुटेभाग, अन्नप्रक्रिया व औषध निर्माण क्षेत्रात लघुउद्योग उभारणीचे करार झाले.

## लघुउद्योगांना चालना

लघुउद्योगांना चालना देण्यासाठी तसेच उद्योग सुलभतेसाठी कारखाने अधिनियमन १९४८ मध्ये बदल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे १४ हजार ३०० कारखान्यांना इन्स्पेक्टर राजमधून मुक्ती मिळणार असून या उद्योगांमधील सध्याच्या १ लाख ९० हजार या रोजगारक्षमतेत वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या लागू असलेल्या कारखाना अधिनियम १९४८ मधील अनेक तरतुदी उद्योगाजगतासाठी अडचणीच्या ठरत असल्याने, त्यात सुधारणा व दुरुस्ती करण्यात येत आहे. या अधिनियमाच्या कलम २ नुसार ज्या ठिकाणी विजेचा वापर करून १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असतील अथवा विजेच्या वापराविना २० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार कार्यरत असतील, अशी आस्थापना म्हणजे कारखाना, ही व्याख्या निश्चित करण्यात आली होती. त्यात बदल करून विजेच्या वापरावर व वापराविना चालणाऱ्या कारखान्यांची व्याख्या करताना आवश्यक असणाऱ्या कामगारांच्या संख्येत अनुक्रमे १० व २० ऐवजी ३० व ४० अशी वाढ करण्यात आली. त्याचा लाभ लघुउद्योजकांना होणार आहे.

मोठ्या उद्योगांना निमंत्रण व साहाय्य देताना राज्यातील लघुउद्योगांच्या विकासाकडेही विशेष लक्ष आहे. त्या दृष्टीने औद्योगिक क्षेत्रात लघुउद्योगांना भूखंड, गाळे व पायाभूत सुविधा देणे, व्हेंचर कॅपिटलची २०० कोटी रुपयांची उभारणी, लघुउद्योग विकास संस्थेची मुहूर्तमेढ व बंद पडलेल्या लघुउद्योगांना संजीवनी देण्यासारख्या अनेक उपक्रमांतून महाराष्ट्रात लघुउद्योग क्षेत्राला म्हणजेच खऱ्या अर्थाने मराठी माणसाच्या उद्यमशीलतेला प्रोत्साहन देण्याचे धोरण ठेवले आहे.

भारतातली पहिली बुलेट ट्रेन मुंबईहून अहमदाबादला जाणार आहे. ही ट्रेन नाशिकमार्गे जाणार असल्याने उत्तर महाराष्ट्रात विकासाचा वेग वाढेल. बुलेट ट्रेनच्या प्रकल्पात नाशिकचा अंतर्भाव करण्याची महाराष्ट्राने सूचना केली आहे. त्यामुळे अनेक कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या कंपन्यांमुळे उद्योग सुरू होतील. त्याचबरोबर लघु उद्योगांनाही बळ मिळून मोठी रोजगार निर्मितीसुद्धा होईल.

## माहिती तंत्रज्ञान धोरण

राज्याचा गतीने विकास,भविष्यातील गरज व राज्याचा समतोल विकास डोळ्यासमोर ठेवून माहिती तंत्रज्ञान धोरण जाहीर करून आम्ही औद्योगिक क्षेत्रात नवी झेप घेतली आहे. जागतिक स्तरावर महाराष्ट्राला एक सर्वसमावेशक वाढीचे स्पर्धात्मक माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा केंद्र म्हणून विकसित करणे आणि राज्याला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीवर ठेवण्यासाठी या धोरणाचा फायदा होईल.

जागतिक स्तरावरील गुंतवणूकदारांकरिता सर्वाधिक पसंतीच्या ठिकाणांमध्ये महाराष्ट्राचा समावेश करणे, तसेच प्रवर्तन नीतीद्वारे स्पर्धात्मक आणि शाश्वत गुंतवणुकीस योग्य वातावरण असलेले राज्य म्हणून विकसित करून महाराष्ट्राला सर्वाधिक पसंतीचे, आर्थिक आकर्षणाचे केंद्र बनवणे हे या धोरणाचा मुख्य हेतू आहे.

माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा क्षेत्रातील अग्रस्थान कायम राखणे, औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित भागात गुंतवणुकीचा ओघ वाढविण्यासाठी चालना देणे, सर्व भागातील, सर्व

स्तरातील शिक्षित तरुणांना अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, निर्यात उलाढालीतील उच्च पातळी गाठून त्याद्वारे राज्याच्या स्थुल घरगुती उत्पादनात आणि उत्पादकतेत वाढ घडवून आणणे, सामाजिक व आर्थिक विकासाकरिता एक साधन म्हणून माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वापर करणे, मूळ सामग्री निर्मितीसह नवीन उत्पादन व बिझनेस टू बिझनेस आणि बिझनेस टू कस्टमर यांना पुरविल्या जाणाऱ्या अद्वितीय सेवांकरिता बौद्धिकमत्ता निर्मितीस प्रोत्साहन देणे ही या धोरणाचे उद्दिष्टे आहेत.

### नव्या संधी

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात राज्यात ५०,००० कोटी गुंतवणूक, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात दहा लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य निर्धारित केले आहे. प्रतिवर्षी रुपये एक लाख कोटींच्या निर्यातीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. भारतात पहिल्यांदाच डाटा सेंटर्ससाठी प्रोत्साहने प्रस्तावित करण्यात आली आहेत. माहिती तंत्रज्ञान नगरे वसवताना नागरी भागात २.५ चटई निर्देशांक तर उर्वरित क्षेत्रासाठी २.०० चटई निर्देशांक अनुज्ञेय केली जातील. माहिती तंत्रज्ञान धोरणाच्या माध्यमातून मेक इन महाराष्ट्र ही संकल्पना राज्यात प्रभावीपणे रुजवण्यास साहाय्य होईल.

### तीन लाखांवरील सर्व खरेदी ई-निविदेद्वारे

खरेदीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी तीन लाख रुपयांवरील सर्व खरेदी ई-निविदेद्वारे करण्यासाठीच्या नवीन खरेदी धोरण, अंमलबजावणीचा निर्णय आम्ही घेतला आहे. या धोरणात महाराष्ट्रातील उद्योजकांना तसेच सूक्ष्म व लघू उद्योजकांना, विशेषत: अनुसूचित जाती व जमातीमधील लघुउद्योजकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या धोरणानुसार मध्यवर्ती भंडार खरेदी संघटनेमार्फत करण्यात येणारा दरकरार बंद करण्यात आले आहे. राज्यात उद्योग यावेत, असणाऱ्या उद्योगांनी गुंतवणूक वाढवावी आणि लघु आणि मध्यम उद्योगांना गती मिळावी, यासाठी विशेष धोरण आम्ही राबवले आहेत. त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले असून रोजगाराच्या विपुल संधी निर्माण होत आहेत.

'मेक इन इंडिया' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी 'मेक इन महाराष्ट्र' ही संकल्पना यशस्वी झाली पाहिजे. गेल्या वर्षभरात उद्योजकांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास आकर्षित करण्याबरोबरच राज्याच्या मागासभागात उद्योगविस्तार व्हावा, यासाठी आमचे प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. या सर्व योजना कार्यान्वित झाल्यावर बेरोजगारांना रोजगार मिळेल.

**शब्दांकन: काशिबाई थोरात**




## बदल घडले आहेत...

- जलद गतीने मंजुरी मिळण्यासाठी मान्यताप्राप्त वास्तुविशारदाची नियुक्ती (त्रयस्थ पक्ष प्रमाणपत्र)
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून इमारत आराखडा मंजुरी, पाणी पुरवठा जोडणी, अंतर्गत निचरा आराखडा मंजुरी, निचरा जोडणी आराखडा मंजुरी, आग ना हरकत प्रमाणपत्र, सीईटीपीचे सदस्यत्व, वीज पुरवठा ना हरकत प्रमाणपत्र इ. प्रक्रिया सोप्या.
- जमीन वाटप पद्धतीची सुस्पष्ट प्रक्रिया अर्जदार प्रतीक्षा यादीसह ऑनलाइन प्रकाशित.
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून त्यांच्या औद्योगिक क्षेत्रातील वृक्षांच्या तोडणीसाठी प्राधिकरणाची स्थापना.
- कारखाना अनुज्ञप्ती आणि तिचे नूतनीकरण जर त्यासाठी केलेल्या अर्जाच्या दिनांकापासून ४ महिन्यांत दिले गेले नाही, तर ते देण्यात आल्याचे मानण्यात येईल.
- दुकाने व आस्थापना अनुज्ञप्ती ७ दिवसांत देण्याचा निर्णय.
- शेतजमिनीच्या वापराकरिता आवश्यक विविध ना हरकत प्रमाणपत्रे १५ दिवसांमध्ये देण्यासंदर्भात अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय.
- नवीन विद्युत जोडणीसाठी लागणारा कालावधी ६७ दिवसांऐवजी १५ दिवस आणि प्रक्रियांची संख्या ७ ऐवजी ३ एवढी करण्यात आली आहे.



ब्रिटनचे गुंतवणूक आणि व्यापार मंत्री लॉर्ड यान लिव्हिंगस्टन यांच्यासोबत सामंजस्य करारावर सही करताना उद्योगमंत्री सुभाष देसाई.

# अर्थ विकासाला नवे समाजभान

**राज्याचा वित्त आणि वन मंत्री म्हणून कारभार स्वीकारल्यानंतर प्रादेशिक विकासावर भर दिला. राज्याची आर्थिक स्थिती जनतेसमोर श्वेतपत्रिकेद्वारे मांडताना विकास कामात बाधा येणार नाही, याचे नियोजन केले. गेल्या वर्षभरात राज्याची आर्थिक घडी बसवताना वन व वन्य प्राणी संरक्षण व संवर्धनावर लक्ष केंद्रित केले.**



**सुधीर मुनगंटीवार**
(वित्त आणि नियोजन, वने मंत्री)

वित्त आणि नियोजन, वन मंत्री या नात्याने गेल्या वर्षात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात आम्हाला यश आले. उदाहरण द्यायचे तर खूप देता येतील. शासनाच्या सेवेत नागरी पदावर पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकांना केंद्रासोबत राज्याचे निवृत्ती वेतन देण्याचा निर्णय आम्ही घेतला. राज्यात आमचे सरकार येताच विविध तीर्थक्षेत्रांच्या विकास आराखड्यासाठी अखर्चित निधी खर्च करण्यासाठी मुदत देण्याचा निर्णय घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात भव्य स्मारक उभारण्यासाठी केंद्राकडे निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला. शासन सेवेत असताना किंवा सेवानिवृत्तीनंतर एखाद्या एकटा असणाऱ्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या आईवडिलांना कुटुंब निवृत्तीवेतन देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या बापूसाहेब दुरगुडे यांची कन्या पुनम दुरगुडे यांना सहायक विक्रीकर आयुक्त या पदावर थेट नियुक्ती केली.

व्याघ्रदिनानिमित्त प्रदर्शन मंत्रालयात आयोजित करण्यात आले होते, त्यास नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. हे प्रदर्शन व्याघ्र संवर्धनाविषयी जनजागृती करण्यास उपयुक्त ठरले.

### ऐतिहासिक निर्णय

चंद्रपूर जिल्ह्यात संपूर्ण दारूबंदी लागू करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या संसदीय संघर्षाला यश मिळाले. दारूबंदी लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), नियमानुसार पुनर्विवाहानंतर विधवांना कुटुंबनिवृत्तीवेतन अनुज्ञेय नव्हते. आता या नियमात सुधारणा करून पुनर्विवाह केल्यानंतरसुद्धा मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या विधवांना कुटुंब निवृत्तीवेतन लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्राप्रमाणेच राज्यातही मूकबधिरांना विशेष वाहन भत्ता देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचा २७०८ मूकबधिर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे. नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांना मार्च २०१५ पर्यंत विकासकामे करता यावी, यासाठी अतिरिक्त ५० लक्ष एवढा आमदारनिधी मंजूर करण्यात आला. कॅन्सरग्रस्त रुग्णांना औषधोपचारादरम्यान महागडी औषधे खरेदी करावी लागत असल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. कॅन्सरग्रस्त रुग्णांची अडचण लक्षात घेऊन १०६ औषधे करमुक्त केली. या निर्णयामुळे राज्यातील कॅन्सरग्रस्त रुग्णांना व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळणार आहे.

शेतकऱ्यांना वाजवी व किफायतशीर मूल्य देण्याकरिता राज्यात साखर कारखान्यांना साहाय्य करण्यासाठी २०१४-१५ या वर्षाकरिता ऊस खरेदी करास माफी दिली. जीवनावश्यक वस्तूंच्या करमाफीस ३१ मार्च, २०१६ पर्यंत मुदतवाढीचा आम्ही निर्णय घेतला.

### विमा संरक्षणात वाढ

शासकीय कर्मचारी सेवेत असताना त्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला मदत व्हावी आणि सेवानिवृत्तीनंतर त्यास मिळावयाच्या उत्पन्नात वाढ म्हणून त्याला काही ठोक रक्कम देता यावी, अशा दुहेरी लाभांसाठी सुरू असलेल्या राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजनेत सुधारणा करण्यात आली असून; या सुधारणेनुसार गट 'क' च्या कर्मचाऱ्यांना १ लाख २० हजाराऐवजी रु. ३ लाख ६० हजाराचे विमासंरक्षण व गट 'ड' च्या



कर्मचाऱ्यांना ६० हजाराऐवजी २ लाख ४० हजाराचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. वाढलेले आयुर्मान लक्षात घेता अधिक बचतीची आवश्यकता आहे. आजच्या परिस्थितीत अपुरे वाटणारे विमा संरक्षण लक्षात घेऊन गट 'क' व 'ड'च्या कर्मचारी संघटनांनी गट विमा योजनेंतर्गत मासिक वर्गणी व विमासंरक्षणात वाढ करण्याची मागणी केली होती. त्यानुसार गट 'क' यांची विमा वर्गणी दरमहा रु. ३६० व गट 'ड'ची विमा वर्गणी २४० इतकी होईल. सुधारित योजना दि. ०१ जानेवारी, २०१५ पासून लागू होईल.

एक वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या महिला कर्मचाऱ्यास प्रसूती रजा अनुज्ञेय नाही. त्यामुळे शासन सेवेत नव्याने प्रविष्ट झालेल्या मात्र, प्रसुतीच्या कारणास्तव रजेची आवश्यकता असणाऱ्या महिला कर्मचारी प्रसूती रजेपासून वंचित होत्या.

वास्तविक मातृत्व हा स्त्रीचा नैसर्गिक अधिकार व हक्क आहे. यामुळे प्रचलित नियमातील किमान दोन वर्षाच्या सेवेची अट रद्द करण्यात आली. नव्यानेच शासन सेवेत रुजू झालेल्या महिला कर्मचाऱ्यांना रुजू झाल्यानंतर तत्काळ प्रसूती रजेस पात्र ठरवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

### अर्थसाहाय्यात वाढ

शेतकऱ्यांना सतत वन्य प्राण्यांशी संघर्ष करावा लागतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी होते हे लक्षात घेऊन वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या मनुष्यहानीसाठीच्या अर्थसाहाय्यात पाच लाख रुपयांवरून आठ लाख रुपये अशी वाढ करण्याचा तसेच जखमींना ७ हजार रुपयांवरून वाढ करून १५ हजार रुपये अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रात दिली जाणारी नुकसानभरपाईची ही रक्कम देशात सर्वात अधिक आहे. त्याचबरोबर वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या शेतपीक आणि फळबागाच्या नुकसानभरपाईच्या रकमेत दुप्पट वाढीचा निर्णय घेतला. या निर्णयांमुळे




राज्य व्याघ्रदूत अमिताभ बच्चन




## बदल घडले आहेत...

- मृत्यू पावलेल्या एकट्या शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेल्या त्याच्या आईवडलांना कुटुंब निवृत्ती वेतन.
- राज्य शासनासाठी काम केलेल्या सेवानिवृत्त माजी सैनिकांना केंद्रासोबतच राज्याचेही निवृत्तीवेतन.
- मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या विधवा पत्नीस पुनर्विवाहानंतरही कुटुंब निवृत्तीवेतन
- मूकबधिर कर्मचाऱ्यांना विशेष वाहन भत्ता लागू
- आजारी साखर उद्योगाला हातभार लावण्यासाठी २०१४-१५ या आर्थिक वर्षात ऊस खरेदीवरील कर (Purchase Tax) माफ
- राज्य शासकीय सेवेतील गट 'क' व 'ड' कर्मचाऱ्यांच्या गट विमा संरक्षणात वाढ
- कॅन्सरग्रस्त रुग्णांची अडचण लक्षात घेत अर्थसंकल्पात घोषित केल्याप्रमाणे १०६ औषधे करमुक्त करण्याचा निर्णय
- महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमानुसार जीवनावश्यक वस्तूंच्या करमाफीस ३१ मार्च, २०१६ पर्यंत मुदतवाढ.
- वर्कबूक,आराखडा किंवा चित्रकला वही, आलेख वही हे शालेय साहित्य १ एप्रिल, २०१५ पासून करमुक्त.
- नव्यानेच शासन सेवेत रुजू झालेल्या महिला कर्मचाऱ्यांना रुजू झाल्यानंतर तत्काळ प्रसूती रजेस पात्र ठरवण्याचा निर्णय.



राज्य हरितदूत सचिन तेंडुलकर

ताडोबा अभयारण्यापर्यंत नेण्याचा निर्णय घेतला. सामाजिक वनीकरणाच्या क्षेत्रात नियंत्रण व समन्वय साधण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाचे वन विभागात विलीनीकरण करण्यात आले. नागपूर शहर व परिसरात पर्यटनाला चालना देऊन रोजगाराच्या संधी वाढवणे, दुर्मीळ आणि लुप्त होत असलेल्या प्राण्यांचे प्रजनन करून त्यांना नैसर्गिक अधिवास पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने नागपूर येथे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणिसंग्रहालय उभारण्याचे काम प्रगतिपथावर आहे. गोरेवाडा जंगलाचे व तेथील वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी बचाव केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला आहे. ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे अनन्यसाधारण महत्त्व विचारात घेऊन २०१५–१६ मध्ये या दोन प्रकल्पात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन सुविधा निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्यांसाठी रेस्क्यू सेंटर सुरू करण्याच्या निर्णयामुळे मानव आणि वन्य प्राण्यांतील संघर्षाचे प्रमाण कमी झाले.राज्यात नवीन अभयारण्य आणि राखीव वने निर्मितीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. यात ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य (१६.९१ चौ.कि.मी), विस्तारित कर्नाळा अभयारण्य (६.८५४ चौ.कि.मी), तोरणमाळ संवर्धन राखीव क्षेत्र (९१.५२ चौ.कि.मी), अंजनेरी संवर्धन राखीव (५.६९ चौ.कि.मी ) या प्रस्तावांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

वन व वन्यजीवांच्या संवर्धनाबाबत नागरिकांत जनजागृती निर्माण व्हावी, यासाठी वन विभागाने प्रसिद्ध चित्रपट अभिनेते आणि खेळाडूंचे सहकार्य घेतले आहे. यामुळे नागरिकांमध्ये वन व वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण होण्यास मदत होणार आहे. १ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण देशभरात वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरिवली येथे, वन विभागाच्या वतीने व्याघ्रदूत व ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या प्रमुख उपस्थितीत वन्यजीव सप्ताह कार्यक्रम सोहळा साजरा करण्यात आला. याबरोबरच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ३० हजार शाळांमध्ये सुमारे ६ लाख वृक्षांची लागवड स्वातंत्र्यदिनी करण्यात आली.

## बांबूची शास्त्रोक्त लागवड

बांबूची शास्त्रोक्त लागवड आणि औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने चंद्रपूर जिल्ह्यातील चिचपल्ली येथे बांबूसंशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला. नवीन बुरूडांना वन विभागाकडे नोंदणी करण्यास मान्यता व बुरूड कामगारांना स्वंयरोजगारासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून बांबू कारागिरांना पुरवठा करण्यात येणाऱ्या बांबूवरील स्वामित्व शुल्कात सवलत प्रदान करण्यास मान्यता दिली. ही सवलत प्रतिकुटुंब प्रत्येक वर्षी १५०० बांबू इतक्या मर्यादेत आहे. दोन जातीचे बांबू सोडून अन्य सर्व प्रकारच्या बांबूंची लागवड आणि वाहतुकीवरील सर्व निर्बंध हटवण्यात आले आहेत. बांबूवर आधारित लघुउद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. चंद्रपूर येथील वन प्रशिक्षण संस्थेचे वन अकादमीत रूपांतर करून तिला स्वायतत्ता देण्यात आली. डेक्कन ओडिसी ही शाही रेल्वे

## वन्यजीव विकास निधी

केंद्रीय चिडियाघर प्राधिकरणाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेतला. याबरोबर वन्य प्राण्यांच्या संवर्धनासाठी व संरक्षणासाठी महाराष्ट्र वन्यजीव विकास निधी स्थापन करण्याचा निर्णय राज्य वन्यजीव विभागाने घेतला. बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान तसेच चंद्रपूर येथील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात बिबट सफारी स्थापन करण्यात आले. भारत सरकारच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने मॅनेजमेंट इफेक्टिव्हनेस इव्हॅल्युएशन ऑफ टायगर रिझर्व्ह इन इंडियाबाबत २०१४–१५ मध्ये केलेल्या अभ्यासात मेळघाट, पेंच आणि ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पाला अत्युकृष्ट तर सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला उत्कृष्ट दर्जा प्रदान केला आहे.

जैवविविधतेचे रक्षण करून वनांवर उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्या लोकांचे राहणीमान सुधारण्याच्या उद्देशाने राज्य निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. सामाजिक वनीकरणामार्फत प्रत्येक जिल्ह्यात उत्तमराव पाटील वन उद्यानांची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला असून या उद्यानात वनीकरण, जैवविविधता आणि निसर्ग संरक्षण याचा समावेश राहील. सर्व प्रकारच्या स्थानिक प्रजातींच्या वनस्पतींची लागवड करण्यात येणार आहे. रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या टेकड्यांचे हरितीकरण करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागात स्थानिक लोकांना रोजगाराची संधी निर्माण होईल. वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या मोनॉक्साईडच्या प्रदूषणास आळा घालण्यासाठी महत्त्वाचे रस्ते, कालवे आणि लोहमार्गाच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात येईल.

## जनवन योजना

वन्यजीव अभयारण्याबाहेर लोक सहभागातून वन व वृक्षाच्छादन वाढवणे, वृक्ष संपत्तीचे व्यवस्थापन करणे तसेच ग्रामविकास विभाग, आदिवासी विकास विभाग व जलसंधारण विभागांच्या योजना एकात्मिक पद्धतीने राबवण्यासाठी श्यामाप्रसाद मुखर्जी जनवन योजना राबवण्यात येईल. नागझिरा– नवेगाव व मेळघाट व्याघ्र प्रकल्पांसाठी विशेष व्याघ्र संरक्षण दल (Special Tiger Protection Force) स्थापन करण्यात येईल. तसेच ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व गोरेवाडा प्राणिसंग्रहालय ही ठिकाणे आंतरराष्ट्रीय वनपर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात येतील. केंद्र शासन नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क या योजनेद्वारे देशातील अडीच लाख ग्रामपंचायतींना ऑप्टिकल फायबर नेटवर्कद्वारे ब्रॉडबँड इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करून देणार आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आम्ही करणार आहोत. पडीक वन क्षेत्रावर उद्योग व अशासकीय सेवाभावी संस्था यांच्या सहकार्याने वन लागवड व संवर्धन धोरण राबवण्यात येईल.

शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर व रोही या प्राण्यांची पारध करण्याचा पद्धतीत सुलभीकरण केले आहे. पिकांचे नुकसान होत असल्याची तक्रार संबंधित शेतकऱ्याने केल्यास तक्रार प्राप्त झाल्यापासून २४ तासांच्या आत पारध करण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा हमी कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने वनविभागातंर्गत १० ऑनलाइन सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. 'ईज ऑफ बिझनेस डुईंग' अंतर्गत निर्गत पास या अटीतून रबरवूडला सूट दिली आहे. तिवर संवर्धनाच्या अधिक परिणामकारक प्रयत्नांसाठी व किनाऱ्यावरील जनतेच्या जीवनमानात सकारात्मक प्रभाव आणण्यासाठी शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रातून संसाधन प्राप्त करून घेण्याची आवश्यकता आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तिवर संवर्धन प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले आहे. गतिमान व पारदर्शक पद्धतीने कामकाजावर भर देत लोकहिताचे विविध निर्णय आम्ही घेतले. वित्त आणि नियोजन, वन विभागाच्या या उत्तम निर्णयांच्या मालिकेत सातत्य राहावे, यासाठी पुढील काळात आणखी प्रयत्न केले जातील.

**शब्दांकन : पवन राठोड**

**राज्य प्राणी शेकरू, राज्य पक्षी हरियल, राज्य वृक्ष आंबा, राज्य फूल जारूल नंतर आता महाराष्ट्राच्या मानचिन्हात ब्ल्यू मॉरमॉन या राज्य फुलपाखराची भर पडली आहे. राज्य फुलपाखरू घोषित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.**



राज्य फुलपाखरू ब्ल्यू मॉरमॉन




### बदल घडले आहेत...

- वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या मनुष्यहानीसाठीच्या अर्थसाहाय्याने पाच लाख रुपयांवरून आठ लाख रुपये अशी वाढ
- वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या शेतपीक आणि फळबागाच्या नुकसान भरपाईच्या रकमेत दुप्पट वाढ
- ब्ल्यू मॉरमॉन फुलपाखरू– राज्याचे नवे मानचिन्ह
- श्यामाप्रसाद मुखर्जी जनवन विकास योजना
- शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर व रोही या प्राण्यांच्या पारध करण्याच्या पद्धतीत सुलभीकरण
- महाराष्ट्र लोकसेवा हमी कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने वनविभागांतर्गत १० ऑनलाइन सेवा उपलब्ध
- तिवर संवर्धन प्रतिष्ठान स्थापन
- व्याघ्र संवर्धनाला चालना देण्यासाठी व्याघ्रदूत म्हणून ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची नियुक्ती
- हरित सेनेचे दूत म्हणून ज्येष्ठ क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांची नियुक्ती
- बांबूची शास्त्रोक्त लागवड आणि औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने चंद्रपूर जिल्ह्यातील चिचपल्ली येथे बांबूसंशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा निर्णय
- वन्य प्राण्यांचे संवर्धन व संरक्षणासाठी महाराष्ट्र वन्यजीव विकास निधी स्थापन करण्याचा निर्णय

# सुरक्षित आणि गतिमान



महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्याला एसटी गाडीने जोडले आहे. सर्वसामान्यांच्या सुलभ आणि स्वस्त प्रवासासाठी एसटीने बजावलेली भूमिका ऐतिहासिक स्वरूपाची आहे. एसटीने माणसे जशी जोडली, तसा महाराष्ट्रही जोडला. परिवहन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या एसटी महामंडळाला अधिक सक्षम करून नव्या आरामदायी आणि आधुनिक गाड्या देण्यावर मी गेले वर्षभर प्राधान्याने लक्ष पुरवले आहे. अनेक नवे निर्णय घेतले. त्याची गतिमान अंमलबजावणी करण्यावर भर दिला. एसटी प्रवास अधिक सुखकारक झाला आहे. मानव विकास योजनेंतर्गत १२२ तालुक्यांना प्रत्येकी दोन अशा २४४ गाड्या आम्ही देणार आहोत.

राज्यातील सर्व एसटी- बस स्थानकाचे आधुनिकीकरण व पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास प्रवासी कराच्या १७.५ टक्क्यांपैकी १० टक्के रक्कम भांडवली अंशदान म्हणून देण्याचा महत्त्वाचा निर्णय आम्ही घेतला. त्यामुळे राज्य मार्ग परिवहन महामंडळास ३५२ कोटी रुपये मिळतील.

इथेनॉल हे पर्यावरणस्नेही इंधन असल्याने त्याच्या वापरातून प्रदूषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत व्हावी, यासाठी नागपूर महानगरपालिकेत इथेनॉल बसला टप्पा वाहतुकीसाठी परवानगी दिली.

**दिवाकर रावते**

(परिवहन मंत्री)

**महाराष्ट्रातील लोकजीवनाशी एकरूप झालेला शासकीय उपक्रम म्हणून परिवहन विभागाचे कार्य निर्विवाद आहे. परिवहन विभागाची सेवा गावोगावी, दुर्गम भागापर्यंत जाऊन पोहोचली आहे. गाव तिथे एसटी हे वाक्य राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सार्थ केले आहे. परिवहन विभाग हा नेहमीच जनतेचा अतिशय जिव्हाळ्याचा आणि प्रत्येकाशी निगडित असा अविभाज्य घटक आहे. सुरक्षित, जलद आणि आरामदायी प्रवासासाठी परिवहन विभागाचा प्रमुख म्हणून गेल्या वर्षभरात मी अनेक प्रभावी निर्णय घेतले आहेत.**

## प्रवाशांना दिलासा

महिला प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी शेअर ए टॅक्सीमध्ये चालकाशेजारील आसन महिलांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय आम्ही अंमलात आणला. वाहतुकीची कोंडी कमी व्हावी, इंधनात बचत, प्रदूषणात घट व्हावी आणि या सर्व गोष्टींचा फायदा प्रवाशांसह प्रशासनाला व्हावा, यासाठी कल्याण शहरात शेअर रिक्षा आणि प्रिपेड रिक्षा योजनेची अंमलबजावणी १ जून २०१५ पासून करण्यात आली. यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला. ही सेवा कल्याण रेल्वे स्थानकापासून ८ कि.मी अंतराच्या परिसरात सध्या प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे.

या प्रवासासाठी प्रवाशांना मीटरप्रमाणे जे भाडे होते त्यात २० टक्के अधिक प्रवासी भाडे रिक्षाचालकास द्यावे लागते व सेवा पुरवठादारास प्रत्येक फेरीमागे ५ रुपयांचा आकार द्यावा लागतो. सेवापुरवठादार संगणकाच्या माध्यमातून रिक्षा चालकाचे छायाचित्र, रिक्षा क्रमांक आणि प्रवाशांचे छायाचित्र नोंदवून ठेवतो. ही सेवा रात्री-अपरात्री प्रवास करणाऱ्या महिलांना सुरक्षितता प्रदान करणारी आहे.

हकीम समितीने सुचवलेल्या ऑटो रिक्षा-टॅक्सीच्या भाडेदराबाबत पुनर्विचार करून सुधारित भाडेसूत्र निश्चित करणे, यासंबंधीच्या शिफारसी शासनास करणे यासाठी उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापली आहे. विविध कारणास्तव रद्द किंवा व्यपगत झालेल्या ऑटोरिक्षा परवान्यांची संख्या १,४०,०६५ इतकी आहे. या ऑटोरिक्षा परवान्यांचे नूतनीकरण करण्यात येईल. मुंबई महानगर क्षेत्रातील तरूणांना रोजगार उपलब्ध व्हावा, याकरिता १ लाख नवीन ऑटो परवाने लॉटरी पद्धतीने वाटप करण्यात येतील.

नागरिकांना त्यांच्या सोयीच्या वेळी अनुज्ञप्ती चाचणीस उपस्थित राहणे शक्य व्हावे यासाठी पक्क्या अनुज्ञप्तीसाठी ऑनलाइन अपॉइटमेंट देण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे नागरिकांच्या वेळेत बचत होणार आहे.



## नवे उपक्रम

मुंबई उपनगरातील बोरिवली येथे नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्यात आले. त्यामुळे बोरिवली ते दहिसर येथील नागरिकांची सोय होऊन त्यांच्या वेळेची आणि श्रमाची बचत झाली.

महामार्गावरील अपघाताची समस्या दिवसेंदिवस बिकट होत असल्याचे लक्षात घेता, चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) चाचणी केंद्र उभारण्याकरिता सार्वजनिक-खाजगी भागीदारी या तत्त्वानुसार योजना सुरू करणे प्रस्तावित आहे. यासाठी स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केली जाईल. हे काम करण्यासाठी व यासंबंधीचा सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.रस्ते सुरक्षेच्या आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी व यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी आणि सनियंत्रण करण्यासाठी राज्य रस्ते




सुरक्षा परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

दुचाकी वाहन चालकाने त्याच्या हेल्मेटचा वापर करणे सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्याची जाणीव करून देणे गरजेचे असल्याने परिवहन कार्यालयातून दुचाकी वाहनचालकांना सुरुवातीस शिकाऊ वाहन चालक परवाना दिला जात असताना हेल्मेट वापराविषयीचे बंधपत्र घेण्याचा निर्णय आम्ही घेतला असून त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

### विद्यार्थ्यांची सुरक्षितता

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला परिवहन विभागाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यासाठी स्कुलबसचे निश्चित ठिकाण शोधू शकणारे मोबाइल ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत पुणे येथे या ॲपचा प्रायोगिक तत्वावर वापर करण्यात येत आहे. हा ॲप अतिशय उपयुक्त असून त्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या स्कूल बसवर, स्कूलबसचे चालक व वाहकांवर पालकांना लक्ष ठेवणे शक्य होणार आहे. पत्राद्वारे स्कूल बस सुरक्षितता समितीशी संपर्क ठेवणेसुद्धा शक्य होणार आहे.

या पत्राद्वारे पालकांना वाहनाचा नोंदणी क्रमांक, वाहनचालकाचा भ्रमणध्वनी क्रमांक, स्कूलबस सुरक्षितता समिती सदस्यांची भ्रमणध्वनी क्रमांक, बस वाहतूक मार्ग आदी माहिती त्वरित उपलब्ध होणार आहे. मला विश्वास आहे की, या उपक्रमाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता जोपासणे सुलभ होईल.

### नवे रेल्वेमार्ग

शासनाच्या आर्थिक सहभागातून राबवण्यात येत असलेल्या ३ नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पांच्या सुधारित अंदाजपत्रकास व त्यानुसार शासनाच्या सहभागाची रक्कम टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पामध्ये अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ हा रेल्वे मार्ग त्यासाठी सुधारित अंदाजित किंमत ही रु. २८२६ कोटी आहे. त्यापैकी १४१३ (५० टक्के) हिस्सा हा राज्य शासनाचा आहे तर वडसा-देसाईगंज-गडचिरोली या नवीन रेल्वे मार्गाची सुधारित अंदाजित किंमत रु.४७० कोटी असून त्यापैकी २३५ कोटी (५० टक्के) आणि वर्धा-यवतमाळ-नांदेड मार्गाची सुधारीत अंदाजित किंमत रु. २५०० कोटीत असून त्यापैकी १००० कोटी रुपयांचा हिस्सा हा राज्य शासनाचा आहे. प्रलंबित रेल्वे प्रकल्पांची जलद अंमलबजावणी करण्याकरिता राज्य शासन व रेल्वे मंत्रालय यांच्या भागीदारीतून लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी स्थापण्यात येणार आहे. परिवहन विभागाने सर्वसामान्य माणसाला अपेक्षित असलेली गती घेतली आहे. महाराष्ट्राची रक्तवाहिनी असे जिची ओळख आहे त्या एसटीसह, रेल्वे मार्गांचा विकासाचा ध्यास असलेली परिवहन विभागाची ही वाटचाल त्यामुळेच सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. परिवहन विभागाची ही गती अशीच कायम ठेवून सर्वसामान्यांचा प्रवास सुखकर, आरामदायी आणि आनंदी व्हावा, हाच आमचा प्रयत्न आहे.

**शब्दांकन: पवन राठोड**




## बदल घडले आहेत...

- **शेअर ए टॅक्सीमधील पुढची सीट महिलांसाठी राखीव**
- **नागपूर महापालिका क्षेत्रात इथेनॉल बसला टप्पा वाहतुकीसाठी मंजुरी. प्रदूषण कमी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल**
- **निमआराम गाड्यांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय**
- **मानव विकास योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्याला दोन अशा १२२ तालुक्यांना मिळून २४४ बस गाड्या बांधण्याचे नियोजन.**
- **आणखी ७० शिवनेरी गाड्या घेण्याचा निर्णय, त्याबरोबर अजिंठा-वेरूळला आता शिवनेरीतून जाणे शक्य.**
- **एस.टी महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या विविध क्षेत्रातील सवलतीधारकांना आतापर्यंत १५ लाख स्मार्टकार्डचे वितरण.**
- **आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना कागदी तिकिटाऐवजी मोबाइलवरील एस.एम.एस. वर प्रवास करण्यास मुभा**
- **वातानुकूलित शिवनेरी बसमध्ये महिलांकरिता १० आसने आरक्षित**
- **प्रवाशांना आरामदायी प्रवास करता यावा म्हणून हिरकणी बसमध्ये पुश बॅक सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय २०१५-१६ या वर्षात अशा ५०० नवीन निमआराम गाड्या उपलब्ध करणार**
- **प्रवासी कराच्या १७.५ टक्क्यातील १० टक्के रक्कम एसटी आणि बस स्थानकांच्या आधुनिकीकरणासाठी वर्ग**

# चैतन्य शिक्षणातले...

**शिक्षण ही काळाची गरज असली तरी ते काळाशी सुसंगतच हवे, असे माझे मत आहे. म्हणूनच शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण किंवा वैद्यकीय शिक्षण या प्रत्येक स्तरावर काळानुरूप शिक्षणात बदल करणे आज आवश्यक झाले आहे. त्या अनुषंगाने गेले वर्षभर मी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घेतले. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य या विभागांचा प्राधान्यक्रम समजून घेतला. या सर्व विभागांना गतिमान करून कामकाजास नवी दिशा दिली आहे.**



शिक्षणाचे आज सार्वत्रिकीकरण झाले आहे. त्याचे बाजारीकरण होऊ नये यासाठी ठोस कायदा करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी ताकदीने करण्यात येईल. शुल्क नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी करीत असताना मनमानी शुल्क आकारणाऱ्या संस्थांना आळा बसणार आहे. शासनाने आणलेला शुल्क नियंत्रण व प्रवेश नियंत्रण अध्यादेश हा शिक्षण संस्थांच्या विरोधात नसून तो विद्यार्थी हिताचा आणि त्यांच्या उच्च शिक्षणाला प्राधान्य देणारा आहे. खाजगी शिक्षणसंस्था एका अर्थाने शासनाच्या शिक्षण देण्याच्या कामात मदत करीत आहेत. पण ज्या संस्था शैक्षणिक कार्याच्या नावाखाली व्यवसाय करत असतील, त्यांना या कायद्याच्या माध्यमातून चाप लावण्याचा निर्धार आम्ही केला आहे.


**विनोद तावडे**

(शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री)


### रोजगाराच्या संधी


आजच्या घडीला रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणे ही काळाची गरज असून, त्यासाठी कौशल्य आधारित अभ्यासक्रम उपलब्ध करण्यावर भर देण्यात येत आहे. तरुणांच्या हाताला काम मिळवून देणे आवश्यक आहे. पंतप्रधानांनी 'मेक इन इंडिया'चा नारा दिला तर राज्यात 'मेक इन महाराष्ट्र' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. आज अनेक परदेशी कंपन्या महाराष्ट्रात येत आहेत. बॉशसारखी कंपनी राज्यातील २५ आयटीआय चालवण्यास घेणार आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण देऊन त्यांना नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे.

शिक्षणासाठी करण्यात येणारा खर्च ही पुढील काळासाठीची गुंतवणूक आहे, असे मी मानतो. या वर्षी आम्ही एक निर्णय घेतला. दहावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची लगेचच फेरपरीक्षा घेण्याचा. यापूर्वी दहावीची फेर परीक्षा ऑक्टोबर महिन्यात घेतली जात होती. त्यामुळे नापास विद्यार्थ्यांचे पूर्ण वर्ष वाया जात होते. आता ऑक्टोबरची परीक्षा जुलैमध्येच घेण्यात आली. या फेरपरीक्षेमुळे ५७ हजार ५१७ विद्यार्थी जुलैच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक वर्ष वाचवण्यात यश आले. या निर्णयामुळे दहावीत असलेल्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना दिलासा मिळाला याचा आनंद आहे.

शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदी विचारात घेऊन पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ४ थी ऐवजी इयत्ता ५ वी मध्ये व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ७ वी ऐवजी इयत्ता ८ वी मध्ये घेण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे. यापुढे पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती योजना ही आता उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती योजना या नावाने ओळखली जाणार आहे.

ई-लर्निंगच्या धर्तीवर ई-बालभारती उपक्रम राबवण्यासाठी इयत्ता १ ली ते ८ वी ची सर्व पाठ्यपुस्तके बालभारतीच्या www.balbharati.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. केंद्र शासनाने सर्व क्रमिक पुस्तके ऑनलाइन उपलब्ध व्हावी या हेतूने सी-डॅक च्या मदतीने www.ebasta.in हे संकेतस्थळ तयार केले आहे. या संकेतस्थळावरही बालभारतीची पाठ्यपुस्तके उपलब्ध आहेत. २१ जून २०१५ हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून सर्व शाळा व महाविद्यालय, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये साजरा करण्यात आला. यावर्षी शाळा प्रारंभ होण्याच्या दिवशी शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम राबवला गेला. हा कार्यक्रम राबवण्याचे मुख्य उद्दिष्ट शाळेचा पहिला दिवस चैतन्यमय आणि उत्साहवर्धक वातावरणात व्हावा, तसेच शिक्षण क्षेत्राला गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळावी,असे होते. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आमदार दत्तक शाळा योजना सुरू करण्याचा विचार आहे.

शाळाबाह्य मुलांचा शोधासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे. या सर्वेक्षणासाठी महापालिकास्तरावर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या






अध्यक्षतेखाली, तालुकास्तरावर तहसीलदार व गावस्तरावर सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली समित्या गठित केल्या आहेत. स्थलांतरित मुलांना शिक्षण हमी पत्रक (Education Guarantee Card) दिले जाणार असून अशा स्थलांतरित मुलांना स्थलांतराच्या ठिकाणच्या शाळेत प्रवेश देऊन त्यांचे शिक्षणाचे सातत्य नियमित ठेवले जाईल.

### प्रतिभावान खेळाडूंची निर्मिती

महाराष्ट्रातील खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करीत असताना, या खेळाडूंना अधिकाधिक प्रोत्साहन देण्यासाठी कोणत्या योजना राबवता येतील, याचा अभ्यास करण्यात येत आहे. महाराष्ट्राचा क्रीडा नकाशा तयार करण्यात येत आहे.

साहसी खेळांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने गोविंदा या मानवी मनोरे उभारावयाच्या प्रकारास साहसी खेळाचा दर्जा देण्यात आला आहे. आदिवासी मुलांमधील क्रीडाविषयक उपजत गुणांना प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांना राज्यस्तरीय स्पर्धांचा दर्जा देण्यात आला आहे. या क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना २५ वाढीव क्रीडा गुण सवलत तसेच पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत ५ टक्के आरक्षणाच्या लाभासाठी पात्र ठरवण्यात आले आहे. महाराष्ट्राला कुस्तीची गौरवशाली परंपरा आहे. महाराष्ट्रात अधिकाधिक हिंदकेसरी निर्माण व्हावेत, यासाठी दहा ठिकाणी कुस्ती प्रशिक्षण केंद्रे उभारली जाणार आहेत. युवा दिनाचे औचित्य साधून युवा धोरणामधील शिफारशीनुसार विवेकानंद युवा मित्र / युवती मित्र योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे. राज्यातील ३५८ तालुके आणि बृहन्मुंबईतील २४ वार्डात ही योजना लागू करण्यात येईल. या योजनेला विवेकानंद युवा मित्र /युवती मित्र योजना म्हणून संबोधण्यात येईल.

### कौशल्य आधारित अभ्यासक्रम

भविष्यात तरुणांमधूनच मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. हे लक्षात घेता कौशल्य आधारित शिक्षणक्रम विकसित करण्याचा राज्य शासनाकडून प्रयत्न केला जाणार आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री म्हणून एक महत्त्वाचा निर्णय घेतला, तो म्हणजे एकच सामायिक सीईटी घेण्याचा. आता राज्यातील अभियांत्रिकी,


विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे

## बदल घडले आहेत...

- अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रम प्रथम वर्ष प्रवेशासाठी एकच सामायिक सीईटी घेण्याचा निर्णय
- शिक्षण हक्क कायद्यातील (RTE) तरतुदी विचारात घेऊन पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ४ थी ऐवजी इयत्ता ५ वी मध्ये व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ७ वी ऐवजी इयत्ता ८ वी मध्ये घेण्याचा निर्णय
- ई-लर्निंगच्या धर्तीवर ई-बालभारती उपक्रम राबवण्यासाठी इयत्ता १ ली ते ८ वी ची सर्व पाठ्यपुस्तके बालभारतीच्या www.balbharati.in या संकेतस्थळावर उपलब्ध
- शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी व्यापक सर्वेक्षण
- वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सामाईक परीक्षेत (सीईटी) सध्या सुरू असलेली निगेटिव्ह मार्किंगची पद्धत बंद
- सिनेमा आणि मालिका निर्मात्यांना त्यांचे काम जलद व्हावे, यासाठी चित्रीकरणापूर्वी देण्यात येणाऱ्या परवानग्यांसाठी एक खिडकी योजना
- गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी गडकिल्ले संवर्धन समिती स्थापन
- महाराष्ट्रात अधिकाधिक हिंदकेसरी निर्माण व्हावेत, यासाठी राज्यात दहा ठिकाणी कुस्ती प्रशिक्षण केंद्र उभारणार
- राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये चॉईस बेस क्रेडिट सिस्टिम
- शालेय विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती गठित

औषधनिर्माणशास्त्र आणि वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून (सन २०१६–१७) एकच सामायिक परीक्षा (एमएचटी–सीईटी) घेतली जाणार आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या बारावीच्या अभ्यासक्रमावर आधारित ही सीईटी होणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सर्व अकृषी विद्यापीठामध्ये चॉइस बेस क्रेडिट सिस्टिम (Choice Based Credit System) पद्धती लागू करण्याबाबत सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांना कळवण्यात आले आहे. आता विद्यापीठामध्ये टप्प्याटप्प्याने ही पद्धती लागू होईल.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये (यू.पी.एस.सी.) मुलाखतींना पात्र ठरलेल्या राज्यातील सुमारे दोनशे विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दिल्लीला क्षमता विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय दिल्लीच्या जुन्या महाराष्ट्र सदनात करण्यात आली.

## प्राथमिक शिक्षणाचे सबलीकरण

राज्याचे प्राथमिक शिक्षणाचे सबलीकरण करण्यासाठी राबवण्यात आलेल्या सर्वशिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाच्या यशस्वितेमुळे, उच्च शिक्षणाची गुणवत्ता व पाया यांचे सबलीकरण करण्यासाठी एकछत्री योजना अभियान स्वरूपात राबवण्याकरता केंद्र शासनाने राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान ही सुरू केलेली योजना राज्यात अतिशय प्रभावीरीत्या आम्ही राबवणार आहोत.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या (एनसीटीई) अधिसूचनेप्रमाणे, शासकीय व अशासकीय, अनुदानित / विनाअनुदानित व कायम अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील नियमित बी. एड. अभ्यासक्रम आता दोन वर्षांचा करण्यात आला आहे.

## चांगले डॉक्टर घडवणार

प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयांची गुणवत्ता वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. वैद्यकीय सेवा आणि गुणवत्ता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियमात केंद्राच्या धर्तीवर सुधारणा करण्यात येईल.

## चित्रीकरणासाठी एक खिडकी योजना

करमणूक क्षेत्रामार्फत शासनाला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. सिनेमा आणि मालिका यामधून मिळणारे उत्पन्न लक्षात घेता, सिनेमा आणि मालिका निर्मात्यांना त्यांचे काम जलद व्हावे, यासाठी चित्रीकरणापूर्वी देण्यात येणाऱ्या परवानग्यांसाठी एक खिडकी योजना तयार करण्यात येत आहे. या एक खिडकी योजनेंतर्गत सिनेमा आणि मालिकांना चित्रीकरणापूर्वी कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त ७ दिवसांच्या आत या सर्व परवानग्या दिल्या जातील.

## महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा

प्रायोगिक रंगभूमिला चालना देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे. देशविदेशातील कलाकारांना निवासस्थान व इतर सोयीसुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येतील. वयोवृद्ध कलावंतांना मिळणारे मानधन ऑनलाइन करण्याच्या योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे. लोककलांविषयक माहितीचे संकलन करण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ही माहिती लिखित व ध्वनिचित्रफीत स्वरूपात संगणकात साठवण्यात येत आहे.





**शालेय विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती गठित केली आहे. ही समिती विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कसे कमी करता येईल याबाबत उपाययोजना करणार आहे. जून २०१६ पासून विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी होईल.**

### चित्रपटनगरी आणि बॉलीवुड म्युझियम

चित्रपट नगरीला चित्रपट निर्मिती केंद्रासोबतच पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यात येणार आहे. गोरेगाव चित्रनगरी आणि बॉलीवूड म्युझियम हे सार्वजनिक खाजगी तत्त्वावर एकत्रितरीत्या विकसित करण्यात येणार आहे. यावर्षी समस्त महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशी घटना घडली, ती म्हणजे पंढरीच्या वारीची संकल्पना घेऊन प्रजासत्तक दिनाचा चित्ररथ बनवण्यात आला होता. या चित्ररथाने २६ जानेवारीच्या राजपथावर झालेल्या संचलनात प्रथम पारितोषिक मिळवले.

### मराठीला अभिजात दर्जा

मराठी भाषा विभागाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. या प्रयत्नांना केंद्र शासन सकारात्मक प्रतिसाद लवकरच देईल, असा विश्वास वाटतो.

मराठी भाषा विकासाचे धोरण ठरवण्यात येत आहे. महाराष्ट्र राजभाषा विधेयक विधानमंडळात संमत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या पुस्तक प्रकाशन योजनेंतर्गत मंडळाने लिहून घेतलेल्या पुस्तकाच्या लेखकास प्रत्येक प्रकाशनार्थ आणि हस्तलिखितांचे परीक्षण करण्यासाठी नियुक्त केलेल्या तज्ज्ञांचे परिश्रम विचारात घेऊन त्यांच्या मानधनात वाढ करण्यात आली. प्रकाशन योजनेंतर्गत, लेखक आणि परीक्षकांच्या मानधनात वाढ केली आहे. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने लिहून घेतलेल्या पुस्तकाच्या लेखकांच्या मानधनात वाढ केली आहे. वाचन संस्कृतीच्या विकासामध्ये साहित्यविषयक संस्था, प्रकाशक, पुस्तक विक्रेते आणि ग्रंथालये यांची भूमिका महत्त्वाची आहे. ही बाब लक्षात घेऊन जागतिक पुस्तक दिनी म्हणजेच २३ एप्रिल रोजी विविध उपक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रसिकांपर्यंत पोहोचावीत हा उद्देश आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ आणि भाषा सल्लागार समिती यांची पुनर्रचना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी बाबा भांड यांची महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाच्या अध्यक्षपदी दिलीप करंबेळकर यांची आणि भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी सदानंद मोरे यांची निवड करण्यात आली आहे. विश्वकोषाचे खंड मंडळाच्या www.vishwakosh.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. मराठी भाषेतील साहित्य इतर भाषांमध्ये अनुवादित झाले पाहिजे आणि इतर भाषेतील साहित्य मोठ्या प्रमाणात मराठी भाषेत यायला हवे, यासाठी मराठी भाषा विभाग प्रयत्नशील आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके**




### बदल घडले आहेत...

- महाराष्ट्रात चित्रपट किंवा लघुचित्रपट निर्मिती करू इच्छिणाऱ्यांना एका दिवसात परवानगी मिळणार
- नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाच्या धर्तीवर गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा उभारणार
- शिवकालीन, ऐतिहासिक गडकोट हीच छत्रपती शिवरायांची खरी व अर्थपूर्ण स्मारके आहेत, हे लक्षात घेऊनच अनेक किल्ल्यांना संरक्षित स्मारक म्हणून मान्यता
- पुस्तकाच्या गावाचा संकल्पनात्मक पातळीवर विचार सुरू. ब्रिटनमधील 'ऑन वे' या पुस्तकांच्या गावासारखे महाराष्ट्रात महाबळेश्वरजवळ किंवा कोकणात मालुगंड येथे अशा प्रकारचे पुस्तकांचे गाव उभे करता येईल का, याचा अभ्यास सुरू
- शाळा/महाविद्यालयांमध्ये २०१६ पासून १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय
- भाषा संचालनालयांतर्गत वैज्ञानिक व तांत्रिक विषयावरील परिभाषा कोशामध्ये सुधारणा करण्याकरिता प्रत्येक विषयाच्या स्वतंत्र उपसमितीस मंजुरी
- मराठी भाषा विकासाचे धोरण ठरवण्यात येत असून महाराष्ट्र राजभाषा विधेयक विधानमंडळात संमत
- १५ ऑक्टोबर हा दिवस भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा

# हरित पर्यावरण, हरित महाराष्ट्र



**पर्यावरण विभाग सर्वांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असल्यामुळे तो अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाचा संबंध पाणी, हवा आणि ध्वनी यामुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाशी आणि उद्योग, वन विभाग, समुद्र किनारपट्टी संरक्षण अशा अनेक विषयांशी येतो. कारखान्यांमधून होणारे वेगवेगळ्या प्रकारचे उत्सर्जन, डम्पिंग ग्राऊंडची समस्या, सांडपाणी व्यवस्था, हवेचे प्रदूषण, दवाखान्यातील घातक असा कचरा अशा अनेक बाबींशी थेट संबंध येतो. सर्वसामान्य जनतेला पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी जागृत करणे आणि पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे हे पर्यावरण मंत्री म्हणून मी माझे कर्तव्य समजतो. हा विभाग लोकाभिमुख करून लोकसहभाग वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.**

**रामदास कदम**
(पर्यावरण मंत्री)

वातावरणीय बदल लक्षात घेता पर्यावरण संरक्षणासाठी पर्यावरण विभागातर्फे विविध उपक्रम राबवले जात आहेत. पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी, म्हणून पोषक वातावरणाची निर्मिती करणे हे पर्यावरण विभागाचे मुख्य उद्दिष्ट आहे. काही महत्त्वाच्या प्रकल्पांना मंजुरी देताना पर्यावरण संतुलित राहील, यासाठी काही अटी आणि सूचना देण्याचे काम या विभागामार्फत केले जाते.

आगामी काळात पर्यावरण विभागांतर्गत असलेले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिक सक्षम करण्याचा माझा प्रयत्न आहे. पर्यावरण विभागामार्फत सर्व प्रकारच्या (हवा, ध्वनी, जल) प्रदूषणावर नियंत्रण ठेवले जाते. या संदर्भात केंद्र शासनाने अधिनियम तयार केले असून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केले जाते. प्रदूषण रोखण्यासाठी येत्या काळात ठोस पावले उचलण्याचे काम केले जाईल.

प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर नियंत्रण आणण्यासाठी ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्यांच्या उत्पादन व वितरणावर बंदी घातली आहे. प्लॅस्टिकला पर्याय म्हणून कागद व कापडाच्या पिशव्या वापरण्यासाठी पर्यावरण विभागामार्फत लोकांना प्रोत्साहित केले जात आहे.

## लोकसहभागास प्राधान्य

लोकसहभागाशिवाय कोणतेही काम यशस्वी होत नाही. त्यामुळेच पर्यावरण विभाग लोकाभिमुख करण्यासाठी विविध निर्णय घेतले आहेत.
पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने, मी महाराष्ट्रभर दौरे करीत असून प्रत्येक ठिकाणी पर्यावरणाच्या काय समस्या आहेत; हे जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. उदाहरण म्हणून सांगतो की, माझ्या एका दौऱ्यात वालधुनी नदीच्या प्रदूषणाची समस्या माझ्या निदर्शनास आली. याप्रकरणी लगेच पावले उचलून वालधुनी नदीतील प्रदूषणाला कारणीभूत असणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आली. मिठी नदीची पाहणी केल्यावर तेथील अतिक्रमण व बेकायदेशीर उद्योग यांनी निर्माण केलेल्या समस्यांची व्याप्ती माझ्या लक्षात आली. तेथील सांडपाण्यासाठी वेगळी पाइपलाइन टाकून ते सांडपाणी प्रक्रिया करून समुद्रात सोडल्यास मिठी नदीच्या प्रदूषणाला आळा बसू शकेल, असे माझ्या लक्षात आले म्हणून त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## नवे उपक्रम

पर्यावरण मंत्री म्हणून मी काही नवीन उपक्रम सुरू केले आहेत. पर्यावरण अनुमतीसाठी आता ऑनलाइन अर्ज करता येतात. www.environmentalclearance.nic.in आणि ec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अनुमती संदर्भात बैठकांचे निर्णय, विषयसूची, प्रतीक्षा यादी, बैठकांचे वेळापत्रक, सूचना व पर्यावरण अनुमतीबाबत सर्व माहिती देण्यात येते. पर्यावरणाचे रक्षण करण्याची आपली जबाबदारी उद्योजकांनीही ओळखली जाणे आवश्यक आहे. तसेच सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन यांचे योग्य नियोजन नगरपालिकांनी करणे आवश्यक आहे. यामुळेच पर्यावरणासाठी चांगले काम करणाऱ्यांचा गौरव आता यापुढे करण्यात येईल.



## हरित मार्गदर्शक

जलप्रदूषण रोखण्यासाठी पर्यावरणीय अनुमतीस पात्र सर्व इमारत व वसाहतींना सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बांधणे व वापरणे

बंधनकारक केल्याने; शहराच्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेवरील ताण कमी करण्याबरोबरच नवीन प्रकल्पांमुळे जलप्रदूषण होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. नवीन प्रकल्पांना नागरी घनकचरा प्रकल्पांतर्गतच प्रक्रिया करून त्यांची विल्हेवाट लावणे बंधनकारक केले असल्याने; घनकचऱ्यामुळे होणारे प्रदूषण कमी होण्यास मदत होत आहे. हरित मार्गदर्शक तत्त्वानुसार असणाऱ्या बांधकामांना प्राधान्यक्रम देऊन प्रोत्साहन देण्यात येत आहे. याशिवाय कार्बन फूट प्रिंट कमी करण्यासाठी नवीन बांधकाम प्रकल्प व उद्योग प्रकल्पांमध्ये सौर ऊर्जेचा / पवन ऊर्जेचा कमीत कमी २५ टक्के वाटा असणे बंधनकारक करण्यात आले आहे. पाण्याची टंचाई लक्षात घेता उद्योगातून व घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंगचे प्रयोगही करण्यात येत आहेत.

### सागरी मार्ग

मी आर्वजून उल्लेख करीन तो म्हणजे केंद्र सरकारने मुंबई सागरी मार्गास दिलेल्या मंजुरीचा. या सागरी मार्गामुळे मुंबईतील वाहतुकीवरचा ताण कमी होण्यास मदत होईल. सध्या मुंबईतील ६० टक्के वाहतूक ही पश्चिम द्रुतगती मार्गावरून होते. सागरी मार्गामुळे पश्चिम एक्सप्रेसवरील वाहतुकीचा ताण कमी होईल. या सागरी मार्गावर ९१ हेक्टर जागेत हरित क्षेत्र तयार करण्यात येणार आहे.

### नदी प्रदूषण रोखण्यासाठी

नदीचे प्रदूषण हा मोठा विषय आहे. त्यामुळे तो रोखण्यासाठी नदी किनारी नदीतील प्रदूषणाची माहिती देणारे फलक लावण्यात येणार आहेत. नदीच्या पाण्याची गुणवत्ता, त्यातील प्रदूषणाची पातळी, नदी दूषित करणाऱ्या घटकांचे प्रमाण याबाबतची माहिती दर पंधरा दिवसांनी अद्ययावत करण्यात येणार आहे. कंपन्यांनी नफा मिळवतानाच सामाजिक जाणीव ठेवावी आणि आपल्या उत्पन्नातील काही भाग समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी खर्च करावा, या उद्देशाने प्रत्येक कंपनीने कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सामाजिक उत्तरदायित्व) उचलणे कायद्याने बंधनकारक आहे. एकूणच राज्यातील पर्यावरण चांगले राहावे, यासाठी आमचा विभाग प्रयत्नशील असून पहिल्याच वर्षी आम्ही अनेक बाबतीत यशस्वीही झालो आहोत.

**शब्दांकन : वर्षा फडके**






## बदल घडले आहेत...

- प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर नियंत्रण आणण्यासाठी ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्यांच्या उत्पादनावर व वितरणावर बंदी.
- पर्यावरण अनुमतीसाठी आता ऑनलाइन अर्ज करता येतात.
- जलप्रदूषण रोखण्यासाठी पर्यावरणीय अनुमतीस पात्र सर्व इमारत व वसाहतींना सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बांधणे व वापरणे बंधनकारक
- नवीन प्रकल्पांना नागरी घनकचरा प्रकल्पाअंतर्गतच प्रक्रिया करून त्यांची विल्हेवाट लावणे बंधनकारक
- सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद यांनी शांतता क्षेत्रे निश्चित करून त्या ठिकाणी शांतता क्षेत्र असा फलक लावणे बंधनकारक
- नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी नदी किनारी नदीतील प्रदूषणाची माहिती देणारे फलक लावणे बंधनकारक
- ध्वनिप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस आयुक्त, उपायुक्त किंवा साहाय्यक पोलीस आयुक्त आणि इतर क्षेत्रांमध्ये संबंधित पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधिक्षक यांची ध्वनिप्राधिकरण म्हणून नियुक्ती
- उद्योगांद्वारे होणारे जलप्रदूषण रोखण्यासाठी उद्योगांना अनुमती देताना शून्य निष्कासन यंत्रणा बसवणार

# घरकूल हक्काचे

**गृहनिर्माण, खनिकर्म आणि कामगार विभाग मंत्री या नात्याने मी गेल्या वर्षभरात सर्वसामान्यांना परवडतील अशा घरांची उपलब्धता आणि झोपडपट्टी पुनर्वसन व संरक्षण करण्यासंदर्भात लक्ष केंद्रित केले. कामगारांचे कल्याण व सर्वांगीण विकास करणे आणि राज्यातील खनिज संपत्तीचे संवर्धन व जतन करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.**

महाराष्ट्र हे देशातील झपाट्याने नागरीकरण होत असलेले राज्य आहे. या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून त्यांच्या अपेक्षापूर्ण करणे आणि विकास करणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. राज्यातील सर्वसामान्य माणसाला स्वत:च्या घरकुलाचे स्वप्न साकार करता यावे, यासाठी केंद्र शासन २०२२ पर्यंत विशेष अभियान राबवणार आहे. या अभियानांतर्गत सर्वांसाठी घरे पुढील ५ वर्षात महाराष्ट्र



सरकारने जवळपास १९ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. राज्यातील प्रत्येक कुटुंबाला घरे देणे हे आमच्या सरकारचे मुख्य उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट समोर ठेवून गृहनिर्माण धोरणाचा आराखडा तयार करण्यात येत आहे. सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या निधीतून शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाला रुपये ५०० कोटी निधी देण्यात येईल.

### परवडणारी घरे

अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तींना परवडणारी घरे उपलब्ध करून देणे हा आम्ही तयार करीत असलेल्या गृहनिर्माण धोरणाचा मुख्य गाभा आहे. वेगाने नागरीकरण होत असलेल्या देशात निवारा ही एक आव्हानात्मक बाब आहे. गृहनिर्माण हे केवळ विटांचे किंवा मातीचे बांधकाम अशी संकल्पना नसून त्यामध्ये आवश्यक मुलभूत सुविधा, सुलभ दळणवळण व रोजगार निर्मिती या बाबीसुद्धा अंतर्भूत आहेत. मुंबईतील झोपडपट्टी व जुन्या इमारतींचा पुनर्विकास, बी.डी.डी. चाळ व अशा अन्य जुन्या वसाहतींचा पुनर्विकास, म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास यातून मोठ्या प्रमाणावर परवडणारी घरे उपलब्ध होऊ शकतात.

झोपडपट्टीविकासासंदर्भातही शासनाने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहे. झोपडीत राहणाऱ्या झोपडीधारकाची पात्रता निश्चितीसाठी पूर्वी बरेच पुरावे सादर करावे लागत होते. ही समस्या लक्षात घेऊन एक किंवा दोन पुरावे दिल्यास ते ग्राह्य धरण्यात यावे, असा निर्णय घेतला. १०० रुपयांच्या मुद्रांकावरील शपथपत्राऐवजी कागदावरील स्वयंघोषणापत्र ग्राह्य धरण्यात येईल. ही सोपी पद्धत सुरू केली. डोंगर उतारावर धोकादायक दरडीखालील राहणाऱ्या झोपडपट्टीधारकांना पावसाळ्यात डोंगरावरून येणाऱ्या दगड, पाणी, दरडी कोसळणे यांचा त्रास होऊन या परिस्थितीशी सामना करावा लागतो. अशा झोपडपट्टीधारकांच्या संरक्षणासाठी ९ मी. उंचीची संरक्षक भिंत बांधण्यात यावी, यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली आहेत.

### लोकसेवा मित्र

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरुत्थान अभियानांतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने २०० कोटी रुपयांचे अतिरिक्त अनुदान दिले आहे. महाराष्ट्र लोकसेवा हमी विधेयकांतर्गत म्हाडा कार्यालयाने लोकसेवा मित्र प्रणाली सुविधा ऑनलाइन सुरू केली आहे. म्हाडाने छापलेल्या माहिती पुस्तिकेत नागरिकांची सनद आहे. त्याप्रमाणे म्हाडातील अधिकाऱ्यांकडून जर काही अनियमितता होत असल्यास त्यासंदर्भात न्याय मागण्यासाठी म्हाडाकडे दक्षता विभागाची स्थापना केली आहे.

**प्रकाश महेता**
(गृहनिर्माण, खनिकर्म आणि कामगार मंत्री)

### कामगार विभाग

'मेक इन महाराष्ट्र' धोरणानुसार राज्यात अधिकतम गुंतवणूक व्हावी यासाठी सुलभीकरण व प्रोत्साहन देण्यासाठी विविध कामगार कायद्यात सुधारणा केल्या आहेत. नोंदणी/नूतनीकरण आणि परवान्यासाठी केलेल्या अर्जावर विहित मुदतीत कारवाई न झाल्यास भरलेले चलन हेच नोंदणी दाखला आहे, असे गृहीत धरण्याची तरतूद केली आहे. सर्व व्यावसायिकांना कामगार कायद्यातील






विहित नमुन्यातील नोंद वह्या व अभिलेख संगणकीकृत करून संकलित व जतन करण्याची परवानगी दिली आहे. आता प्रत्येक आस्थापनेला आपला अभिलेख जतन करण्यासाठी कामगार आयुक्तांची परवानगी घेण्याची आवश्यकता राहिलेली नाही. प्रत्येक दुकान, व्यवसाय किंवा आस्थापना आठवड्यातून एक दिवस बंद ठेवणे बंधनकारक होते. परंतु आता दुकाने आठवड्यातून सातही दिवस कार्यरत ठेवण्याची मुभा दिली आहे. कामगारांना आठवड्यातून एक दिवस सुट्टी देणे मात्र बंधनकारक आहे. व्यावसायिकांसाठी स्वयंप्रमाणिकीकरण योजनेंतर्गत उपाययोजनांचा ४० हजार कारखाने आस्थापनांना लाभ झाला आहे. कामगार विभागामार्फत पुरवण्यात येणाऱ्या सेवा ऑनलाइन पद्धतीने देण्याकरिता, संगणक प्रणाली विकसित करण्याच्या अंतिम टप्प्यात आहे.

### खनिकर्म विभाग

राष्ट्राच्या खनिज संपत्तीचे जतन (Conservation) करणे आणि विविध खाणींच्या शास्त्रपूर्ण विकासाला चालना देणे, राज्यात किंवा अन्यत्र कोणत्याही खाणी, खनिकर्माचे हक्क व धातूयुक्त जमीन (Metalliferous land) आणि त्यांतील हितसंबंधी, खरेदी करणे, पट्ट्यावर किंवा अन्यथा मिळवणे, त्यात शोधकार्य करणे, विकास करणे हा मुख्य उद्देश खनिकर्म विभागाचा आहे.

२०१५ पूर्वी खनिज सवलती अंतर्गत विविध खनिजांचे खाणपट्टे मंजुरीबाबतचे शासनाकडे विचाराधीन असलेले तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर व जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या स्तरावर प्रलंबित असलेले सर्व २७७ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. प्रमुख खनिजाबाबत खनिज सवलती, लिलाव प्रक्रियेद्वारे मंजूर करण्याच्या अनुषंगाने शासनास मार्गदर्शन करण्यासाठी; राज्यस्तरीय खनिज समन्वय व शक्तीप्रदान समिती व लिलाव प्रक्रियेद्वारे खाणपट्टा वाटप झाल्यानंतर सर्व परवाने वा ना हरकती, सुलभतेने प्राप्त करण्यासाठी खनिज साहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. गेल्या वर्षभरात राज्याला झोपडपट्टीमुक्त करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलेले आहे. त्यांचा विकास व पुनर्वसन करणे आणि प्रत्येक नागरिकाला परवडणाऱ्या किंमतीत हक्काचे घर उपलब्ध करून त्यांचे बळकटीकरणास प्राधान्य देण्यात येत आहे. कामगारांच्या विविध समस्या सोडवून त्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवण्यात येत आहे. राज्यातील खनिज संपत्तीचे जतन व संवर्धन करणे यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.

**शब्दांकन :जयश्री कोल्हे**



## बदल घडले आहेत...

- परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या निधीतून शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाला ५०० कोटी निधी देण्याचा निर्णय
- झोपडीत राहणाऱ्या झोपडीधारकाची पात्रता निश्चित करण्यासाठी एक किंवा दोन पुरावे दिल्यास ते ग्राह्य धरणार
- १०० रुपयांच्या मुद्रांकावरील शपथपत्र रद्द. साध्या कागदावरील स्वयंघोषणापत्र ग्राह्य
- व्यवसाय करण्यास सुलभीकरण व प्रोत्साहन देण्यासाठी कामगार कायद्यात सुधारणा
- यापुढे व्यवसायकरिता दुकाने आठवड्यातून सातही दिवस कार्यरत ठेवण्याची मुभा
- कामगार विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा ऑनलाइन पद्धतीने देण्याकरिता संगणक प्रणाली विकसित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात
- कामगारांना पगारी रजा मिळावी यासाठी कामाच्या दिवसांची मर्यादा २४० वरून ९० दिवस करणे प्रस्तावित. यामुळे जास्तीत जास्त कामगारांना आर्थिक लाभ
- विद्युतचलित तसेच विजेच्या वापराविना चालणाऱ्या कारखान्यातील कामगारांच्या संख्येत १० ऐवजी २० व २० ऐवजी ४० अशी वाढ. यामुळे सुमारे १४,३०० कारखाने, कारखाने अधिनियमाच्या कक्षेतून वगळल्याने लघु उद्योजकांना लाभ होऊन त्यांचे उत्पादन वाढेल.

# स्मार्ट शहरांसाठी सुंदर रस्ते

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेत विशेष स्थान आहे. मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग, मुंबईतील ५५ उड्डाणपुले किंवा वांद्रे-वरळी सी-लिंक असे महत्त्वाचे उपक्रम यशस्वीरीत्या राबवून राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचे काम या महामंडळाने केले आहे. आता माझ्या नेतृत्वाखाली महामंडळाने राज्यात दर्जेदार रस्त्यांचे जाळे उभारण्याची महत्त्वाकांक्षी योजना आखली आहे. त्यामुळे स्मार्ट सिटींच्या देखणेपणात भर पडणार आहे.**



**एकनाथ शिंदे**
(सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम) मंत्री)

असे म्हणतात की, ज्या देशातील रस्त्यांचे जाळे अधिक मजबूत, सुरक्षित असेल, तो देश प्रगतिपथावर असतो. नेमके हेच सूत्र लक्षात ठेवून सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांचे जाळे अधिक सक्षम, सुरक्षित आणि दर्जेदार करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली आहे. राज्यातील स्मार्ट सिटींच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधान्य दिले आहे. या स्मार्ट सिटीच्या संकल्पनेत रस्ते विकास, रस्त्यांचे जाळे निर्माण करणे महत्त्वाचे आहे. माझ्याकडे असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्यांतर्गत येणाऱ्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला स्मार्ट सिटीच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजवावी लागणार आहे. त्यामुळे स्मार्ट सिटीबरोबर महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आजतागायत राज्याच्या विकासात भरीव योगदान दिले आहे. आता स्मार्ट सिटीकरिता राज्यात रस्त्यांचे विशाल जाळे उभारण्यासाठी अनेक योजना राबवण्यात येणार आहेत.

वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, पर्यटनविकास, दळणवळण सुधारणा आदी बाबी विचारात घेऊन रस्ते विकास आराखडा निश्चित करण्यात येत आहे. राज्यात ३ लाख ३६ हजार कि.मी. रस्ते बांधण्यात येणार आहेत. या कामाकरिता पाच वर्षांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

राष्ट्रीय महामार्ग तसेच मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रेंगाळलेल्या कामांना गती देण्याचे प्रस्तावित आहे. त्याचबरोबर रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येणार आहे.

### सुपर कम्युनिकेशन एक्स्प्रेस वे

सध्या राज्य रस्ते विकास महामंडळाने मुंबई–नागपूर हा सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे तयार करण्याकरिता योजना आखली आहे. मुंबईतील बोरिवली येथे ठाण्यावरून जाण्याकरिता भुयारी मार्गाची संकल्पना तयार केली आहे. बऱ्याच महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर सध्या राज्य रस्ते विकास महामंडळ काम करीत आहे. महाराष्ट्रात रस्त्यांचे विशाल जाळे निर्माण करून राज्याला प्रगतीकडे नेण्यासाठी भर देण्यात येणार आहे.

रस्ते विकास महामंडळाने भरपूर प्रकल्प हाती घेतले असले तरी कोणत्याही प्रकल्पासाठी लागणारा निधी कमी पडणार नाही, याचा मला पूर्ण विश्वास आहे. आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावर अर्थसाहाय्यता करणाऱ्या वित्तसंस्था अत्यंत अल्पदरात अर्थपुरवठा करण्यास तयार आहेत. मला सांगायला आनंद वाटतो की, जपानी अर्थसंस्था 'जायका' महाराष्ट्रास अर्थपुरवठा करण्यास तयार आहे. अर्थातच निधीअभावी कोणतेही प्रकल्प अपूर्ण राहणार नाहीत, हे खरे.

मुख्यमंत्र्यांनी रस्ते विकास महामंडळाची स्थिती सदृढ करण्यासाठी शब्द दिला आहे. त्यामुळे महामंडळाचे कामकाज गतिमान पद्धतीने व्हावे, याकडे मी स्वत: लक्ष केंद्रित केले आहे. उद्योगाची भरभराट व्हायची असेल तर सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा निर्माण करणे गरजेचे असते.



रस्ते विकास महामंडळाने दर्जेदार काम करून आपली गुणवत्ता दर्जेदार असल्याची ग्वाही यापूर्वीच दिली आहे. या महामंडळाने मुंबई–पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग अत्यंत कमी कालावधीत पूर्ण केला. त्याचबरोबरच गुणवत्ताही सांभाळली. त्यामुळे मुंबई–पुणे यशवंतराव चव्हाण हा द्रुतगती मार्ग आज सुस्थितीत आहे. हा दांडगा अनुभव लक्षात घेता राज्यातील मोठ्या प्रकल्पांची अंमलबजावणी रस्ते विकास महामंडळाकडे असावी, असे मला वाटते.

### टोलमुक्ती

आम्ही निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे राज्यातील जनतेवर

लादलेला टोल हटवला आहे. आज अलिबाग-पेण-खोपोली मार्ग (वडखळ टोलनाका), चाकण-शिक्रापूर ( शिक्रापूर टोलनाका), मोहोळ-कामती (मोहोळ टोलनाका), वडगाव-चाकण-शिक्रापूर रस्ता (भंडारा डोंगर टोलनाका), टेंभुर्णी-कुर्डुवाडी-बार्शी-लातूर रस्ता (कुसळब टोलनाका), नगर-करमाळा-टेंभुर्णी रस्ता (अकोले खु. टोलनाका), नाशिक-दिंडोरी-वणी-सप्तश्रृंगी गड रस्ता (ढकांबे, नांदुरी आणि सप्तश्रृंगी टोलनाके), भुसावळ-यावल (तापी पुलाजवळील टोलनाका), खामगाव बाह्यवळण (रावणटेकडी) आणि रेल्वे ओव्हरब्रिज तडाली, चंद्रपूर (तडाली टोल नाका) अशी १२ टोलनाके आम्ही कायमची बंद केली आहे. तर भिवंडी- वडपे (कशेळी टोलनाका), चिंचोटी कामण पायगाव, मनोर-वाडा-भिवंडी, सायन-पनवेल राज्यमार्ग (पुणे आणि मुंबईकडील दोन्ही दिशांवरील टोलनाके), नाशिक-निफाड-औरंगाबाद (शिलापूर आणि अंदरसूल टोलनाके), नगर-वडाळा-औरंगाबाद ( शेंडीजवळ टोलनाका), नगर-औरंगाबाद मार्गावरील वडाळा ते वाळुंज (खडकाफाटा आणि लिंबेगाव टोलनाके), नगर-कोपरगाव (देहरे गावाजवळील टोलनाका), पुणे-नगर मार्ग ( म्हसणे फाटा टोलनाका), प्रकाशाविंचूर-सामोडा-छडवेल (भाबडबारी व शेलबरी टोलनाके), चांदवड-मनमाड-नांदगाव (दुगाल, पानेवाडी टोलनाके), मालेगाव-कोपरगाव रस्ता (पिंपळगाव), औरंगाबाद-जालना रस्ता, नांदेड-नरसी-देगलूर रस्ता, नरसी-बिलोली रस्ता, जालना-वाटूरफाटा (पिंपरी फाटा), मलकापूर-बुलडाणा रस्ता, जाम-वरोरा-आसिफाबाद रस्ता (आरंभा), वरोरा-चंद्रपूर-बामणी रस्ता, रेल्वे उड्डाणपूल, दौंड (दौंड टोलनाका), रेल्वे उड्डाणपूल, केडगाव, जि. पुणे (केडगाव टोलनाका), रेल्वे उड्डाणपूल, मूर्तिजापूर, जि. अमरावती (मूर्तिजापूर टोलनाका), एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, औरंगाबाद , एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, नागपूर, एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, सोलापूर, एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, बारामती (भिगवण, इंदापूर, नीरा, मोरगाव, पायस ते बारामती रस्त्यांवरील टोलनाके), चाळीसगाव वळण रस्ता व रेल्वे उड्डाणपूल (चाळीसगाव पथकर टोलनाका), ठाणे-घोडबंदर रस्ता (गायमुख टोलनाका), चिमूर-वरोरा-वणी रस्ता (रेल्वे उड्डाणपूल पोच रस्ता टोलनाका), नागपूर-जलालखेडा मार्ग व उड्डाणपूल (काटोल टोलनाका) आणि भिवंडी-कल्याण-शीळ रस्ता (काटई नाका व गोवे गावाजवळचा टोलनाका) या टोलनाक्यावर कार, जीप, एस.टी. बसना टोलमधून सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे सरकारने राज्यातील जनतेस टोलमुक्तीचा मोठा दिलासा दिला आहे, असे म्हणावे लागेल.

**शब्दांकन :**
**डॉ.संभाजी खराट, संजय ओरके**






## बदल घडले आहेत...

- **विविध जिल्ह्यातील रस्त्यांची पाहणी करून त्यातील अतिशय खराब झालेल्या १२०० कि.मी. रस्त्यांचे तत्काळ नूतनीकरण**
- **३ लाख ३६ हजार कि.मी. रस्ते बांधण्यात येणार. १२०० कि.मी. रस्त्यांचे तत्काळ नूतनीकरण करणार**
- **खंडाळा बोगद्याची लांबी वाढविण्यात येणार असून द्रुतगती मार्गावर दरड कोसळण्याचे प्रमाण पाहता त्यासाठी पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाचे भूगर्भशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात येणार आहे.**
- **द्रुतगती मार्गावर दरड कोसळण्याचे प्रमाण पाहता पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाचे भूगर्भशास्त्रीय सर्वेक्षण करणार**
- **रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत**
- **मुंबई-नागपूर हा सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे महामंडळ तयार करणार**
- **नागपूर येथील संत्रा मार्केट रेल्वे उड्डाणपूल (रामझुला) वाहतुकीसाठी खुला**
- **प्रमुख शहरे एकमेकांशी जोडून एकत्रित रस्ते विकास योजना राबवण्यासाठी महामंडळाची पूर्ण तयारी**
- **रस्त्यांवर होणारे अपघात पाहता रोड मॅनेजमेंट सिस्टिमसाठी सल्लागारांची नियुक्ती करण्यात येणार असून संगणकीय प्रणालीद्वारे रस्त्यांची माहिती संकलित करणार.**
- **रस्ते विकास महामंडळास जपानी अर्थसंस्था 'जायका' अर्थपुरवठा करण्यास तयार**

# समृद्धीचे महामार्ग

**सहकार, पणन, वस्त्रोद्योग आणि सार्वजनिक बांधकाम या सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांशी निगडित असलेल्या विभागाचा मंत्री म्हणून माझ्या कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण होत आहे. सर्वसामान्य माणसांच्या आशाआकांक्षा पूर्ण करण्याबरोबरच राज्याचा सर्वांगीण विकास केंद्रीभूत ठेवून माझ्या विभागांनी केलेल्या कामांमुळे मला मनस्वी आनंद होत आहे.**



सार्वजनिक बांधकाम विभागास यावर्षीच्या अर्थसंकल्पात रुपये ३७०० कोटी इतका निधी मंजूर केला असून या निधीच्या ७० टक्के निधी वर्षाच्या पहिल्या महिन्यामध्ये विभागास उपलब्ध झाला. राज्यात रस्त्यांचे जाळे अधिक घट्ट करण्यासाठी राज्य मार्गावरील रुपये १३६५ कोटींची, प्रमुख जिल्हा मार्गावरील रुपये ८८२ कोटींची, नाबार्ड कर्ज साहाय्य योजनेंतर्गत रुपये ७०० कोटींची, केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत रुपये १७१८ कोटींची व रेल्वे उड्डाण पुलाचे रुपये २५ कोटींची कामे अशी एकूण रुपये ४,६९० कोटींची कामे अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

### मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण

मुंबई–गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे काम लवकर पूर्ण होण्यासाठी प्राधान्याने लक्ष घातले असून प्रदीर्घ काळ रखडलेल्या पनवेल–इंदापूर पट्ट्यातील भूसंपादनासाठी लोकप्रतिनिधींसह आवश्यक घटकांना विश्वासात घेऊन कार्यवाही सुरू आहे.

**चंद्रकांत (दादा) पाटील**
(सहकार, पणन, वस्त्रोद्योग आणि सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री)

### रस्ते विकास आराखडा

रस्ते विकास आराखड्यानुसार राज्यात एकूण ३,३६,००० कि.मी लांबीच्या रस्त्यांचे जाळे विकसित करण्याचा निर्धार आहे. रस्त्यांच्या कामांचा दर्जा सुधारण्यासाठी स्काडा प्रणालीचा वापर, ३० वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या पुलांची देखभाल व दुरुस्तीसाठी पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट तर मोठ्या कामांच्या निविदेत पुढील ५ वर्षे देखभाल दुरुस्तीची अट समाविष्ट करण्याचे नियोजन आहे.

### टोलमुक्तीचा दिलासा

सरकारच्या वचनपूर्तीच्या अनुषंगाने पहिल्या टप्प्यामध्ये राज्यातील १२ टोलनाके पूर्णत: बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ७९ पैकी ५३ टोलनाक्यांवर कार, जीप, एस.टी. व स्कूलबसेसना टोलमुक्ती दिली आहे.

### स्वच्छ भारत अभियान

स्वच्छ भारत अभियान या संकल्पनेत अनुसरून राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्य महामार्गावर दुतर्फा स्वच्छतागृहे उभारण्यात येतील. प्रवाशांच्या सोईसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी व जनसुविधा केंद्र उभारण्याचे नियोजन आहे.

### सहकारामधून समृद्धी

राज्यात सहकाराचे जाळे सर्वदूर वाढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सहकाराच्या वाढीबरोबरच साखर कारखाने आणि ऊस उत्पादक शेतकरी वाचवण्यासाठी साखर कारखान्यास ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या रास्त आणि किफायतशीर किंमत अर्थात एफआरपी (फेअर ॲण्ड रिम्युनेरेटीव्ह प्राईसची) रक्कम अदा करण्यासाठी दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल. त्यासाठी व्याज अनुदान देण्याचा

**सिंहस्थ कुंभमेळा-नाशिक**

**नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे दर १२ वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रिंगरोड, गोदावरी नदीवरील पूल, रेल्वे उड्डाण पूल, विश्रामगृहासह नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे रुग्णालयाची रु. ६५८ कोटींची ४३ कामे करण्यात आली आहेत.**



धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. प्रथम वर्षाच्या कर्जावरील व्याज अनुदान केंद्र शासन, तर त्यापुढील ४ वर्षापर्यंतचे व्याज अनुदान राज्य शासन देणार आहे. यामुळे साखर कारखान्यांना २००० कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध होईल. २०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतल्याने जे साखर कारखाने केंद्र शासनाच्या या योजनेच्या निकषात बसत नाहीत, अशा साखर कारखान्यास ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावर ५ वर्षे व्याज अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

### सहकारी संस्थांचे सर्वेक्षण

राज्यात सध्या नोंदणीकृत असलेल्या सुमारे २.४० लाख सहकारी संस्थांपैकी कामकाज बंद असलेल्या संस्थांची नोंदणी रद्द करण्याच्या दृष्टीने अशा संस्थांचे सर्वेक्षण सुरू आहे.

### निर्यात सुविधा केंद्र

कृषी पणन मंडळाद्वारे कांदा, केळी, आंबा, डाळिंब, संत्रा, द्राक्षे, फुले, भाजीपाला, इत्यादींसाठी ४६ निर्यात सुविधा केंद्र भाडेतत्त्वावर चालवण्यास मान्यता देण्यात आली आहे. वस्त्रोद्योगाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात येत आहे. त्यानुसार विदर्भात टेक्सटाइल पार्क व अमरावती जिल्ह्यात नांदगाव पेठ येथे टेक्सटाइल हबची स्थापना करण्यात आली आहे.

### मेगा टेक्सटाइल पार्क

अमरावती जिल्ह्यात नांदगाव पेठ येथे राज्यातील पहिल्या मेगा टेक्सटाइल पार्कची स्थापना करण्यात आली. अमरावती विभागांतर्गत पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रामध्ये २८०० हेक्टर जमिनीपैकी ५०० हेक्टर जागा वस्त्रोद्योग पार्कसाठी नियोजित केली आहे.

### केंद्रपुरस्कृत हातमाग उद्योगाचे पुनरुज्जीवन

हातमाग क्षेत्राची प्रगती करण्याच्या उद्देशाने केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाने राज्य शासनाच्या प्रत्यक्ष सहभागाने राबवायच्या रु. ३००० कोटीपेक्षा जास्त रकमेच्या उद्योगांचे पुनरुज्जीवन, सुधारणा व पुनर्रचना जाहीर केली आहे. राज्य शासनाच्या २० टक्के हिस्यासाठी रु.२.३५ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. गतिमान रस्ते विकास आणि सहकार क्षेत्राच्या समृद्धीसाठी गेले वर्षभर मी लक्ष केंद्रित केले. पुढील काळात त्याचे उत्तमोत्तम परिणाम राज्यात दिसून येईल.

**शब्दांकन : विलास बोडके**






## बदल घडले आहेत...

- मुंबई- गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे काम लवकर पूर्ण होण्यासाठी प्राधान्याने लक्ष
- राज्यात एकूण ३,३६,००० कि.मी लांबीच्या रस्त्यांचे जाळे विकसित करण्याचा निर्धार
- राज्यातील ९१ पैकी १२ टोल नाके पूर्णत: बंद करण्याचा निर्णय.
- सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ७९ पैकी ५३ टोलनाक्यांवर कार, जीप, एस.टी. व स्कूलबसेसना टोलमुक्ती देण्याचा निर्णय.
- अमरावती जिल्ह्यात नांदगाव पेठ येथे राज्यातील पहिल्या मेगा टेक्सटाइल पार्कची स्थापना
- भूविकास बँकेच्या सुमारे ३७७६६ थकबाकीदार शेतकऱ्यांकडील रु. ९४६ कोटी थकीत रकमेपैकी रु. ७१३ कोटी रकमेस सूट देण्याचा निर्णय
- राज्यातील ५ मागासवर्गीय सहकारी सुतगिरण्यांना अर्थसाहाय्य देण्यात येणार असल्याने अंदाजे २००० लोकांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध होणार
- विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जातून मुक्त करण्यासाठी रुपये १७१.३० कोटीचे अर्थसाहाय्य
- २०१४-१५ या वर्षातील टंचाई परिस्थिती विचारात घेऊन अल्प मुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर करण्याचा निर्णय. या निर्णयानुसार ३१ ऑगस्ट २०१५ अखेर व्यापारी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत सुमारे ५.३० लाख शेतकऱ्यांच्या रुपये ३४७० कोटीएवढ्या रकमेच्या कर्जाचे रूपांतर



**सामान्य नागरिकाला निरोगी जीवन मिळावे, यासाठी आरोग्य विभागामार्फत शिवआरोग्य टेलिमेडिसीन योजना, ऑपरेशन कायापालट, यासारख्या विविध अभिनव योजना सुरू करण्यात आल्या आहेत. मी महाराष्ट्रातील तमाम नागरिकांना सांगू इच्छितो की, येणाऱ्या काळात सामान्य नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी अनेक वैविध्यपूर्ण अशा योजना प्राधान्याने राबवणार आहोत. दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठी कटिबद्ध असताना अजून खूप काही करायचे आहे, अशी माझी भावना आहे.**

# सुदृढ आणि निरोगी

**डॉ. दीपक सावंत**
(सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री)

ग्रामीण दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळवण्यासाठी शहरात यावे लागू नये व त्यांना स्थानिकस्तरावरच उपचार मिळावेत, त्यांच्या आरोग्य समस्यांवर शहरातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व्हावी, यासाठी शिवआरोग्य टेलिमेडिसिन योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा टेलिकॉन्फरन्सिंगद्वारे मेळघाटसारख्या दुर्गम भागातील गरिबांना मोफत उप-लब्ध करून देण्यात येत आहे. आगामी काळात नंदुरबार, वाडा, मोखाडा, जव्हार तसेच नाशिक जिल्ह्यातील दुर्गम भागातील रुग्णांना अत्याधुनिक आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांचे शहरांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत मिळणार आहे.

### ऑपरेशन कायापालट

सामान्यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालये ही आधुनिक यंत्रसामग्री आणि तज्ज्ञांसह सुसज्ज करण्यासाठी ऑपरेशन कायापालट योजना सुरू करण्यात आली आहे. शासकीय आरोग्य संस्था स्वच्छ, सुसज्ज व लोकाभिमुख करण्यावर मी लक्ष केंद्रित केले आहे. शासकीय आरोग्य संस्थावरील विश्वास वाढवणे, आरोग्य संस्थातील कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल घडवून आणणे व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे, याकडे मी गेल्या वर्षभरात प्राधान्याने लक्ष पुरवले आहे.

### परवडणाऱ्या दरात रक्त

मानवी आयुष्यात रक्ताचे महत्त्व आपण सारेच जाणून आहोत. राज्यातील रक्ताचे जास्त दर पाहता, सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात रक्त उपलब्ध व्हावे; याकरिता रक्ताच्या पिशवीचे दर १०५० रुपयांवरून ८५० रुपयांपर्यंत कमी करण्यात आले आहेत. रक्तसंक्रमणामुळे पसरणाऱ्या आजारांची जोखीम कमी करण्यासाठी आधुनिक न्युक्लिअर सीड टेस्ट प्रणाली निवडक शासकीय रक्तपेढ्यांमध्ये सुरू करण्यात येईल. या निर्णयामुळे गरजू रुग्णांना नक्कीच फायदा होईल. सिंधुदुर्ग व रत्नागिरी येथे रक्तसंकलनासाठी अद्यावत मोबाइल कलेक्शन युनिट सुरू केले असून त्याचा फायदा या दोन्ही जिल्ह्यातील गरजू रुग्णांना होणार आहे.

### माता-बाल आरोग्य

महिला व बालकांच्या कल्याणासाठी विभागाने काही नवीन योजना सुरू केल्या आहेत. मेळघाट माता बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत मेळघाटात गरोदर मातांचे ट्रॅकिंग करण्यात येते. ज्या भागात कनेक्टिव्हीटी नाही तेथे ट्रॅकिंगप्रमाणे रुग्णवाहिकेच्या माध्यमातून ठरावीक दिवशी मातेस जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात नेऊन तपासणी केली जाते. यामुळे गेल्या सहा महिन्यात माता मृत्यूच्या दरात लक्षणीय घट झाली आहे. या उपक्रमांतर्गत मेळघाटसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. बालमृत्यु, अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी बाल आरोग्य अभियान राबवले जात आहे.



### अंधत्व नियंत्रण

जानेवारी २०१५ मध्ये राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमामध्ये नेत्र तपासणी शिबिरे आयोजित करून निश्चित केलेली उद्दिष्ट पार केली. सुमारे १५ हजार १८९ मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या. एमडीआर/एक्सडीआर या क्षयरोगांच्या रुग्णांसाठी आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांचा




शुभारंभ करण्यात आला असून रुग्णांना मोफत औषधोपचारासह दिवसातून तीन वेळा सकस आहार देण्यात येतो. राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई महापालिका व आयडीबीआयच्या माध्यमातून हा उपक्रम मुंबईत राबवण्यात येत असून कालांतराने ही योजना राज्यभर राबवण्यात येईल.

### स्वाइन फ्ल्यूवर मात

स्वाइन फ्ल्यू आजारावर खाजगी रुग्णालयात गंभीर स्थितीत व्हेंटीलेटरवर किंवा तत्सम लाइफ सपोर्टवर उपचार घेत असलेल्या रुग्णांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल. त्याचबरोबर स्वाइन फ्ल्यू व अन्य साथीच्या आजारासाठी सर्व रुग्णालयात आयसोलेशन वॉर्ड सुरू करण्यात येत आहेत. शासकीय रुग्णालयांमध्ये रेडीओलॉजी इमॅजीन डायग्नोस्टिक सेंटर सुरू करण्याच्या दृष्टिकोनातून मे. विप्रो, जीई हेल्थ केअर लि. या कंपनीसोबत करारनामा करण्यात आला असून या योजनेंतर्गत जिल्हा रुग्णालय औंध, (जि. पुणे) येथे सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर रेडीओलॉजी इमॅजीन डायग्नोस्टिक सेंटर सुरू करण्यात आले आहे. अन्य ठिकाणी डायग्नोस्टिक सेंटर सुरू करण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात कर्करोग रुग्णालय उभारण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे. गुडघा, खुब्याचे प्रत्यारोपण या शस्त्रक्रियेचा राजीव जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समावेश करण्याचे प्रस्तावित आहे.

### अपंगांना दिलासा

अपंग व्यक्तींना अपंगत्वाचे प्रमाणपत्र संगणक प्रणालीमार्फत देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. या प्रणालींतर्गत अपंग व्यक्तींना अपंगत्वाचे प्रमाणपत्र त्वरित मिळण्यासंदर्भात उपाययोजना करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्र आरोग्य रक्षण व थुंकी प्रतिबंधक अधिनियम तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास एक हजार रुपये दंड व एक दिवस सार्वजनिक रुग्णालयात सामाजिक सेवा देण्याची शिक्षा प्रस्तावित करण्यात आली आहे. हा अधिनियम प्रभावी होण्याकरिता जनतेच्या सूचना मागवण्यात येत आहेत. दुर्गम भागात महिला, बालकांच्या आरोग्य तपासणीची शिबिरे मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आली. पंचतारांकित रुग्णालयातील विशेषज्ज्ञांना अशा ग्रामीण भागातील आरोग्य शिबिरांमध्ये नेऊन रुग्णांवर उपचार करण्यात आले. आरोग्य विभागातील रिक्त पदे भरणे, आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करणे आदी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय गेल्या वर्षभरात घेण्यात आले आहेत. अनेक चांगल्या योजना, उपक्रम सुरू केले आहेत. त्याचे उत्तम परिणाम दिसू लागले आहे.

**शब्दांकन : अजय जाधव**




## बदल घडले आहेत...

- **शिवआरोग्य टेलिमेडिसिन योजना सुरू. योजनेंतर्गत मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा टेलिकॉन्फरन्सिंगद्वारे दुर्गम भागातील गरिबांना मोफत उपलब्ध.**
- **ऑपरेशन कायापालट योजना सुरू. योजनेंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय अत्याधुनिक करण्यास सुरुवात**
- **परवडणाऱ्या दरात रक्त उपलब्ध व्हावे याकरिता रक्ताच्या पिशवीचे दर १०५० रुपयांवरून ८५० रुपयांपर्यंत कमी**
- **मेळघाट माता बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत मेळघाटात गरोदर मातांचे ट्रॅकिंग सुरू. त्यामुळे त्यांना तातडीने सुयोग्य उपचार उपलब्ध करून देणे शक्य.**
- **क्षयरोगांच्या रुग्णांसाठी आरोग्यवर्धिनी कार्यक्रम.**
- **शासकीय रुग्णालयांमध्ये रेडिओलॉजी इमॅजिन डायग्नोस्टिक सेंटर सुरू करण्याच्या दृष्टिकोनातून मे. विप्रो, जीई हेल्थ केअर लि. या कंपनीसोबत करार.**
- **विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात कर्करोग रुग्णालय उभारण्याचे प्रस्तावित**
- **आपत्कालीन वैद्यकीय सेवेच्या रुग्णवाहिकेच्या (हेल्पलाइन क्रमांक १०८) माध्यमातून सुमारे पाच लाख विविध प्रकारची प्रकरणे हाताळली**
- **विठ्ठल सायन्ना जिल्हा रुग्णालय, ठाणे येथील जीएनएम नर्सिंग स्कूलला कै. अरुणा शानबाग यांचे नाव देण्याचा निर्णय**

# गावसमृद्धी ते जलसमृद्धी



बीड जिल्ह्यातील परळी आणि अंबेजोगाई तालुक्यात काही वर्षांपूर्वी मी जलसंधारणाचा 'वैद्यनाथ पॅटर्न' राबवला. यात या तालुक्यांमधील विविध गावांमध्ये छोटे-मोठे बंधारे, नाला खोलीकरण, नद्यांचे पुनरुज्जीवन असे उपक्रम राबवून गावातील पाणी गावातच अडवले. यामुळे टंचाई परिस्थितीवर यशस्वी मात करण्यात आली. 'वैद्यनाथ पॅटर्न'च्या माध्यमातून मिळालेला अनुभव आणि त्याला मिळालेले यश यामुळे प्रेरित होऊनच मी जलसंधारण विभागाच्या मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर 'जलयुक्त शिवार' अभियानाची आखणी केली. मागील वर्षभरात शासन आणि लोकांच्या सहभागातून हे अभियान यशस्वीपणे राबवले गेले, याचा मला विशेष आनंद वाटतो.

जलसंधारण आणि पाणी वापराबाबतच्या सर्व १४ योजनांचे एकत्रीकरण करून जलयुक्त शिवार ही अभिनव योजना तयार करण्यात आली. या अभियानासाठी २०१५ मध्ये राज्यातील ६ हजार २०२ गावांची निवड करण्यात आली. या गावांमध्ये नाला बंडिंग, सिमेंट बंधारे, गाळ काढणे, जुन्या जलसंरचनांचे पुनरुज्जीवन, कोल्हापूर पद्धतीच्या व साठवण बंधाऱ्यांची दुरुस्ती, पाझर तलाव तसेच लघुसिंचन तलावांची दुरुस्ती, कालवा दुरुस्ती इत्यादी कार्यान्वित करण्यात आले आहे.

**संपूर्ण राज्य दुष्काळमुक्त करण्याच्या निर्धाराने शासनाने सुरू केलेले 'जलयुक्त शिवार अभियान' राज्यात कमालीचे यशस्वी झाले आहे. विविध भागातील गावांनी यात सक्रिय सहभाग घेतला आहे. या प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे जलयुक्त शिवार योजनेतून ६८८५९६.८५ टीसीएम जलसंचय क्षमता निर्माण झाली. या जलसंचय क्षमतेतून एकदा सिंचन करायचे झाल्यास ६१०८४०.५० हेक्टर क्षमतेचे सिंचन होऊ शकते. याशिवाय ग्रामविकासाच्या अनेक योजना प्रभावीरीत्या कार्यान्वित केल्या. महिला व बालकल्याण योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, यासाठी लक्ष केंद्रित केले.**

या अभियानासाठी शासनामार्फत विशेष निधी म्हणून १ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. येत्या ५ वर्षात २५ हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. अभियानातून केली जाणारी कामे दर्जेदार, टिकाऊ आणि शाश्वत व्हावीत, यासाठी व्यापक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. या कामांचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत तसेच डिजीटल फोटोद्वारे सनियंत्रण करण्यात येत आहे. कामापूर्वीचे तसेच कामानंतरचे डिजीटल छायाचित्रे संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहेत.

### लोकसहभाग

कॉर्पोरेट क्षेत्र आणि स्वयंसेवी संस्थांचा या अभियानात सहभाग आहे. मुंबईतील सिद्धिविनायक संस्थान आणि शिर्डीतील साईबाबा संस्थान यांनी दुष्काळमुक्तीच्या कामांसाठी प्रत्येकी ३४ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले. राजस्थान राज्य या मोहिमेने प्रभावित झाले असून तिथे अशाच पद्धतीची योजना राबवली जाणार आहे. यासाठी तेथील एका उच्चस्तरीय समितीने नुकतीच मंत्रालयात माझी भेट घेऊन अभियानाविषयी सविस्तर माहिती घेतली.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड झालेल्या गावांमध्ये ऑगस्ट २०१५ अखेर जलसंधारणाची तसेच मृदसंधारणाची एकूण १,१८,४९९ कामे पूर्ण झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने २,९२,३०८ हेक्टरवर ढाळीचे बांध, ४०५७९ हेक्टरवर सलग समतल चर, खोल सलग समतल चर, ३६ वनराई बंधारे, ३१२१ सिमेंट नालाबांध, ५४७ गॅबियन बंधारे, १७७ केटी वेअर दुरुस्ती, ४५० पाझर तलाव / गावतलाव दुरुस्ती, ५७४ माती नालाबांध दुरुस्ती, ८९७ सिमेंट नालाबांध दुरुस्ती, ७७ नवीन गावे / पाझर तलाव, १६१ केटी वेअर / साठवण बंधारे, ३०८ बोडी दुरुस्ती, ४५०४ नाला खोलीकरण / सरळीकरण, ४६३४ शेततळे, १७७४२ विहीर / बोअर पुनर्भरण, १०२२ रिचार्ज शाफ्ट इ. कामांचा समावेश आहे. लोकसहभागातून सुमारे २४०.७३ कोटी रुपये इतक्या रकमेची कामे झाली आहेत.


**पंकजा मुंडे**

(ग्रामविकास, जलसंधारण, महिला व बालकल्याण, रोजगार हमी योजना मंत्री)


### स्मार्ट गावांची निर्मिती

ग्रामीण विकास विभागाने राज्यातील ग्रामपंचायतींचा सर्वांगीण विकास करण्याचा निर्धार केला आहे. यासाठी मागील एका वर्षात अनेक विकासाभिमुख निर्णय घेतले. सर्व ग्रामपंचायती 'स्मार्ट ग्रामपंचायती' बनवण्याचा शासनाचा निर्धार आहे. यासाठी ग्रामपंचायतींचे विकास आराखडे तयार करून निश्चित धोरण आखण्यात येत आहे. अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरून तसेच त्यांना समुपदेशनाद्वारे सोयीच्या ठिकाणी पदस्थापना देऊन त्यांचे उत्साहवर्धन करणे, त्यांची कार्यक्षमता वाढवणे आणि यामार्फत ग्रामविकासाची चळवळ अधिक गतिमान करण्यावर माझा भर राहिला आहे.

राज्यातील ग्रामीण रस्त्यांना जोडण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक




योजनेच्या धर्तीवर अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी 'मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना' राबवण्यात येईल. या योजनेसाठी ३५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कंत्राटदारांकडून ग्रामीण रस्त्यांची कामे चांगल्या दर्जाची होण्यासाठी रस्त्यांचा हमी कालावधी ६ महिन्यांवरून ५ वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे. या काळात रस्ते नादुरुस्त झाल्यास कंत्राटदारावर फेरदुरुस्तीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. पंतप्रधान ग्रामीण सडक योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून २ हजार ६२० किमी. लांबीचे नवीन ग्रामीण रस्ते बांधणीचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे. यासाठी १ हजार ५७२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### आदर्श गाव योजना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील सांसद आदर्श ग्राम योजनेची महाराष्ट्रात यशस्वी अंमलबजावणी होत आहे. या योजनेबाबतचे धोरण ठरवण्यासाठी आदर्श गाव हिवरेबाजार येथे कार्यशाळा घेण्यात आली होती. राज्यातील सर्व खासदारांनी गावांची निवड केली असून या ७० गावांमध्ये कामाला सुरुवात झाली आहे.

सांसद आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'आमदार आदर्श गाव योजना' सुरू करण्यात आली आहे. प्रत्येक विधानसभा, विधान परिषद सदस्य गावाची निवड करतील, शासनामार्फत विविध योजनांमधून निधी उपलब्ध करून या गावांचा सर्वांगीण विकास करण्यात येईल. येत्या ५ वर्षांत १ हजार गावे आदर्श बनवण्याचा राज्य शासनाचा निर्धार आहे.

विविध शासकीय सेवा नागरिकांना वेळेत दिल्या जाव्यात, या उद्देशाने शासनाने सेवा हक्क अधिनियम संमत केले आहे. याअंतर्गत ग्रामस्तरावर नागरिकांना आवश्यक असणाऱ्या


ग्रामीण भागातील कूपनलिकेची पाहणी करताना ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे

## बदल घडले आहेत...

- जलयुक्त शिवार योजनेतून ६८८५९६.८५ टीसीएम जलसंचय क्षमता निर्माण झाली. या जलसंचय क्षमतेतून एकदा सिंचन करायचे झाल्यास ६१०८४०.५० हेक्टर क्षमतेचे सिंचन होऊ शकते.
- अभियानासाठी शासनामार्फत विशेष निधी म्हणून १ हजार कोटी रुपयांची तरतूद. अभियानाच्या माध्यमातून येत्या ५ वर्षात २५ हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प
- सर्व ग्रामपंचायती 'स्मार्ट ग्रामपंचायती' बनविण्याचा शासनाचा निर्धार. यासाठी ग्रामपंचायतींचे विकास आराखडे तयार करून निश्चित धोरणाची आखणी.
- ग्रामीण रस्त्यांना जोडण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर महत्त्वाकांक्षी अशी 'मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना' घोषित
- सेवा हक्क अधिनियमांतर्गत ग्रामस्तरावर नागरिकांना आवश्यक असणाऱ्या १३ सेवा प्रथम टप्प्यात विहित कालमर्यादेत उपलब्ध करून देण्यास सुरुवात
- माहिती व तंत्रज्ञानाचा ग्रामपंचायतींमध्ये वापर वाढवण्यावर भर देण्यासाठी संग्राम योजनेला चालना
- 'मनरेगा'तून दुष्काळमुक्तीच्या कामांना प्राधान्य
- महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही, यासाठी महिला आणि बालविकास विभागामार्फत व्यापक उपाययोजना सुरू
- पाच वर्षात १००० गावे आदर्श बनवण्याचा निर्धार





जलयुक्त शिवार योजनेच्या कामाची पाहणी करताना
ग्रामविकास व जलसंधारण मंत्री पंकजा मुंडे

१३ सेवा प्रथम टप्प्यात विहित कालमर्यादेत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. टप्प्याटप्प्याने सेवा वाढवण्यात येतील. जन्म दाखला, मृत्यू दाखला, विवाहाचा दाखला तसेच दैनंदिन कामाकरिता लागणाऱ्या दाखल्याचा सध्या यात समावेश करण्यात आला आहे.

माहिती व तंत्रज्ञानाचा ग्रामपंचायतींमध्ये वापर वाढवण्यावर भर देण्यासाठी संग्राम योजनेला चालना देण्यात येत आहे. नागरिकांना सर्व सुविधा ऑनलाइन देण्याचा राज्य शासनाचा निर्धार आहे. यासाठी संग्राम प्रकल्पाद्वारे प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. पेसा अधिनियमांतर्गत येणाऱ्या आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींना गावच्या हद्दीतील तेंदूपत्ता, बांबू आदी नैसर्गिक साधनसंपत्तीची विक्री व विनियोग करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला आहे. पेसा ग्रामपंचायतींतर्गत सर्व वाडी, वस्ती, पाडे यांना गावाचा दर्जा देण्यात येत आहे. साधारण २८०० ग्रामपंचायतींना पेसा तरतुदींचा लाभ मिळत आहे.

## बेघरांना घरकुले

मागील वर्षी १ लाखापेक्षा जास्त बेघरांना घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे. पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेंतर्गत घरकूल योजनेसाठी पात्र पण भूमिहीन लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येईल.

राज्यातील ५७ बालविकास प्रकल्प अधिकारी आणि ४५ गटविकास अधिकारी तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना समुपदेशनाने त्यांच्या मागणीनुसार पदस्थापना देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. राज्यातील गटविकास अधिकाऱ्यांची सर्व रिक्त पदे विशेष मोहीम राबवून भरण्यात आली. गटविकास अधिकारी व साहाय्यक गटविकास अधिकारी यांच्या कामकाजाचे वाटप निश्चित करण्यात आले आहे. पंचायत समित्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या वापरासाठी एक अतिरिक्त वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

## 'मनरेगा'तून दुष्काळमुक्तीची कामे

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची महाराष्ट्रात प्रभावी अंमलबजावणी होत आहे. शासनाची रोजगार हमी योजना गतिमान करण्यात आली आहे. २०१५-१६

करिता केंद्र शासनामार्फत १० कोटी ८७ लाख मनुष्य दिवस इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यासाठी २ हजार ४४८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मनरेगांतर्गत येत्या २ वर्षात ४४ हजार सिंचन विहिरी बांधण्याचे नियोजन आहे. योजनेच्या कामात पारदर्शकता येण्यासाठी २ लाखांहून अधिक कामांचे चित्रीकरण करून त्यांची डिजिटल छायाचित्रे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहेत. या योजनेत दुष्काळमुक्तीच्या कामांना अग्रक्रम देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले असून मृदसंधारण, जलसंधारण, वृक्षसंवर्धन, कृषी व कृषिसंलग्न कामे यांना प्राधान्याने मंजुरी देण्यात येते. ग्राम रोजगार दिनी 'एक दिवस मजुरांसोबत' हा अभिनव उपक्रम नुकताच सुरू केला आहे.

**सक्षम माता, सुदृढ बालक**

महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही, यासाठी महिला आणि बालविकास विभागामार्फत व्यापक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' आणि राज्य शासनाच्या 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेमार्फत मुलीच्या जन्माला प्रोत्साहन देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. महिलांना व्यावसायिक वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्यासाठी आय केअर संस्थेबरोबर सामंजस्य करार करण्यात आला. सप्टेंबर २०१५ पर्यंत २०० महिलांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून ९० महिलांचे प्रशिक्षण सुरू आहे.

**शब्दांकन : इर्शाद बागवान**






## बदल घडले आहेत...

- **केंद्र शासनाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानासाठी औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, जालना, जळगाव, अहमदनगर, बुलढाणा, वाशीम, कोल्हापूर, सांगली या १० जिल्ह्यांची निवड.**
- **या योजनेंतर्गत राज्यात 'माझी कन्या भाग्यश्री' योजना सुरू. यासाठी अर्थसंकल्पात २०० कोटी रुपयांची तरतूद या योजनेंतर्गत मुलीचा जन्म, शिक्षण, बालविवाह रोखणे आणि कौशल्य विकास याकरिता कुटुंबांना आर्थिक प्रोत्साहन. या योजनेंतर्गत मुलगी, आई, आजी आणि गावाला पुरस्कार.**
- **महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ. त्यासाठी अर्थसंकल्पात २०० कोटी रुपयांची तरतूद.**
- **मुलींच्या वसतिगृहांसाठीच्या निधीमध्ये दुपटीने वाढ करून ११२ कोटी रुपयांची तरतूद. मुलींच्या सर्व वसतिगृहांना येत्या ३ वर्षात संरक्षक भिंती बांधण्याचा संकल्प**
- **बालकांच्या चांगल्या पोषणासाठी गर्भधारणेपासून पहिल्या १ हजार दिवसांवर विशेष लक्ष केंद्रित. अंगणवाडी सेविकांमार्फत गरोदर माता, स्तनदा माता आणि बालकांची विशेष देखभाल.**
- **राज्यातून कुपोषणाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आरयूटीएफ (तयार उपचारात्मक अन्न), परसबाग योजना यांसारख्या नावीन्यपूर्ण प्रकल्पांची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी.**
- **अंगणवाडी सेविकांना ९५० रुपये, मदतनिसांना ५०० रुपये, तर मिनी अंगणवाडी सेविकांना ५५० रुपयांची मानधनात वाढ. राज्यातील १ लाख ९७ हजार २६२ अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधनवाढीचा लाभ. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ऑनलाइन प्रणालीद्वारे मानधन वितरणाचा ठाणे जिल्ह्यात शुभारंभ.**
- **अडचणीत सापडलेल्या महिलांना मदत करण्यासाठी १८१ या टोल फ्री क्रमांकावर मुख्यमंत्र्यांची हेल्पलाइन सेवा. ही सेवा २४ X ७ तास कार्यरत.**
- **महत्त्वाचे कार्यक्रम, निर्णय इत्यादींची माहिती अंगणवाडी कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी एसएमएस गेटवे सेवा सुरू**
- **अंगणवाडी आणि बाल केंद्रातील ० ते ६ वयोगटातील बालकांच्या आधार नोंदणीचे काम सुरू**

# नवी दिशा, नवा विश्वास



**आदिवासी बांधवांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय या वर्षभरात आम्ही घेतले. आदिवासी बांधव मुख्य प्रवाहात यावेत, यासाठी महत्त्वपूर्ण योजना आणि उपक्रम सुरू करण्यासाठी पावले उचलली आहेत. मी आदिवासी भागाचे प्रतिनिधित्व करीत असल्याने मला आदिवासी बांधवांच्या प्रश्नांची उत्तम जाणीव आहे. त्यांच्या व्यथा मी जाणून आहे. आम्ही घेतलेले निर्णय आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासाला प्रभावीपणे चालना देणारे ठरतील, असा मला विश्वास आहे.**

स्वातंत्र्यपूर्वकाळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी विकासाच्या अनेक संकल्पना अस्तित्वात आल्या, त्यांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकास व्हावा, यासाठी शासनाने अनेक उपाययोजनांची आखणी केली. अंमलबजावणी सुद्धा केली. सुरुवातीला क्षेत्र विकासाची कल्पना अंमलात आणून क्षेत्राच्या विकासावर भर देण्यात आला. पण यामुळे क्षेत्र विकासाबाहेरील आदिवासींचा विकास दुर्लक्षिला गेल्याने क्षेत्र विकासाबरोबरच व्यक्ती विकासावर लक्ष केंद्रिंत करून सर्वसमावेशक प्रगतीचे सूत्र स्वीकारले गेले. यामध्ये प्रामुख्याने क्षेत्रीय विकास, सामूहिक विकास व वैयक्तिक लाभांच्या योजना आदिवासी विकासविभागांतर्गत आदिवासी विकास आयुक्त, आदिवासी विकास महामंडळ आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या माध्यमातून प्रभावीपणे राबवल्या जात आहेत.

### आश्रमशाळा समूह

आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आश्रमशाळा समुह योजना राबवण्यात येत आहे. उच्च शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी मुलामुलींसाठी शासकीय वसतीगृह, इंग्रजी माध्यमांच्या शाळा, राज्यातील नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी मुलामुलींना मोफत शिक्षण, भारत सरकार शिष्यवृती, सुवर्णमहोत्सवी शिष्यवृती, पेसा कायद्यांतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना गावाचा/पाड्यांचा विकास करण्यासाठी आदिवासी उपायोजनेचा किमान पाच टक्के निधी थेट ग्रामपंचायतींना उपलब्ध करून देणे अशा अनेक योजना आम्ही यशस्वीरीत्या राबवत आहोत.

केंद्रशासनाने २०१९ सालापर्यंत स्वच्छ भारताचे उद्दिष्टे समोर ठेवून स्वच्छ भारत मिशन हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जाहीर केला. स्वच्छ भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आदिवासी विभागामार्फत चालवण्यात येणाऱ्या आश्रमशाळांध्ये वॉश (WASH - वॉटर, सॅनिटेशन ॲण्ड हायजिन) 'स्वच्छ भारत स्वच्छ शाळा' हा कार्यक्रम सुरू केला आहे. दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासी बांधवांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास व्हावा. त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संतुलित पोषण आहार मिळावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे ते समाजाच्या मुख्य प्रवाहात येतील आणि सामाजिक विकासाचा लाभ मिळून त्यांच्या जीवनमानात नक्कीच बदल घडतील, यासाठी शासनाने नवनवीन योजना हाती घेतल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे नाशिक जिल्ह्यातील मुंढेगाव येथे देशातील पहिले मध्यवर्ती स्वयंपाकगृह सुरू करण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यातील कांबळगाव येथेही लवकरच अशाच प्रकारे मध्यवर्ती स्वयंपाकगृह सुरू करण्यात येणार आहे.

अनुसूचित जमातीच्या २५ हजार विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या

**विष्णू सवरा**
(आदिवासी विकासमंत्री)

नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून ते बारावीपर्यंत शिक्षण देण्यास मान्यता देण्यात आली आहे. आता या विद्यार्थ्यांच्या संख्येत दहा पटीने वाढ करण्यात आली असून त्यामुळे दरवर्षी २५ हजार विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्याच्या नियमानुसार आदिवासी विकास विभागाच्या प्रत्येक शासकीय आश्रमशाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात येणार आहे. त्यामुळे शाळेवर नियंत्रण राहील.

आदीवासी बांधवांच्या कल्याणाच्या योजना सुरू करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू असताना त्यांच्या आयुष्यात आमुलाग्र बदल घडवून आणण्याकरिता भविष्यात अजून महत्त्वाकांक्षी योजना राबवण्याचा आमचा मानस आहे. त्यांना मूर्त स्वरूप देण्यासाठी आगामी काळात प्रयत्न करण्यात येणार आहे.

आदिवासी शेतकरी, कारागीर आणि



भूमिहीन मजूर यांच्या आर्थिक विकासावर अधिक लक्ष केंद्रित करणार आहेत. आदिवासी उपाययोजना क्षेत्रामध्ये उत्पादित होणाऱ्या कृषीउपज व गौण वनोपज वस्तूंवर प्रक्रिया करण्याकरिता लहान प्रक्रिया केंद्र उभारले जाईल व त्यातून उत्पादित होणाऱ्या वस्तूंची महामंडळामार्फत विक्री केली जाईल. आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील पेसा व एफ.आर.ए. कायद्यानुसार वनोपज ग्रामसभेमार्फत खरेदी व विक्री केली जाईल. एकाधिकार खरेदी योजना व्यतिरिक्त उर्वरित क्षेत्रात ऐच्छिक खरेदी योजना राबवून संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची जास्तीत जास्त किंमत मिळवून दिली जाईल व असा माल शासकीय आश्रमशाळांना पुरवठा केला जाईल. आदिवासी शेतकऱ्यांना अनुदाना-वर तेलपंप पुरवठा धर्तीवर शेतीची अवजारे व बियाणे योजना पॅकेज पद्धतीने शासनाच्या मान्यतेने राबवली जाईल, आदिवासी शेतकरी व आदिवासी कारागीर यांची आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी कृषी उपज अथवा गौणवनोपजन संवर्धनासाठी कार्यभूत होणाऱ्या अथवा विक्री व्यवस्थापनाची योजना राबवण्यात येईल. जुन्या व अवसायनातील सहकारी संस्थांच्या जागा व गोदामे ताब्यात घेऊन गोदामांचे बांधकाम केले जाईल, केंद्र शासनाने गौणवनोपज वस्तुंच्या निश्चित केलेल्या हमीदरानुसार खरेदी करण्यासाठी हटस् (खरेदी केंद्र) व साठवणूक केंद्र उभारली जातील, एनसीडेक्स या देशपाळीवरील संस्थेमार्फत ई-निविदाद्वारे अन्नधान्य व वनोपज खरेदी केलेल्या मालाची विक्री प्रक्रिया राबवण्यात येईल, मालास जास्तीत जास्त भाव मिळवून देण्यासोबतच साठवणूक केंद्रावर संगणक (लॅपटॉप) उपलब्ध करून दिले जातील, मधुमक्षिका पालन प्रशिक्षण, स्वयंरोजगार प्रशिक्षणाच्या योजना खादी ग्रामोद्योग महामंडळ यांच्या सहकार्याने राबवल्या जातील. गडचिरोली जिल्ह्यातील मशेली येथे केंद्र शासनाचे गौणवनोपज हमी दर निश्चित केलेल्या वस्तूमध्ये मध खरेदी करण्यासाठी युनिटची उभारणी केली जाईल, अशा अनेक महत्त्वपूर्ण योजना आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही हाती घेतल्या आहेत. या योजनांना मूर्त स्वरूप देण्याचे काम आगामी काळात आम्ही करणार आहोत.

**शब्दांकन : काशीबाई थोरात**






## बदल घडले आहेत...

- **आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आश्रमशाळा समूह योजना राबवण्यास सुरुवात करण्यात येत आहे.**
- **आदिवासी मुलांना उच्च शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृह, इंग्रजी माध्यमांच्या शाळा, राज्यातील नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी मुला-मुलींना मोफत शिक्षण.**
- **पेसा कायद्यांतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना गाव/ पाड्यांचा विकास करण्यासाठी आदिवासी उपायोजनेचा किमान पाच टक्के निधी थेट ग्रामपंचायतींना**
- **आदिवासी शेतकरी व आदिवासी कारागीर यांची आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी कृषी उपज अथवा गौणवनोपज संवर्धनासाठी कार्यभूत होणाऱ्या अथवा विक्री व्यवस्थापनाची योजना प्रस्तावित**
- **नाशिक येथे तात्पुरत्या स्वरूपात एकलव्य क्रीडा व उद्योजकता प्रबोधनीची स्थापना.**
- **विभागीय क्रीडा संकुलामध्ये जून २०१५ पासून १२५ आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरू. सुरुवातीला धनुर्विद्या, ॲथलेटिक्स, कुस्ती, कबड्डी, नेमबाजी या पाच क्रीडा प्रकारांच्या प्रशिक्षणास प्रारंभ**
- **दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासी बांधवांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास व्हावा. त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संतुलित पोषण आहार मिळावा, यासाठी योजना**

# स्वस्त आणि मुबलक

**अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग हा जनतेशी निगडित असून सर्वसामान्य जनतेला अन्नधान्याचा पुरवठा सुरळीत होण्यासाठी या विभागास अधिक लोकाभिमुख करण्याचा मागील वर्षभरात मी प्रभावी प्रयत्न केला. त्या दृष्टीने अनेक चांगले निर्णय घेण्यात आले. शिधावाटपात कोणत्याही नागरिकाची तक्रार येऊ नये, यासाठी परिणामकारक पावले उचलली आहेत. काही योजनांची गतिमानतेने अंमलबजावणी सुरू झाली असून उर्वरित योजना येत्या काळात कार्यान्वित करण्याचा माझा मानस आहे.**



**गिरीश बापट**

(अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री)

सर्वसामान्य माणसाशी निगडित असा माझा विभाग असल्यामुळे लोकांचा या विभागाशी थेट संबंध येत असतो. त्यामुळे मी पदभार स्वीकारल्यानंतर सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. सर्व रास्तभाव दुकानांमध्ये 'आधार' कार्डशी निगडित बायोमेट्रिक पद्धतीने धान्य वितरणाची पद्धत लागू करण्यात येत असून पहिल्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यातील एका तालुक्याची निवड करण्यात आली आहे. अशा एकूण ४३०० दुकानांमध्ये ही सुविधा देण्यात येईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून सार्वजनिक वितरण व्यवस्था पारदर्शक करण्याचा माझा प्रयत्न आहे.

### २.७५ कोटी आधार सिडिंग पूर्ण

शिधापत्रिकांना 'आधार' क्रमांकाशी संलग्न करण्याचे आम्ही ठरवले आहे. राज्यातील सर्वच जिल्ह्यात आधार सिडिंगचे काम सुरू झाले असून आतापर्यंत २.७५ कोटी आधार क्रमांकाचे सिडिंग पूर्ण झाले आहे. ही शिधापत्रिका कुटुंबातील ज्येष्ठ महिलेच्या नावाने असेल.

### संगणकीकृत वितरण व्यवस्थापन

राज्यात राष्ट्रीय अन्नधान्य महामंडळ ते राज्य गोदामे यामधील सर्व टप्प्यांसाठी संगणकीकृत वितरण शृंखला व्यवस्थापन लागू केली जाणार आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये केरोसिन वितरण हा महत्त्वाचा घटक आहे. गरीब लोकांना केरोसिन वितरण समान पद्धतीने व्हावे, यासाठी शहरी व ग्रामीण भागासाठी एकच निकष केले आहेत. किरकोळ केरोसिन व रास्तभाव धान्य दुकानांच्या परवानाधारकांच्या निधनानंतर त्या दुकानाचा परवाना वर्ग करण्याच्या कुटुंबाच्या व्याख्येत एकसूत्रता व सर्वसमावेशकता आणली आहे.

### काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई

जीवनावश्यक वस्तूंच्या काळाबाजाराला आळा बसावा, यासाठी 'महाराष्ट्र धोकादायक कारवाया प्रतिबंधक कायद्या (एमपीडीए)' मध्ये सुधारणा करून अशा व्यक्तींचा समावेश त्यात करण्यात येत आहे. रेशनचा काळाबाजार करणे हा अजामीनपात्र गुन्हा होणार आहे.

### शेतकऱ्यांसाठी अन्नधान्य

राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती असलेल्या १४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेप्रमाणे लाभ देण्यात येत आहे. या योजनेमध्ये औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या जिल्ह्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक ६८ लाख शेतकऱ्यांना या निर्णयाचा फायदा होत आहे. त्यांना गहू २ रुपये व तांदूळ ३ रुपये प्रतिकिलो या दराने प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो याप्रमाणे वाटप करण्यात येत आहे. याबरोबरच शेतकऱ्यांच्या हितासाठी किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप पणन हंगाम २०१४-१५ मध्ये खरेदी केलेल्या धानाची भरडाई करण्यासाठी केंद्र शासनाच्या दराव्यतिरिक्त ३० रुपये वाढवून देण्यात येणार आहेत. खरेदी केलेल्या धानासाठी केंद्राच्या दराव्यतिरिक्त २५० रुपये प्रोत्साहनपर देण्यात येतील.

### साखर खरेदीचा महाराष्ट्र पॅटर्न

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना मिळणारी साखर खुल्या बाजारातून खरेदी करण्यासाठी ई-लिलावाचा वापर करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे साखर खरेदी अत्यंत पारदर्शक, स्पर्धात्मक, आधुनिक अशी झाली असून बाजाराभावापेक्षा कमी दराने साखर उपलब्ध होत आहे.

### 'पहल' योजनेत राज्याचा सहभाग

'पहल' योजनेमध्ये गॅस सिलेंडरची सबसिडी थेट बँकेत जमा होत असल्यामुळे ग्राहकांचा फायदा होत आहे. ही योजना सर्व जिल्ह्यात कार्यान्वित केली आहे.

### वैधमापन शास्त्र विभागाचे सक्षमीकरण

वैधमापन शास्त्र विभागाच्या सक्षमीकरणावर भर देत आहोत. त्यासाठी विभागातील उपनियंत्रक व निरीक्षकांना वाहने पुरवणे, रिक्त पदांची भरती करणे आदी निर्णय घेतले आहेत. याशिवाय विभागाचे संगणकीकरणही करण्यात येत आहे. त्याद्वारे विभागाकडे भरण्यात येणारे विविध शुल्क आता ग्रास या संगणकीय प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येत आहे.

**सर्वसामान्य लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे घर खरेदीचा असतो. त्यात फसवणूक होऊ नये, यासाठी आम्ही सदनिका मोजणी नियमावली तयार करण्यास सुरुवात केली असून त्याचे काम आता अंतिम टप्प्यात आहे.**

### परवाने ऑनलाइन

अन्न व औषध प्रशासन विभागातील सर्व परवाने आता ऑनलाइन देण्यात येतात. नियमबाह्य औषध विक्री कायद्यात दुरुस्तीसाठी राज्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवला आहे. राज्यातील जनतेस दर्जेदार प्रमाणातील औषध पुरवठा योग्य दरात व्हावा, यासाठी तपासणी मोहीम हाती घेण्यात येत आहे. यासाठी ३० पथके तयार करून एकूण दोन टप्प्यात तपासण्या करण्यात आल्या.

त्याचबरोबर अन्न व औषध प्रशासन विभागाने गुटखामुक्ती अभियानासारखी कठोर पावले उचलली आहे. त्यामध्ये गुटखा, पानमसाला, मावा, खर्रा आदी पदार्थांची निर्मिती, साठवणूक व विक्रीस एक वर्षापर्यंत बंदी घालण्यात आली. गेल्या वर्षभरात अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि अन्न व औषध प्रशासन विभागाचे कामकाज पारदर्शक, गतिमान होत आहे. या पुढील काळातही सामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय व त्यांची अंमलबजावणी करण्याकडे प्राधान्याने लक्ष पुरवण्यात येणार आहे.

**शब्दांकन: नंदकुमार वाघमारे**







## बदल घडले आहेत...

- **दुष्काळग्रस्त १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी सवलतीच्या दरात अन्नधान्य पुरवठा**
- **राज्यातील सर्व रास्तभाव दुकानांमध्ये आधार कार्ड संलग्न बायोमेट्रिक पद्धतीने धान्य वितरणाची पद्धत लागू**
- **राष्ट्रीय अन्नधान्य महामंडळ ते राज्य गोदामे यामधील सर्व टप्प्यांसाठी संगणकीकृत वितरण शृंखला व्यवस्थापन लागू**
- **गरीब लोकांना केरोसिन वितरण समान पद्धतीने व्हावे, यासाठी शहरी व ग्रामीण भागासाठी एकच निकष**
- **जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्तींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी महाराष्ट्र धोकादायक कारवाया प्रतिबंधक कायद्या (एमपीडीए) मध्ये सुधारणा**
- **सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना मिळणारी साखर खुल्या बाजारातून खरेदी करण्यासाठी ई लिलावाचा वापर**
- **पहल योजना सर्व जिल्ह्यात कार्यान्वित सदनिका मोजणी नियमावली तयार करण्यास सुरुवात. काम आता अंतिम टप्प्यात.**
- **सर्व पाकीटबंद खाद्यपदार्थांची तपासणी करण्याचे आदेश.**
- **अन्न व औषध प्रशासनाचे सर्व परवाने ऑनलाइन**
- **गुटखा, मावा, खर्रा आदी पदार्थांच्या विक्री, साठवणूक व निर्मितीवर बंदी**

# जलसाठ्यात वाढ सिंचनात वृद्धी



सध्या महाराष्ट्राला दुष्काळाचा प्रश्न भेडसावत आहे. परतीच्या पावसाने काही भागातील धरणांची पातळी वाढली असली तरी ती पुरेशी नाही. त्यामुळे पाण्याचे आतापासून नियोजन करणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक व्यवस्थापनाच्या दृष्टीने प्रसंगी कठोर पावले उचलण्याची तयारी शासनाने केली आहे. मी व्यक्तिश: या नियोजनावर लक्ष ठेवून आहे. क्षेत्रीय स्तरावर कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे दरवाजे वेळीच लावणे व उघडणे

**शेतकरी सुखी आणि संपन्न व्हावा यासाठी सार्वजनिक जीवनात काम करताना सातत्याने प्रयत्न सुरू होते. त्यामुळे जलसंपदा मंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर चांगले काम करण्याची संधी मिळाल्याचे समाधान जसे होते तसेच या संधीचा पुरेपूर उपयोग कसा करता येईल, याचा विचार सुरू होता. या विभागाबाबत शेतकऱ्यांच्या मनात आपलेपणाची आणि विश्वासाची भावना निर्माण करणे आणि पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा सुनियोजित वापर करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मी कामकाजाला सुरुवात केली. सिंचनाच्या माध्यमातून शेती आणि राज्याच्या विकासात योगदान देण्याची भूमिका मनात होती. या क्षेत्रातील आव्हानांचीही जाणीव होती. या आव्हानांना पेलण्यासाठी गेल्या वर्षभरात सुनियोजित व सुव्यवस्थित पावले टाकल्याचे मला विशेष समाधान आहे.**

याबाबत काटेकोरपणे व्यवस्थापन करण्याकरिता कोल्हापूर बंधाऱ्यांचा पावसाळी नियोजन कार्यक्रम; मोहीम स्वरूपात हाती घेण्यात आला आहे. याबाबत क्षेत्रीयस्तरावर आढावा बैठक घेऊन हा कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व माझ्या विभागातील अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

**गिरीष महाजन**
(जलसंपदा मंत्री)

## कामाची दिशा

सुशासन, गतिमानता व पारदर्शकता या त्रिसूत्री धोरणानुसार विभागाच्या कामाची दिशा आम्ही निश्चित केली आहे. नियोजनात मनुष्यबळ अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून प्रलंबित कामांना गती देण्याकरिता विभागातील रिक्त पदांचा आढावा घेऊन ती रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी पावले उचलली व त्यानुसार कार्यकारी अभियंता पदावरील ७१ पदे पदोन्नतीने भरली असून २५ पदे पदोन्नतीच्या अंतिम टप्प्यात आहे. उपअभियंता पदावरील ६२२ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. तसेच २५४ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याकरिता शिफारस केली आहे. कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता/ साहाय्यक अभियंता श्रेणी-२ ही १४६ पदे पदोन्नतीने, ६६० पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात आली असून आता १५७१ पदांसाठी सरळसेवा भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या विभागाच्या सक्षमीकरणाबरोबरच प्रकल्पास गती देणे व अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन समोर होते. त्या अनुशेषांतर्गत सर्व प्रकल्प तसेच ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुंतवणूक झालेले प्रकल्प पूर्ण करण्यास सुरुवात केली आहेत. त्यानुसार २०१५-१६ मध्ये ३९ तर २०१६-१७ मध्ये ४१ प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील. प्रकल्पांसाठी जमीन थेट खरेदी पद्धतीने घेण्यास दिनांक १२ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक तत्त्वे प्रसृत केली आहेत. त्यामुळे भूसंपादनाच्या प्रक्रियेत गती येऊन प्रकल्पांची कामे पूर्ण करणे शक्य होईल.

प्रकल्पांना कार्यारंभ मंजुरीचे आदेश क्षेत्रीय स्तरावर दिल्याने अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले. प्रलंबित प्रकल्पांच्या गतीस प्रमुख अडथळा ठरणाऱ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या धोरणात बदल करण्याचे ठरवले आहे. त्याप्रमाणे प्रकल्पांच्या कामास गती देण्यासाठी व शेतकरी हा केंद्रबिंदू मानून प्रकल्पाचे लाभ शेतकऱ्यांपर्यंत मिळण्याच्या दृष्टीने विदर्भ व मराठवाड्यातील प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संबंधित महामंडळांना प्रदान करण्यात आले आहेत.



## विशेष मोहीम

जुन्या प्रकल्पांचे पुनरूज्जीवन करण्यासाठी एक विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्याचबरोबर राज्यातील उपलब्ध पाण्याचा प्रभावी वापर होण्याच्या दृष्टीने दमणगंगा आणि पारतापी नर्मदा या नदीजोड प्रकल्पाच्या कामाला गती देण्यात आली आहे. तापी खोऱ्यातील विशाल पुनर्भरण (मेगा रिचार्ज) प्रकल्पाच्या सर्वेक्षण, अन्वेषणाच्या कामाला सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे या कामाला गती मिळेल, याचा मला पूर्ण विश्वास आहे.

राज्यातील २२ लघुपाटबंधारे / साठवण तलाव / खारभूमी प्रकल्पांना फेब्रुवारी २०१५ मध्ये तसेच राज्यातील २८ लघुपाटबंधारे /




## यशस्वी महापर्व

**हे वर्ष माझ्यासाठी स्मरणीय असे आहे. मुख्यमंत्री महोदयांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे भरलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी कुंभमेळा मंत्री म्हणून माझ्यावर जबाबदारी सोपवली. या महापर्वाचे आयोजन प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, साधू-महंत आणि नागरिकांच्या सहकार्याने यशस्वीपणे करण्यात आले. कुंभमेळ्याच्या निमित्त नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. साधू-महंतांनी कुंभमेळ्याच्या आयोजनाबाबत समाधान व्यक्त करून शासनाच्या कामांना पावती दिली आहे. बारा वर्षांनी येणारा हा महासोहळा दुर्घटनाविरहित झाला याचे विशेष समाधान माझ्यासह नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या प्रत्येक नागरिकाला आणि शासन-प्रशासनातील प्रत्येक घटकाला आहे.**

साठवण तलावांना मे २०१५ मध्ये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्याचबरोबरच कॉर्पोरेट क्षेत्रासाठी त्यांच्या जबाबदारीच्या माध्यमातून सिंचन क्षेत्रातील पाणी वापराची कार्यक्षमता वाढवण्याच्या उद्दिष्टांशी निगडीत प्रकल्प उपलब्ध करून देणारे धोरण जाहीर केले आहे.

### पारदर्शकतेला महत्त्व

कामाची गती वाढवताना पारदर्शकतेला विशेष महत्त्व दिले. जनसामान्यांना प्रकल्पांची माहिती मिळावी, यासाठी ४०३ बांधकामाधीन प्रकल्पांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली.

हे सर्व करण्याबरोबरच विभागांतर्गत बदल्यांबाबत अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे होते. त्यामुळे कार्यकारी अभियंत्यांच्या बदलीचे अधिकार प्रधान सचिवस्तरावर तर उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंता/शाखाअभियंता आदी संवर्गातील अभियंत्यांचे अधिकार क्षेत्रीय स्तरावरील विभाग प्रमुखांना देण्यात आले.

सिंचनाचा संबंध केवळ शेतीशी किंवा पिण्याच्या पाण्याशी नाही, तर उद्योग, सहकार सारखे क्षेत्र यामुळे प्रभावित होते. हे लक्षात घेऊनच विभागाची कार्यक्षमता वाढवण्यावर या एक वर्षात भर दिला आहे. शाश्वत आणि विकसित सिंचनाच्या बळावर 'समृद्ध शेती आणि संपन्न शेतकरी' करण्याचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवून पुढची वाटचाल करावयाची आहे.

**शब्दांकन : डॉ.संभाजी खराट,**
**संजय डी.ओरके**



## बदल घडले आहेत...

- जलसंपदा विभागाचे काम सुशासन, गतिमानता व पारदर्शकता या त्रिसूत्री धोरणानुसार सुरू
- प्रलंबित कामांना गती देण्याकरिता विभागातील रिक्त पदांचा आढावा घेऊन ही पदे तातडीने भरली
- विभागाच्या सक्षमीकरणाबरोबरच प्रकल्पास गती देण्याचे व अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन समोर होते. अनुशेषांतर्गत सर्व प्रकल्प तसेच ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुंतवणूक झालेले प्रकल्प पूर्ण करण्यास सुरुवात
- प्रकल्पांना कार्यारंभ मंजुरीचे आदेश देण्याचे अधिकार क्षेत्रीय स्तरावर प्रदान
- शेतकरी हा केंद्रबिंदू मानून प्रकल्पाचे लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने विदर्भ व मराठवाड्यातील प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संबंधित महामंडळांना प्रदान
- उपलब्ध पाण्याचा प्रभावी वापर होण्याच्या दृष्टीने दमणगंगा आणि पारतापी नर्मदा या नदीजोड प्रकल्पाच्या कामाला गती
- २२ लघुपाटबंधारे/साठवण तलाव/खारभूमी प्रकल्पांना फेब्रुवारी २०१५ मध्ये तसेच राज्यातील २८ लघुपाटबंधारे/साठवण तलावांना मे २०१५ मध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता
- विविध तक्रारी असलेल्या १२८ नवीन प्रकल्पांच्या निविदा रद्द. अनियमितता आढळून आलेल्या १२ प्रकल्पांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी

# शाश्वत ऊर्जा, मुबलक वीज

**संपूर्ण राज्य भारनियमनमुक्त व्हावे, शेतकरी व उद्योगांना मुबलक वीज मिळावी, यासाठी गेले वर्षभर आम्ही विविध उपक्रम राबवले व महत्त्वाचे निर्णय घेतले. त्याचबरोबर अपारंपरिक ऊर्जा विकासासही चालना दिली. राज्यात नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्रोत मुबलक प्रमाणात आहेत. त्यातील पवन व सौर यासारख्या स्रोतांबरोबरच ऊसाची चिपाडे, कृषिजन्य टाकाऊ पदार्थ, सेंद्रीय, वैद्यकीय, औद्योगिक खनिजजन्य व इतर टाकाऊ पदार्थासारख्या स्रोतांपासून वीज निर्मिती करता येणे शक्य आहे. अशा प्रकल्पांना चालना देण्यासाठी अपारंपरिक ऊर्जेबाबतचे धोरण जाहीर केले.**



ऊर्जा विभाग मंत्री या नात्याने मी गेले वर्षभर राज्याला भारनियमन मुक्त करणे, शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवून खेडोपाडी वीज उपलब्ध करून देणे आणि अपारंपरिक ऊर्जास्रोतांपासून मुबलक वीज निर्मिती करणे यावर लक्ष केंद्रित केले आहे.

राज्यातील भविष्यातील विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन अपारंपरिक स्रोतांपासून १४०० मे. वॅ. वीजनिर्मितीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. वेगवेगळ्या अपारंपरिक स्रोतांपासून वीजनिर्मितीचे प्रकल्प उभारण्यासाठी युवकांना प्रोत्साहित करण्यात आले. या प्रकल्पातून मिळालेल्या नफ्यातील काही भाग प्रकल्पधारकांनी गावाच्या विकासाकरिता देणे बंधनकारक आहे

**चंद्रशेखर बावनकुळे**
(ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री)

## मुबलक वीज पुरवठा

यावर्षी उन्हाळ्यात सर्वाधिक मागणीच्या कालावधीत २०१७४ मेगावॅट इतक्या सर्वाधिक प्रमाणात वीजपुरवठा आणि बाह्यस्रोतांकडून अल्पकालीन वीज खरेदीतून महागडी वीज घेण्याऐवजी, संचाचा भारांक वाढवून सरस भारव्यवस्थापन तसेच वीजपुरवठ्याच्या पायाभूत सुविधांतर्गत ६५ उपकेंद्रे, १५५ पॉवर राहित्रे, १८,६४६ वीजवितरण रोहित्रे तसेच १९,४९० कि.मी. वीजवाहक तारांचे जाळे पूर्ण करण्यात यश आले आहे. वीज दरात प्रथमच सरासरी ५.७२ टक्के इतकी कपात, औद्योगिक वीजदरात सुमारे १० ते २० टक्के कपात, यंत्रमागधारक तसेच शैक्षणिक संस्था यांसारख्या नवीन ग्राहक क्षेणींची निर्मिती आणि सर्व २.७० कोटी घरगुती ग्राहकांना एकूण ३.६ कोटी एल.ई.डी. दिव्यांचे वाटप करण्याचे काम जुलै २०१५ पासून सुरू केले आहे.

## अपारंपरिक ऊर्जा

अपारंपरिक उर्जेंतर्गत एकूण १४.४ गिगावॅटचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रथमच एकत्रित अपारंपरिक ऊर्जा धोरण जाहीर केले. शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी प्रधान्यांने १०,००० सौर पंपाच्या उभारणीची प्रक्रिया सुरू केली आहे. अपारंपरिक व नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल वित्त आयोगाकडून राज्याला ९६१ कोटी रुपये प्रोत्साहनपर अनुदान मिळाले. अपारंपरिक ऊर्जा धोरणांतर्गत पारेषण संलग्न असे ५ हजार मेगावॅट क्षमतेचे पवन ऊर्जा, एक हजार मेगावॅट क्षमतेचे उसाच्या चिपाडांवर, कृषी अवशेषांवर आधारित सहवीज निर्मिती, ४०० मेगावॅट क्षमतेचे लघुजल, ३०० मेगावॅट क्षमतेचे कृषिजन्य अवशेषांवर आधारित, २०० मेगावॅट क्षमतेचे औद्योगिक टाकाऊ पदार्थांपासून वीज निर्मिती आणि ७५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जेपासून वीज निर्मिती असे एकूण १४,४०० मेगावॅट क्षमतेचे नवीन व नवीकरणीय ऊर्जेपासून वीज निर्मितीचे पारेषण संलग्न प्रकल्प पुढील पाच वर्षामध्ये उभारले जातील.

## विजेचे दर कमी

आम्ही सत्तेवर येताच विजेचे दर कमी करण्याची आग्रही भूमिका स्वीकारली होती. त्याचेच फलित म्हणजे १९९२ नंतर प्रथमच राज्यात विजेचे दर कमी झाले. वीजचोरीला आळा घालण्यात यशस्वी झालो. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात येऊ घातलेल्या वीज निर्मिती प्रकल्पांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.



## शेतकऱ्यांच्या हितासाठी

राज्यात विविध शासकीय तसेच खाजगी पारेषण परवानाधारकांकडून शेतामध्ये अतिउच्च दाब वाहिन्या उभारण्यात येतात. वाहिन्या उभारताना शेतकऱ्यांच्या उभ्या पिकाचे अथवा फळझाडाचे नुकसान होते. मनोऱ्याने व्याप्त जमिनीचा शेतकऱ्याला योग्य मोबदला मिळावा या दृष्टीने महापारेषण कंपनीने शासनास प्रस्ताव सादर केला आहे. तसेच पारंपरिक मनोरे उभारताना शेतकऱ्यांच्या जागेचे नुकसान होते ते कमी करण्यासाठी मोनोपोलचा वापर करण्यास पारेषण कंपनीस परवानगी देण्यात आली आहे.




मुंबईतील वीज मागणी व वीजनिर्मिती यांमधील तफावत दूर करण्याच्या दृष्टीने महापारेषण व टाटा पावर यांच्यातर्फे काही कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी महापारेषण कंपनीतर्फे २२० के.व्ही. खारघर–कळवा, बोरिवली–बोईसर या वाहिन्यांच्या जागी जास्त क्षमतेचे वाहक वापरून बहुपथ वाहिन्या उभारण्याचे काम सुरू आहे. टाटा पॉवर कंपनीतर्फे २२० के.व्ही. कळवा – सालसेट द्विपथ वाहिनीचा वाहक बदलून जास्त क्षमतेचा वाहक उभारण्याचे काम सुरू आहे. या तातडीच्या उपाययोजनांद्वारे मुंबईसाठी ११०० मे.वॅ. अतिरिक्त क्षमता उपलब्ध होणार आहे.

राज्यातील वीजग्राहकांच्या हितासाठी वीज दर नियंत्रित ठेवणे हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता. 'मेक इन महाराष्ट्र' हे धोरण यशस्वीपणे राबवण्यासाठी वीजदर नियंत्रित ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या कंपन्यांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी व खर्च कमी करण्यासाठी अंतर्गत सुधारणांचा कालबद्ध कार्यक्रम राबवण्यात येत आहे.

## ग्राहकांच्या हितासाठी

वीज ग्राहकांना दर्जेदार व अखंडित वीज पुरवठा व्हावा. वीजविषयक सर्व सेवा व्यवस्थित मिळाव्यात, महावितरणमध्ये सुरू असलेल्या विविध कामांवर देखरेख ठेवणे तसेच योजना, विजबिल वसुली, कृषिपंप, घरगुती प्रलंबित जोडण्या, सौरकृषी पंपाच्या कामाचा आढावा घेणे इत्यादीसाठी प्रत्येक तालुक्यात व जिल्ह्यात तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय विद्युत नियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. गावपातळीवर वीज ग्राहकांच्या विविध तक्रारी उदा. खंडित वीजपुरवठा, वीजजोडणी मिळणे, बिलाची दुरुस्ती इ. तक्रारीची नोंद ठेवणे व त्या तक्रारीचे योग्य वेळेत निरसण करणे यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयमध्ये नोंदवही ठेवण्याबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना निर्देश देण्यात आले असून आतापर्यंत २९६०९ ग्रामपंचायतीपैकी २७१०१ ग्रामपंचायतीमध्ये तक्रार नोंदवही ठेवण्यात आली आहे.

महावितरण कंपनीने, राज्यातील तात्पुरत्या बंद अथवा कायमस्वरूपी विद्युत पुरवठा बंद असलेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचा वीज पुरवठा सुरू करण्यास संधी उपलब्ध करून दिली आहे. अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर करून स्वस्त व मुबलक दरात वीजनिर्मित करून राज्याला भारनियमन मुक्त करणे आणि खेडोपाडी वीज पुरवणे, शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवून त्यांचे सक्षमीकरण करणे, यावर गेल्या वर्षभरात मी लक्ष केंद्रित केले. त्यांचे चांगले परिणाम आता दिसू लागले आहेत, याचे मला समाधान आहे.

**शब्दांकन : जयश्री कोल्हे**



## बदल घडले आहेत...

- १९९२ नंतर प्रथमच राज्यात विजेचे दर कमी झाले
- महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात येऊ घातलेल्या वीजनिर्मिती प्रकल्पांना विविध सुविधा उपलब्ध
- महापारेषण विभागाच्या प्रणालीच्या सक्षमीकरणावर भर
- मुंबईस अखंड वीजपुरवठा करण्याच्या दृष्टीने महापारेषण व टाटा पॉवर यांच्या तर्फे उपाययोजना सुरू.
- कोराडी, चंद्रपूर व परळी येथील औष्णिक प्रकल्पांना कालबद्ध पद्धतीने गती
- कोराडी येथील प्रकल्पाकरिता नागपूर शहरातील १३० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या भांडेवाडी प्रकल्पातून सांडपाणी प्रक्रियेद्वारे शुद्ध केलेले पाणी वापरण्यात येणार
- वीजग्राहकांच्या हितासाठी वीज दर नियंत्रित
- बंद पडलेल्या कोराडी, चंद्रपूर व परळी येथील औष्णिक प्रकल्पांची कारणमीमांसा समजून घेऊन कृती आराखड्याची निर्मिती. या प्रकल्पांना कालबद्ध पद्धतीने गती. त्यामुळे चंद्रपूर येथील ५०० मेगावॅट क्षमतेचा संच क्र. ८ कोराडी येथील ६६० मेगावॅट क्षमतेचा संच क्र. ८ हे दोन्ही संच मार्च २०१५ मध्ये पूर्ण क्षमतेने कार्यान्वित.

# घरात शौचालय दारात पाणी...



पाणी हे जीवन आहे आणि ते प्रत्येक व्यक्तीस मिळणे हा त्यांचा नैसर्गिक अधिकार आहे. स्वच्छ व शुद्ध पाणी प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी मी यशस्वीपणे पार पाडेन, असा मला विश्वास आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत लोकसहभागातून गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देऊन किफायतशीर खर्चात आणि शाश्वत पद्धतीने ग्रामीण व नागरी भागातील रहिवाशांना सुरक्षित पिण्याचे पाणी व स्वच्छता सेवा दिली जाईल, यात शंका नाही. गेल्या १० महिन्यात मी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला आहे. राज्यातील बहुतांशी जिल्ह्यांना भेटी देऊन पाणी पुरवठा विभागाचे व स्वच्छतेचे काम मोठ्या जोमाने सुरू केले. यामध्ये राज्यात बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजना, त्यांची विविध कारणे यांचा संपूर्ण आढावा घेऊन, राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना विशेष निधी उपलब्ध करून दिला. संबंधित जिल्हाधिकारी यांना २५ लक्ष रुपयांपर्यंतचे दुरुस्तीचे अधिकार देऊन बंद पाणी पुरवठा योजना पूर्ववत सुरू केल्या.



**संपूर्ण महाराष्ट्र स्वच्छ बनवण्यासाठी व जनतेला मुबलक पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी 'घरात शौचालय दारात पाणी' हे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार आम्ही केला आहे. यंदा पर्जन्यमान कमी झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या जाणवत आहे. विशेषत: मराठवाडा विभागात पर्जन्यमान अतिशय कमी झाल्यामुळे मराठवाडा दुष्काळाच्या छायेत आहे. शासन दुष्काळग्रस्त भागातील जनतेच्या पाठीमागे खंबीरपणे उभे असून, जनतेला स्वच्छ व शुद्ध पाणी उपलब्ध करून करून देण्यासाठी आम्ही काटेकोर प्रयत्न करणार आहोत. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या माध्यमातून या वर्षीच्या दुष्काळावर मात करू, असा मला ठाम विश्वास आहे.**

**बबनराव लोणीकर**
(पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री)

पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियानाची सर्व जिल्ह्यांमधून चांगल्याप्रकारे अंमलबजावणी सुरू आहे. २६०३ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्याने आपले राज्य देशात क्रमांक एकवर आले आहे. देवगड, मालवण, गगनबावडा, जावळी, महाबळेश्वर आणि मुळशी असे एकूण ६ तालुके हागणदारीमुक्त झाले आहेत. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने गेले वर्षभर नियोजनबद्ध केलेल्या कार्याचे हे फलित असल्याचे दिसून येते.

मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या मराठवाड्यातील दौऱ्यामध्ये मीसुद्धा सहभागी झालो होतो. ग्रामीण भागाच्या शेतकऱ्यांच्या व्यथा या अधिक चांगल्या पद्धतीने मुख्यमंत्र्यांसमोर आल्या. जेणेकरून शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय तातडीने घेतले.

पाणी पुरवठा व स्वच्छता खात्याचा मंत्री म्हणून काम करताना माझ्या लक्षात आले की, शासनाची ग्रामीण पाणी पुरवठ्यासाठीची स्वतंत्र अशी कोणतीही योजना नाही. दरम्यान चालू आर्थिक वर्षात केंद्रशासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेची व्याप्ती केंद्रशासनाने कमी केल्यामुळे निधी उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. या अडचणीवर मात करण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना' आम्ही राज्यासमोर आणली आहे. यावर लवकर निर्णय झाल्यास ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या योजनांचा मार्ग सुकर होईल.

### 'अमृत'साठी आम्ही

मुख्यमंत्री महोदयांनी, केंद्र शासनाच्या 'अमृत अभियाना'ची राज्यात अंमलबजावणी पाणी पुरवठा विभागाच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानाची प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून जीवन प्राधिकरण कार्य करेल. केंद्र शासनपुरस्कृत अटल मिशन फॉर रिज्युव्हेनेशन अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) अभियान हे



पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर स्वच्छता अभियान राबवताना.

प्रामुख्याने शहरात पाणी पुरवठा, मल:निस्सारण, नागरी परिवहन, इ. नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी राबवले जाणार आहे. यामध्ये राज्यातील ४३ शहरांची निवड करण्यात आली आहे. विविध योजनांच्या माध्यमातून जनतेस शुद्ध जल देणे हे मी माझे कर्तव्य समजतो. स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्वीकृतीचे अधिकार रु. ५० लाखापर्यंत ग्रामसभेस तर रु.५० लाख ते रु.७.५० कोटीपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात आले आहेत.

### ग्रामीण पाणी पुरवठा सेवेचे सबलीकरण

स्वच्छ भारत मिशन व जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा क्षेत्राचे सबलीकरण केले जाणार आहे. स्वच्छ भारत मिशन व जलस्वराज्य टप्पा-२ या कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद व कार्यालयीन अधीक्षक, जलस्वराज्य टप्पा-२ या पदांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये निश्चित केली आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण देखभाल दुरुस्ती करत असलेल्या योजनांना; अनुदानाची रक्कम शासन स्तरावरून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास थेट वितरित करण्यात येईल. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत गावे हागणदारीमुक्त करण्यावर आमचा भर आहे. आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अनेक गावे स्वच्छ झाली आहेत. वैयक्तिक स्वच्छतेसोबतच संपूर्ण स्वच्छतेद्वारे गावाचा विकास करण्यावर भर दिला आहे. या अभियानातंर्गत स्वच्छतेबाबत उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर आणि राज्यातील निर्मलग्राम पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांनाही राज्यस्तरावरून बक्षिसे देण्यात येतात. या अभियानांतर्गत कुटुंबकल्याण, पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन / सामाजिक एकता या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना बक्षिसे देण्यात येत आहेत.

मे, २०१५ पर्यंत राज्यातील ६९,९४,४०१ (५६%) कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. २०१५-१६ साठी १७,४३,२६४ कुटुंबांना वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यातील ९८७८ ग्रामपंचायतींना तर ११ तालुक्यांना केंद्रशासनाच्या निर्मल ग्राम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र सुवर्णमहोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना यशस्वीपणे राबवण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंबीयांना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालये उपलब्ध करून देताना; खाजगी नळ जोडण्यांसाठी रुपये ४,००० प्रतिकुटुंब आणि वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी रुपये ११,००० प्रतिकुटुंब याप्रमाणे अनुदान दिले जाते. स्वच्छ गावांचा विकास झपाट्याने होतो हे ओळखून आम्ही गावांना स्वच्छ करण्याचा निर्धार केला आहे.

**शब्दांकन - राहुल भालेराव**




## बदल घडले आहेत...

- बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजना व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना विशेष निधी उपलब्ध करून देऊन तेथील जिल्हाधिकाऱ्यांना २५ लाख रुपयांपर्यंतचे दुरुस्तीचे अधिकार प्रदान.
- स्वच्छ भारत अभियानाची सर्व जिल्ह्यांमधून चांगल्याप्रकारे अंमलबजावणी करून २६०३ ग्राम पंचायती हागणदारीमुक्त होऊन महाराष्ट्र देशात क्रमांक १ वर आले आहे.
- राज्य शासनाची स्वतंत्र 'मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना'.
- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या बळकटीकरणासाठी जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची प्रकरणे व आराखडे तयार करण्यासाठी असलेल्या ९ टक्के निधीची तरतूद रद्द करून ती ४ टक्क्यांवर आणली.
- ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनेमध्ये सौर ऊर्जेवर आधारित पंप बसवण्यास मान्यता
- झऱ्यावर आधारित लघु नळ पाणी पुरवठा योजना
- सर्व गावे/वाड्या-वस्त्यांमधील पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे राज्यातील १८ जिल्ह्यांमध्ये संख्यात्मक सर्वेक्षण पूर्ण
- पिण्याच्या पाण्यातील जड धातू घटकांची तपासणी करण्यासाठी निरी, नागपूर या संस्थेशी मे, २०१५ मध्ये सामंजस्य करार

# समतेच्या दिशेने



गेल्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेतला असता मी इथे आवर्जून सांगू इच्छितो की, एवढ्या कमी कालावधीत शासनाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लंडनमध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे सन १९२०-१९२२ काळात शिकत असताना वास्तव्य असलेल्या घरखरेदीचा निर्णय होय. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात सत्तेवर आल्यानंतर शासनाने या घरखरेदीचा निर्णय घेतला. तो पूर्णत्वास नेण्याचे काम सामाजिक न्याय विभागाने केले आहे. एवढ्या कमी कालावधीत घर खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली असून घराचा ताबाही मिळाला आहे, ही या विभागाची सर्वात मोठी कामगिरी म्हणावी लागेल. राज्यातीलच नव्हे तर देशभरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी तसेच त्यांचे विचार मानणाऱ्यांसाठी ही एक अभिमानाची गोष्ट ठरणार आहे. या ठिकाणी आम्ही एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणार आहोत. या घराचे लोकार्पण दि. ११ नोव्हेंबर २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लंडन येथे होणार आहे.

याशिवाय लंडनमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने अध्यासन वर्ग सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे. यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अभ्यास करणाऱ्या संशोधकांना मोठी संधी मिळेल.

**सामाजिक न्याय विभाग हा शासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचणारा हा विभाग असल्यामुळे या विभागाची जबाबदारी मंत्री म्हणून माझ्यावर आली, याचा मला विशेष आनंद आहे. समाजातील वंचित, दुर्बल घटकांसाठी शासन अनेक योजना राबवत असते. त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवणे, त्यांची अंमलबजावणी करणे हे या विभागाचे काम आहे. या विभागाने गेल्या वर्षभरात अनेक योजना राबवल्या. तर काही योजना या जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्या दृष्टीने माझ्या विभागाने प्रभावीपणे वाटचाल सुरू केली आहे.**

### समता व सामाजिक न्याय वर्ष

यंदाचे वर्ष हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष आहे. मागास समाजाला दिशा देणाऱ्या या महामानवाचे यानिमित्ताने स्मरण व्हावे, यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत हे वर्ष 'समता व सामाजिक न्याय वर्ष' म्हणून साजरे करण्यात येणार आहे. या वर्षात विविध कार्यक्रम राबवण्यात येतील. त्यासाठी १२५ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या समता व सामाजिक न्यायवर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यास व त्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाच्या कार्यक्रमांना सांस्कृतिक कार्यक्रम, जलसा, नाटक इत्यादींद्वारे विविध टी.व्ही. वृत्तवाहिन्या, रेडिओ, सोशल व समाज माध्यम मुद्रित माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल.

**राजकुमार बडोले**
(सामाजिक न्यायमंत्री)

केंद्र शासनाने स्थापन केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब समता प्रतिष्ठानची स्थापना करण्यात येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेसाठी पुणे शहर लगतच्या परिसरात नवीन प्रशासकीय इमारत व संकुल निर्माण करण्यात येईल. यामुळे जात पडताळणी व इतर अनुषंगिक कामे तातडीने पूर्ण होतील, हा एक महत्त्वाचा निर्णय या शासनाच्या कार्यकाळात घेतला गेला आहे, हे मी इथे आवर्जून नमूद करू इच्छितो.

### उद्योजकांना प्रोत्साहन

मला सांगायला आनंद होतो आहे की, दलित समाजातील उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे, तसेच या समाजामध्ये जास्तीत जास्त उद्योजक निर्माण व्हावेत, यासाठी मुंबईत एक भव्य प्रदर्शन भरवण्यात येईल. त्यामध्ये दलित उद्योजकांची उत्पादने मांडण्यात येणार आहेत. सामाजिक न्याय विभागामार्फत पहिल्यांदाच अशा प्रकारे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे.




दलित समाजातील अनेक महिला शिकून वेगवेगळ्या कंपन्या, सरकारी कार्यालयात कामाला जात आहेत. यातील अनेक महिलांना मुंबई, पुणे, नागपूरसारख्या ठिकाणी कामासाठी राहावे लागते. परंतु त्यांना राहण्यासाठी चांगली जागा उपलब्ध होत नाही. हे लक्षात घेऊन विभागामार्फत या वर्षात अशा नोकरी करणाऱ्या

महिलांसाठी मुंबई, पुणे व नागपूर येथे वसतिगृह उभारण्यात येणार आहेत. यामुळे त्यांची राहण्याची चांगली सोय होईल. मागासवर्गातील जास्तीत जास्त महिला निर्धास्तपणे नोकरी करतील.

### विद्यार्थिनींना दिलासा

दलित समाजातील अनेक विद्यार्थिनी आता शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येत आहेत. परंतु गावाकडे उच्च शिक्षणाची सोय नसल्यामुळे त्यांना नाईलाजाने तालुक्याच्या ठिकाणी यावे लागते. परंतु तेथे त्यांच्या राहण्याची सुविधा नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. हे लक्षात घेऊन शासनाने ५० तालुक्यात मागासवर्गीय मुलींसाठी ५० विद्यार्थी क्षमतेची वसतिगृहे बांधण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या स्मार्ट सिटीच्या धर्तीवर राज्यातील निवडक दलित वस्तीच्या सर्वंकष विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष घटक वस्ती सुधार योजना राबवण्यात येणार आहे. त्याद्वारे या वस्त्यांमध्ये सर्व प्रकारच्या सोयीसुविधा निर्माण करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

### कौशल्य विकासावर भर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ही या विभागाची एक महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेचे बळकटीकरण करून या माध्यमातून जास्तीत जास्त दलित तरुणांना कौशल्यवान करण्याचा माझा प्रयत्न आहे. उपेक्षित मागास समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तिंचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समताभूषण गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. दरवर्षी देण्यात येणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप आता एक लाख रुपये रोख व सन्मानचिन्ह अशी आहे.

### अपंग धोरण

अपंगांचे सक्षमीकरण व्हावे, त्यांना समाजात सन्मानाने जगता यावे, यासाठी राज्य शासन अपंग सक्षमीकरण धोरण तयार करत आहे. या धोरणात अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे. हा मसुदा केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठवण्यात आला आहे. लवकरच तो मंजूर होणार असून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

सामाजिक न्याय विभागामार्फत पुढील काळात अजूनही वेगवेगळ्या योजना राबवण्याचा मानस आहे. त्या माध्यमातून मागासवर्गीय तरुणांना सक्षम करण्याचे माझे ध्येय आहे. राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत हे काम येत्या काळात होईल, हे मी इथे ठामपणे सांगू इच्छितो.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२१-२२ या कालावधीत लंडनमध्ये असताना त्यांचे वास्तव्य असलेले घर आता राज्य शासनाच्या ताब्यात आले आहे.




## बदल घडले आहेत...

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमधील घर खरेदी. या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणार
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष 'समता व सामाजिक न्याय वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय
- नोकरी करणाऱ्या महिलांसाठी मुंबई, पुणे व नागपूर येथे वसतिगृह उभारण्याचा निर्णय
- राज्य लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या तयारीसाठी पुणे, नागपूर आणि औरंगाबाद येथे निवासी प्रशिक्षण केंद्र सुरु
- ५० तालुक्यात मागासवर्गीय मुलींसाठी ५० विद्यार्थी क्षमतेची वसतिगृहे बांधण्याचा निर्णय
- राज्यातील निवडक दलित वस्तीच्या सर्वंकष विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष घटक वस्ती सुधार योजना
- मागास समाजातील विद्यार्थ्यांना एम.फील व पीएच.डी.च्या शिक्षणासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने फेलोशिप सुरू. अशा प्रकारची ही देशातील पहिलीच फेलोशिप
- अनुसूचित जातीतील महिलांसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावे वेगळी फेलोशिप देण्यात येत असून एम.फील व पीएच.डी. करणाऱ्या महिलांना त्याचा लाभ

# नव्या आशा

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त २०१५-१६ हे वर्ष 'सामाजिक समता व न्याय वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

मुंबईतील चैत्यभूमीलगत असलेल्या इंदू मिलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले असून या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तृत्वाला साजेसे असे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारले जाईल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील वास्तव्य असलेले १० किंग्ज हे किंग्ज हेन्री रोड येथील निवासस्थान खरेदी करण्यास राज्य शासनाला यश प्राप्त झाले आहे. तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक स्थापन करण्यात येईल. मेक इन इंडियांच्या धर्तीवर 'मेक इन महाराष्ट्र' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत विविध कौशल्य विकासावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करता यावी यासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी नागपूर, पुणे आणि दिल्ली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था यांचे (बार्टी) मार्फत मोफत निवासी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग व अखिल भारतीय सेवा परीक्षेसाठी युवकांना योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र पुणे, नागपूर आणि औरंगाबाद सुरू करण्यात आली आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जात पडताळणी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिष्यवृत्तीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील उत्तमोत्तम शिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे.



**दिलीप कांबळे**
(सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य, मदत व पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास, राज्य उत्पादन शुल्क राज्यमंत्री)

**शब्दांकन: काशीबाई थोरात**

# लोकाभिमुख

यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री आणि महसूल राज्यमंत्री म्हणून धुरा सांभाळल्यापासून मी प्रशासन अधिक गतिमान आणि लोकाभिमुख करण्यावर भर दिला. प्रत्येक व्यक्तीचा महसूल विभागाशी शहरापासून खेड्यापर्यंत जवळचा संबंध येतो. जनतेचे समाधान झाले तरच आपल्या पदाला काही अर्थ आहे, त्यामुळे प्रशासन आणि जनतेचे संबंध सुसंवादी होऊन समाजाभिमुख सुशासन देण्याबाबत माझी आग्रही भूमिका आहे. माझे विचार कृतीत उतरवण्यासाठी सुवर्णजयंती महाराजस्व अभियानांतर्गत राज्यात सर्वप्रथम 'समाधान शिबिर' यवतमाळ जिल्ह्यात सुरू केले. शासन 'लोकशासन' व प्रशासन 'लोकप्रशासन' व्हावे, नागरिकांच्या समस्या तत्काळ निकाली निघून त्यांचा वेळ, श्रम व पैसा वाचावा हा मुख्य उद्देश अशी शिबिरे सुरू करण्यामागे आहे. यानिमित्ताने लोकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या. त्यावर तोडगा काढण्यासाठी पाठपुरावा केला. उपविभागीय स्तरावरील समाधान शिबिरानंतर आता तालुका आणि मंडळस्तरावर जिल्ह्यात लोकप्रतिनिधींमार्फत समाधान शिबिर सुरू आहेत. याच धर्तीवर 'पालकमंत्री गाव भेट अभियान' सुरू करण्याचाही माझा मनोदय आहे. जलयुक्त शिवार अभियानातून जिल्हा टंचाईमुक्त करण्याचा ध्यास मी घेतला आहे. यासोबतच नदी पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेतला आहे. दारव्हा तालुक्यातील वडगाव गाढवे येथे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाची स्थळ पाहणी करून त्याचे काम तत्काळ मार्गी लावण्याचे निर्देशही मी दिले.

जिल्ह्यातील या पद्धतीचा हा पहिलाच प्रकल्प आहे. लोकांना चांगल्या अरोग्य सेवा मिळाव्यात. तसेच गरजू रूग्णांना आर्थिक मदत मिळावी यासाठी 'माँ आरोग्य सेवा समिती'ची स्थापना करून यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात रुग्णांच्या नातेवाईकांसाठी सर्व सोयींनी सज्ज असे 'मातोश्री प्रतीक्षालय व विश्रामगृह' बांधले. याठिकाणी स्वच्छतागृह, स्नानगृह, शुद्ध पाणी, विश्रांतीसाठी स्वतंत्र व्यवस्था अशा सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या. सर्वसामान्य नागरिकांना हा विभाग आपला वाटला पाहिजे, यावर आम्ही विशेष भर दिला आहे.



**संजय राठोड**
(महसूल विभाग राज्यमंत्री)

**शब्दांकन: संजय ओरके**




# समर्थ आणि सक्षम



**विद्या ठाकूर**
(महिला व बालविकास, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, औषधी प्रशासन राज्यमंत्री)

महिला व बालविकास, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण आणि औषधी प्रशासन या सर्व विभागात राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळणे हे माझ्यासाठी एक आव्हान होते.

महिला राज्यमंत्री म्हणून काम करीत असताना माझी जबाबदारी अधिक वाढली आहे, असे मला वाटते. महिलांना भेडसावणाऱ्या समस्या, त्यांचे प्रश्न जाणून घेण्याचा मी नेहमीच प्रयत्न करीत असते. प्रभावी नियोजन, महिला आणि बालकांसाठीच्या विविध योजना, महिलांचे सबलीकरण आणि बालकांचे सक्षमीकरण यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. यात अधिकाधिक काम करून तो आणखी आघाडीवर नेण्याचा माझा प्रयत्न असतो.

पदभार स्वीकारल्यानंतर बालकांच्या कल्याणासाठी काम करण्याचे मी निश्चित केले होते. त्याची सुरुवात मी निरीक्षण आणि बालगृहांपासून केली. बालगृहांची सुधारणा करण्याबरोबरच निरीक्षण आणि बालगृहातील बालकांचे प्रश्न सोडवण्यावर मी भर देत आहे. याशिवाय अनाथाश्रमातल्या मुलांसाठी बाल आधार कार्ड सुरू केले आहे. या बाल आधार कार्डावर त्या मुलांची सर्व माहिती असणार आहे. राज्यातील बालगृहांची सुधारणा करण्यावर मी आगामी काळात भर देणार आहे. बालगृहाच्या आधुनिकीकरणासाठी शासन प्रयत्नशील आहे. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व बालगृहात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. बाल सुधारगृहातील मुले व मुलींच्या कल्याणासाठी कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर भर देण्यात येईल. महाराष्ट्रातील एकही व्यक्ती अन्नाअभावी राहणार नाही, याची काळजी अन्न व नागरी पुरवठा विभागाची राज्यमंत्री म्हणून घेणे ही मी माझी प्राथमिकता समजते.

**शब्दांकन: वर्षा फडके**

# सहकाराचा आधार



**दादाजी भुसे**
(सहकार राज्यमंत्री)

ज्या राज्याने सहकाराचा पाया रचला त्या विभागाचा राज्यमंत्री या नात्याने वर्षभरात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात माझा सहभाग होता, याचा मला विशेष आनंद आहे. राज्यात सहकार चळवळ अधिक जोमाने रुजावी व घट्ट व्हावी, यासाठी आगामी काळातील वाटचाल असणार आहे. साखर कारखान्यास ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या रास्त आणि किफायतशीर किमतीची रक्कम अदा करण्यासाठी दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत व्याज अनुदान देण्याचा निर्णय घेतला.

२०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतल्याने जे साखर कारखाने केंद्र शासनाच्या या योजनेच्या निकषात बसत नाहीत, अशा साखर कारखान्यास ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांना रास्त आणि किफायतशीर किंमत अदा करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावर शासनामार्फत ५ वर्षे व्याज अनुदान देण्याबाबत निर्णय घेतला. २०१४-१५ या वर्षातील टंचाई परिस्थिती विचारात घेऊन अल्प मुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर करण्याचा निर्णय.

विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जातून मुक्त करण्यासाठी रुपये १७१.३० कोटी अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले. भूविकास बँकेच्या सुमारे ३७,७६६ थकबाकीदार शेतकऱ्यांकडील रु. ९४६ कोटी थकीत रकमेपैकी रु. ७१३ कोटी रकमेस सूट देण्याचा निर्णय घेतला. राज्यात सातत्याने निर्माण होणारी टंचाई परिस्थिती विचारात घेऊन अल्प मुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर केल्यानंतर अशा रूपांतरित कर्जाच्या परतफेडीच्या कालावधीत तीन वर्षांवरून पाच वर्षापर्यंत वाढ करण्याचा निर्णय शेतकऱ्यांसाठी अतिशय हिताचा ठरणार आहे. बँकिंग परवाना नसलेल्या नागपूर, वर्धा व बुलडाणा या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना केंद्र शासनाच्या योजनेतंर्गत रु. ३८० कोटी अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले आहे.

राज्यात सध्या नोंदणीकृत असलेल्या सुमारे २.४० लाख सहकारी संस्थांपैकी कामकाज बंद असलेल्या संस्थांची नोंदणी रद्द करण्याच्या दृष्टीने अशा संस्थांचे सर्वेक्षण सुरू आहे. सहकारी संस्थांनी नियमानुसार कर्जवसुली करावी. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ४४-अ मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

**शब्दांकन: अजय जाधव**

# सुरक्षिततेला प्राधान्य

गृह (ग्रामीण) पर्यटन, पणन, सार्वजनिक आरोग्य, कृषी आणि फलोत्पादन या राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका असलेल्या विभागाचा राज्यमंत्री म्हणून काम करीत असताना सर्वसामान्य माणसांच्या अपेक्षा पूर्ण करण्याबरोबरच समृद्ध महाराष्ट्र, सुरक्षित महाराष्ट्र हे ब्रीद पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न आहे. देशातील सर्वाधिक जागरूक पोलीस दलाचे बिरुद महाराष्ट्र पोलीस दलाने कायम जोपासले आहे. पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी तसेच बळकटीकरणासाठी पोलीस दलातील बदल्यांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे, पोलीस गृहनिर्माण महामंडळातील प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संचालक मंडळास देणे, पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात त्यांच्या दैनिक भत्याच्या दरात वाढ करणे यासारखे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शेतकऱ्यांना त्यांचा माल गोदामामध्ये ठेवण्यासाठी प्राधान्याने २५ टक्के आरक्षण व भाड्यामध्ये ५० टक्के सवलत दिली जात असून महामंडाळातील सर्व मालाचा (सुमारे रु. ३००० कोटी) विमा उतरवला आहे.



**राम शिंदे**
(राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), पणन, सार्वजनिक आरोग्य, पर्यटन, कृषी आणि फलोत्पादन)

महाराष्ट्रातील पर्यटनाच्या वाढीसाठी गोरेगाव, मुंबई येथे महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय ट्रॅव्हल मार्टचे आयोजन करण्यात आले. यामध्ये देशविदेशातील प्रवास, व्यापार, हॉटेल आणि इतर उद्योगातील लोकांबरोबरच विविध ३० देशातील खरेदीदार आणि १० पर्यटन महामंडळे यांनी भाग घेतला. या मार्टमुळे महाराष्ट्रातील तसेच देशातील पर्यटनास चालना मिळणार आहे. पर्यटकांच्या सोयीसुविधांसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने महा एक्सप्लोरर हे मोबाइल ॲप विकसित केले असून या ॲपमुळे पर्यटकांना पर्यटन स्थळांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. राज्यातील दुर्गम भागात महिला, बालकांच्या आरोग्य तपासणीची शिबिरे गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणात आयोजित केली होती. राज्यातील जनसामान्यांस आरोग्य सेवा सुलभरीत्या पुरवण्यासाठी आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता दूर व्हावी, यासाठी विविध योजना आखल्या असून त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत.

**शब्दांकन: विलास बोडके**

# सिंचन समृद्धी

या वर्षी अत्यल्प पाऊस पडला. त्यामुळे बऱ्याच जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. तसेच थोड्याफार प्रमाणात दरवर्षी दुष्काळाशी सामना करावा लागतो. या दुष्काळाच्या काळात पीकपाण्याची होणारी हानी भरून न येणारी असते. अशा अवस्थेत बळीराजा खचून जातो. या सर्वांवर प्रभावी उपाय असणे काळाची गरज बनलेली होती. शाश्वत शेतीसाठी पाणी तसेच पिण्यासाठी पाण्याची उपलब्धता करून देण्यासाठी आम्ही महत्त्वाचे निर्णय घेतले. जलसंधारणांतर्गत सर्व उपाययोजना व उपचार एकात्मिक पद्धतीने व सर्व विभागांच्या समन्वयाने नियोजनबद्ध पद्धतीने आराखडा तयार केला. त्यातूनच जलयुक्त शिवार अभियान साकारले. पावसाचे जास्तीत जास्त पाणी शिवारात अडवणे, भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करणे, पाणी साठवण क्षमता निर्माण करण्यासाठी नवीन कामे घेऊन अस्तित्वातील पाणीसाठे, बंधारे, तलाव इत्यादींची दुरुस्ती करून, किमान ५००० गावे दरवर्षी टंचाईमुक्त करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

शासनाचे ध्येय टँकरमुक्त महाराष्ट्र करणे, यासोबतच २०१९ पर्यंत महाराष्ट्र टंचाईमुक्त करणे हे आहे. पावसाळ्याच्या अनिश्चित व विषम स्वरूपामुळे उपलब्ध पाण्याचा नियोजनबद्ध साठा होण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर कोल्हापूर बंधाऱ्यांचे दरवाजे वेळीच लावणे व उघडणे याबाबत काटेकोरपणे व्यवस्थापन करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. क्षेत्रीय स्तरावर आढावा बैठक घेऊन हा कार्यक्रम मोहीम स्वरूपात राबवण्यात येत आहे. सिंचन क्षेत्रातील पाणी वापराची कार्यक्षमता वाढवण्याच्या उद्दिष्टांशी निगडित प्रकल्प, कार्पोरेट क्षेत्राच्या सहकार्याने सामाजिक जबाबदारीच्या तत्त्वानुसार उपलब्ध करून देणारे धोरणही विभागाने जाहीर केले आहे.



**विजय शिवतारे**
(जलसंपदा व जलसंधारण, संसदीय कामकाज राज्यमंत्री)

राज्यातील पाणीटंचाईवर तात्पुरती मलमपट्टी न करता कायमस्वरूपी उपाययोजना करण्यावर सरकारचा भर आहे. तलावांच्या पुनरुज्जीवनाची विशेष मोहीम सरकारने हाती घेतली आहे. जलसंपदा आणि जलसंधारणाच्या माध्यमातून शाश्वत सिंचनाकडे गेल्या वर्षभरात राज्याने वाटचाल सुरू केली आहे. त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत.

**शब्दांकन: राहूल भालेराव**




# कामगारांना दिलासा



**विजय देशमुख**
(सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), परिवहन, कामगार, वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री)

मागील एक वर्षाच्या काळात राज्य शासनामार्फत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. माझ्याकडे राज्यमंत्री पदाची जबाबदारी असलेल्या परिवहन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), कामगार, वस्त्रोद्योग आणि पदूम विभागामार्फतही जनहिताच्या दृष्टीने भरीव कामे करण्यात आली.

कामगार हा राज्यातील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. संघटित आणि असंघटित कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळावेत, यासाठी शासनाचा कामगार विभाग कार्य करतो. या विभागामार्फत मागील वर्षभरात त्या दृष्टीने व्यापक प्रयत्न करण्यात आले. मालक आणि कामगार या दोघांमध्ये समन्वय घडवून आणून योग्य मार्ग काढण्यावर माझा भर राहिला. यातून कंपनी चालू राहण्याबरोबरच कामगारांना न्याय मिळवून देण्यात आम्ही यशस्वी ठरू शकलो. विभागामार्फत ऊसतोड कामगारांसाठी माथाडी अधिनियमांतर्गत मंडळ स्थापन करणे, माथाडी सल्लागार समितीची पुनर्रचना करणे, असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळाची स्थापना करणे, साखर कारखाना कामगारांच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी त्रिपक्षीय समितीची स्थापना असे विविध निर्णय घेण्यात आले.

राज्यात पिकणाऱ्या कापसाच्या प्रत्येक बोंडावर राज्यातच प्रक्रिया करून त्यामार्फत मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करण्यावर वस्त्रोद्योग विभागाचा भर आहे. या दृष्टीने वस्त्रोद्योग विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. शासनाने वस्त्रोद्योगासाठी एकात्मिक प्रक्रिया विकास योजना जाहीर केली असून त्याअंतर्गत सर्व प्रकारच्या वस्त्रोद्योग प्रक्रिया घटकासाठी अनुदान देण्यात येणार आहे. राज्यातील पहिल्या मेगा टेक्सटाइल पार्कचा नांदगाव पेठ, अमरावती येथे शुभारंभ करण्यात आला आहे.

**शब्दांकन: इर्शाद बागवान** ■■

# सर्वसमावेशक विकास



**दीपक केसरकर**
(वित्त, ग्रामविकास, नियोजन राज्यमंत्री)

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राला सतत दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि गारपीट या नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पात शेतकरी केंद्रबिंदू ठेवण्यात आला आहे. पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन जलयुक्त शिवार या योजनेसाठी करण्यात आलेली एक हजार कोटी रुपयांची तरतूद हा त्याचाच एक भाग आहे, असे म्हणता येईल. सिंचन प्रकल्पांच्या कामाला गती देणे आणि पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करणे याला आम्ही महत्त्व दिले आहे.

राज्याचा वित्त व नियोजन राज्यमंत्री म्हणून काम करीत असताना कृषी आणि ग्रामविकासासाठी पायाभूत सुविधा तयार करण्यावर भर देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यासोबतच शेतकरी, महिला, तरुण अशा सर्वच घटकांचा विचार करण्यात येत आहे. शेतीविषयक योजना, सिंचन, रस्ते विकास, विद्युत, घरकूल योजना, पायाभूत सुविधा, उद्योग व पर्यटन, वने, कौशल्य विकास, शिक्षण, आरोग्य, महिला विकास यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. मुख्य म्हणजे 'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर 'मेक इन महाराष्ट्र'ची बीजेही रोवण्यात येत आहेत.

राज्याच्या अर्थव्यवस्थेला ऊर्जितावस्था देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मेक इन महाराष्ट्र, मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजना, आमदार आदर्श गाव विकास योजना, डिजिटल महाराष्ट्र, स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट सिटी यांसारख्या नावीन्यपूर्ण योजनांसाठी विशेष तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्वच्छ भारत'चा नारा दिला आहे. ग्रामविकास राज्यमंत्री म्हणून हाच नारा गावागावांत घेऊन जाणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रत्येक गावात शौचालय बांधणे, गावातील परिसर स्वच्छ ठेवणे, हागणदारीमुक्त गाव निर्माण करण्याबरोबरच गावात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या पाहिजेत, प्राथमिक आरोग्य केंद्रे झाली पाहिजेत, हे आमचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट जेव्हा साध्य होईल, तेव्हा प्रत्येक गाव हे स्वयंपूर्ण झालेले असेल. त्या दिशेने आम्ही गेल्या वर्षभरात वाटचाल केली असून आगामी काळात गावे स्वयंपूर्ण होतील, असा मला विश्वास वाटतो.

**शब्दांकन: वर्षा फडके** ■■

# सक्षमीकरण

राज्यातील आदिवासी जनतेला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन विविध स्तरावरून योजना राबवत आहे. आदिवासी विद्यार्थ्यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात आपला वेगळा ठसा उमटवणे तसेच इंग्रजी भाषेमध्ये प्रभुत्व मिळवणे गरजेचे असल्याचे मला वाटते. त्यामुळे खाजगी संस्थांमार्फत आश्रमशाळा चालविण्यासाठी शासन अर्थसाहाय्य देत आहे. शालेय शिक्षण पूर्ण करून आदिवासी विद्यार्थी जेव्हा बाहेर पडतील तेव्हा त्यांना तत्काळ महाविद्यालयात प्रवेश मिळावा, यासाठी आश्रमशाळेत महाविद्यालय सुरू करण्याची परवानगी प्राधान्याने देण्यात येत आहे. आदिवासी समाजातील जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी शासन कोणतीही कसूर ठेवणार नाही.



**राजे अम्ब्रीशराव राजे सत्यवानराव अत्राम**
(आदिवासी विकास राज्यमंत्री)

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ टक्के मुक्त थेट निधी योजना सुरू केली आहे. प्रत्येक पेसा ग्रामपंचायतीतील ग्रामसभा कोष समितीच्या ५ सदस्यांना यशदामार्फत प्रशिक्षण. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्वयंचलित यंत्रणेमार्फत तयार केलेला पौष्टिक, संतुलित, ताजा, रुचकर व आरोग्यदायी आहार वेळेवर पुरवण्यासाठी मुंढेगाव (जि. नाशिक) व कांबळगाव (जि. पालघर) येथे टाटा ट्रस्ट व अक्षयपात्रा फाऊंडेशन यांच्या सहकार्याने अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृहाची उभारणी, असे महत्त्वाचे निर्णय गेल्या वर्षभरात आम्ही घेतले आहेत.

मुंढेगाव मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून दररोज सुमारे ४००० विद्यार्थ्यांना जेवण पुरवण्यात येते, तर कांबळगाव मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून दररोज सुमारे ८००० विद्यार्थ्यांना जेवण पुरवण्यात येणार आहे. आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनातर्फे विविध योजना आखल्या आहेत. या योजनांमधून आदिवासी मुलांचे कुपोषण कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. गरोदर स्त्रियांच्या आरोग्याची आणि आहाराची काळजी घेतली जात आहे.

**शब्दांकन: राहूल भालेराव**

# सुधारणा आणि नावीन्य

महाराष्ट्रातील जनतेशी थेट संपर्क येणाऱ्या विभागांपैकी एक विभाग म्हणजे गृहनिर्माण तसेच उच्च व तंत्रशिक्षण. हे दोन्ही विभाग नेहमीच जनतेसाठी अतिशय जिव्हाळ्याचे आणि प्रत्येकाशी निगडित असे अविभाज्य घटक बनले आहे. जनता तसेच विद्यार्थ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून गेल्या वर्षभरात गृहनिर्माण तसेच उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात अनेक धोरणात्मक निर्णय आम्ही घेतले.

म्हाडा तसेच झोपडपट्टीच्या पुनर्विकासात, पुनर्वसित घटकाच्या इमारतीचा दर्जा विकासकातर्फे बांधण्यात येणाऱ्या विक्री घटकाच्या इमारती इतकाच चांगला असावा, यासाठी आम्ही सुयोग्य पावले उचलली आहेत.

यापुढे विकासकाची आर्थिक पत व स्थैर्य तसेच पुर्वानुभव पाहून त्यांच्या क्षमतेच्या कमाल मर्यादेची सुची केली जाईल. सुचीमध्ये असल्याशिवाय तो विकासासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांबरोबर करार करू शकणार नाही.



**रविंद्र वायकर**
(गृहनिर्माण, उच्च आणि तंत्र शिक्षण राज्यमंत्री)

कोणत्याही विकासकाकडे क्षमतेपेक्षा जास्त कामे असता कामा नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. ही अट ३३ (५), ३३ (७), ३३ (९), ३३ (१०) या विविध कलमांतर्गत येणाऱ्या सर्व विकासकास एकत्रितपणे लागू करण्याचा निर्णय घेतला.

पुनर्विकासात सर्व झोपडीधारकांची पात्रता सिद्ध होत नाही; तोपर्यंत भाडे दिलेच पाहिजे, असा महत्त्वपूर्ण निर्णय जनतेच्या हितासाठी घेतला. इमारती पूर्ण झाल्यानंतरही विकासक भोगवाटा प्रमाणपत्र न घेता घरांचा ताबा देतो. अशा वेळी त्या इमारतीचा सर्व खर्च (उदा. विद्युत, दुरुस्ती, देखभाल, मालमत्ता कर इत्यादी) भोगवाटा प्रमाणपत्र मिळेपर्यंत विकासकानेच द्यावा, असा धोरणात्मक निर्णय घेतला.

कोळीवाडे व गावठाण यांच्या विकासासाठी विकास नियोजन आराखड्यात योग्य त्या तरतुदी करण्यात येत आहे. तसेच नियमावलीत योग्य तरतुदी केल्या जात आहेत. म्हाडा संक्रमण शिबिरात योग्य कागदपत्रान्वये वास्तव्य करणाऱ्या सर्व रहिवाशांना अधिकृत करण्यात येईल. त्यांच्याकडून एकाच हस्तांतरणाचे मूल्य घेतले जाईल, त्याकरिता दर निश्चित करण्यात येतील.

**शब्दांकन: पवन राठोड**




# कौशल्य आणि सुविधा



**डॉ. रणजित पाटील**
(गृह (शहरे), नगरविकास, बंदरे, सामान्य प्रशासन, संसदीय कार्य, विधी व न्याय, कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री)

राज्याच्या सर्वांगीण विकासाचे मिशन डोळ्यासमोर ठेवत असताना प्रमुख शहरांमध्ये दळणवळणाच्या सुविधांबरोबरच पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्यात येत आहे. कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीसह बंदरांचा विकास करण्यात येत आहे. सागरी किनाऱ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याबरोबरच सुरक्षित महाराष्ट्रासाठी पोलीस दलाच्या सक्षमीकरणावर भर देण्यात येत आहे.

राज्यात गुंतवणूक तसेच उद्योगधंद्याच्या वाढीसाठी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी राज्याचे पोलीस दल कटिबद्ध आहे. पोलिसांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी उपाययोजना करीत असतानाच पोलीस दलातील बदल्यांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण केले. पोलीस गृहनिर्माण महामंडळातील प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संचालक मंडळास देण्यात आले. पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात एक दिवसाचे वेतन देण्याचा निर्णय घेण्यात आला. राजकीय व सामाजिक आंदोलनांमध्ये भाग घेणाऱ्यांवर १ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी दाखल झालेले व प्रलंबित खटले मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. फौजदारी खटल्यातील सिद्धपराधाचे प्रमाण वाढविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या असून महिलांच्या अत्याचाराविरुद्ध कामगिरी करणाऱ्या नागरिकांना 'निर्भया पुरस्कार' देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २०११ पासून रेंगाळत असलेला सी.सी.टी.व्ही. प्रकल्प मार्गी लावण्यात आला. मुंबई शहरामध्ये १५०० ठिकाणी एकूण ६०२० सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसवण्यात येत आहेत. कायदा व व्यवस्था सुरळित ठेवून राज्याची प्रगती करण्याच्या दृष्टीने गेल्या वर्षभरात विविध योजनांवर लक्ष केंद्रित केले आहे.

**शब्दांकन: विलास बोडके** ■■

# पारदर्शक कारभार



**प्रवीण पोटे पाटील**
(पर्यावरण, उद्योग, खनिकर्म, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) राज्यमंत्री)

शेतकरी सुखी आणि संपन्न व्हावा यासाठी सार्वजनिक जीवनात काम करताना सातत्याने प्रयत्न सुरू होते. त्यामुळे पर्यावरण, उद्योग, खनिकर्म, सार्वजनिक बांधकाम या विभागाचा राज्यमंत्री म्हणून पदाची शपथ घेतल्यानंतर चांगले काम करण्याची संधी मिळाल्याचे समाधान जसे होते, तसेच या संधीचा पुरेपूर उपयोग कसा करता येईल, याचा विचार सुरू होता. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकाचा विचार करून प्रत्येक निर्णय घेण्याची भूमिका स्वीकारून कामकाजाला सुरुवात केली.

वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, पर्यटन विकास, दळणवळण सुधारणा यासाठी रस्ते विकास आराखडा आम्ही तयार केला आहे. त्यानुसार ३,३६,००० कि.मी. रस्ते बांधणार आहोत. यासाठी पाच वर्षांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. रस्त्यांच्या मोठ्या कामांसाठी ५० लाख रुपयांपेक्षा अधिकच्या कामासाठी स्काडा प्रणालीचा वापर करून रस्त्यांची गुणावत्ता आणि त्रुटी भरून काढण्यासाठी उपाययोजना राबवण्यात आल्या.

संगणक प्रणालीद्वारे रस्त्यांची माहिती संकलित करून नवीन कामे मंजूर करण्यात येत आहे. नवीन योजना आखणी केली जात आहे. संनियंत्रणासाठी रोड मॅनेजमेंट सिस्टिमचा वापर करण्यात येणार आहे. सर्व रस्त्यांची पाहणी करून त्यातील अतिशय खराब असलेले १२०० कि.मी.रस्त्याचे तत्काळ नूतनीकरण करण्यात येत आहे.

टोलमुक्तीच्या अनुषंगाने पहिल्या टप्प्यामध्ये ३१ मे २०१५ पासून राज्यातील ९१ पैकी १२ टोलनाके पूर्णत: बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ७९ पैकी ५३ टोलनाक्यांवर कार, जीप एस.टी. व शाळा बसेसना टोलमुक्ती देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही १ जून २०१५ पासून घेण्यात आला. राज्यातील पर्यावरण चांगले राखण्याबरोबरच उद्योगवाढीसाठी पायाभूत सुविधांवर भर दिला आहे. गेल्या वर्षभरात सार्वजनिक बांधकाम खात्याने रस्त्यांच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले आहे. सर्वसामान्य नागरिक केंद्रस्थानी ठेवून विभागांची वाटचाल सुरू आहे.

**शब्दांकन: जयश्री कोल्हे** ■■

# महाराष्ट्र@ दिल्ली










CHIEF MINISTER
UTTARAKHAND
CHIEF MINISTER
CHIEF MINISTER







पहिलं पाऊल वचनपूर्तीचे

१५ वर्षे आधीची
एकच वर्ष आत्ताचे



गेल्या वर्षभरात महाराष्ट्रातील विविध नेत्यांनी दिल्लीला भेट दिली. राज्याचे विविध प्रकल्प मार्गी लावण्याबरोबरच आर्थिक तरतूदी आणि केंद्रीय विभागांकडून मान्यता मिळवण्यात या नेत्यांना यश आले. या नेत्यांच्या दिल्ली भेटीतील काही क्षणचित्रे...























### एक वर्ष महासंचालनालयाचे

# गतिमान आणि स्मार्ट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत नुकतीच एका वृत्तवाहिनीवरून प्रसारित झाली. प्रश्नकर्त्यांचा शेवटचा प्रश्न होता की, गेल्या वर्षभरात त्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा संस्मरणीय क्षण कोणता? श्री. फडणवीस उत्तरले, या राज्याचा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली तो क्षण...

तो क्षण संपूर्ण महाराष्ट्राने अनुभवला. तो दिवस होता, ३१ ऑक्टोबर २०१४. महाराष्ट्रात एका नव्या सुशासन आणि प्रशासनाचा प्रारंभ या दिवशी झाला. श्री. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवे सरकार स्थापन झाले.

३१ ऑक्टोबर २०१५ला या सरकारला एक वर्ष पूर्ण होत आहे. या वर्षभरातील सरकारच्या कामगिरीच्या प्रत्येक क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला लाभले. शिवाय हे क्षण गतीने टिपून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यात महासंचालनालयाची हक्काची माध्यमे यशस्वी झाली.

याचा प्रारंभ ३१ ऑक्टोबर २०१४ ला झाला. मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या शपथविधीच्या सोहळ्याच्या सर्व माध्यमातून प्रसिद्धीची जय्यत तयारी महासंचालयाने केलीच. पण नव्या मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर पहिली मुलाखतसुद्धा महासंचालनालयालाच मिळायला हवी, याची एक सुव्यवस्थित व्यूहनीतीही आखली गेली. या व्यूहनीतीस यश मिळाले. नव्या मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतरचे काही पूर्वापार चालत आलेले संकेत बाजूला सारून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाच्या विशेष मुलाखतीसाठी विधिमंडळ परिसरात आले. महाराष्ट्रात जशी नव्या पर्वाची सुरुवात झाली होती, तशीच ही घटना महासंचालनालयाच्या इतिहासात नवा अध्याय लिहून गेली. नव्या मुख्यमंत्र्यांची पहिली मुलाखत घेण्याचा मान महासंचालनालयास मिळाला.

नव्या सरकारसाठी आम्ही, 'परिर्वतन घडत आहे', हा विषय निश्चित केला आणि त्यानंतर जाहिराती, जाहिरात फलक आणि लोकराज्यमधून या विषयावर लक्ष केंद्रित केले गेले. वर्षभर महासंचालनालयाची सर्व माध्यमे या परिवर्तनाची साक्षीदार राहिली.

औद्योगिक क्षेत्र, गुंतवणूक आणि पायाभूत सुविधांमध्ये महाराष्ट्राला एका नव्या उंचीवर नेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी पहिल्याच महिन्यात, 'मेक इन महाराष्ट्रची' घोषणा केली. त्यानुसार विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचा त्यांनी धडाका लावला. 'मेक इन महाराष्ट्र' या उपक्रमास ठशठशीतपणा देण्याचे टीम लोकराज्यने ठरवले. त्यानुसार 'मेक इन महाराष्ट्र'चा लोगो प्रदर्शने शाखेने तयार केला. हा लोगो नंतर या उपक्रमाची ओळख बनला.

मुख्यमंत्र्यांनी प्राधान्य दिलेल्या 'जलयुक्त शिवार' या योजनेची प्रभावी प्रसिद्धी लोकराज्य/महाराष्ट्र अहेड, जय महाराष्ट्र (दूरदर्शन), दिलखुलास (आकाशवाणी) महान्यूज (वेबपोर्टल) यामधून केली गेली. जलयुक्त शिवार अभियानाची सुरुवात, यंदाच्या पावसाळ्यात त्याची सिद्ध झालेली उपयुक्तता या सर्व माध्यमांनी अचूकरीत्या टिपली. अनेक जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी यावर यशकथा लिहून वृत्रपत्रादी माध्यमांमधून त्याचे महत्त्व जनमानसांवर बिंबवले. ही मोहीम लोकचळवळ होण्यासाठी पार्श्वभूमी तयार केली. टीम लोकराज्यने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष जाऊन यावर विस्तृत कव्हर स्टोरी(मुखपृष्ठ कथा) तयार केली. 'महान्यूज' या आमच्या वेबपोर्टलनेही यावर लक्ष केंद्रित केले. या विषयावरील वृत्तचित्र शाखेने तयार केलेले जिंगल्स आकर्षक आणि प्रभावी ठरले. महाराष्ट्रातील गुंतवणुकीत वाढ





व्हावी, नवे उद्योग येऊन रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या विपुल संधी निर्माण व्हाव्यात, यासाठी मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सर्व परदेश दौऱ्यांचे वृत्तांकन, वृत्तकथा आमच्या सर्व माध्यमांनी प्रभावीरीत्या महाराष्ट्रात पोहचवल्या. लोकराज्य/महाराष्ट्र अहेडचा या विषयावरील 'महा-उद्योग-राष्ट्र' हा विशेषांक गाजला. उद्योगमंत्र्यांची यासंदर्भातील विशेष मुलाखत 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात प्रसारित केली गेली. 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' या संकल्पनेची अधिकाधिक प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी महान्यूज/जय महाराष्ट्र/ दिलखुलास आणि लोकराज्य व महाराष्ट्र अहेडने विशेष प्रयत्न केले. लोकराज्य व महाराष्ट्र अहेडने या विषयावर, 'घडत आहे सुंदर स्वच्छ

## सिंहस्थ पर्वणी

**नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्याच्या प्रभावी प्रसिद्धीने महासंचालनाच्या यशात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. नाशिक विभागीय माहिती कार्यालय आणि माहिती कार्यालयाने या कुंभमेळ्याच्या प्रसिद्धीसाठी केलेले सर्व प्रयत्न अत्यंत यशस्वी ठरले. शाही स्नानाची पर्वणी थेट प्रक्षेपित करण्यासाठी पहिल्यांदाच मल्टी कॅमेरा कार्यप्रणाली बसवण्यात महासंचालनालयाने पुढाकार घेतला. त्यामुळे तिन्ही शाही स्नानाचे थेट प्रक्षेपण अनेक वाहिन्यांवरून एकाच वेळी होऊ शकले. कॅमेऱ्यांची अनावश्यक गर्दी टाळता आली.**


महाराष्ट्र' या विषयावर विशेषांक काढला. प्रदर्शन शाखेने 'स्वच्छतेची सप्तपदी' याचा देखणा आणि प्रभावी लोगो तयार करून, तो जाहिराती आणि जाहिरात फलकांद्वारे जनतेच्या मनावर ठसवला. वृत्तचित्र शाखेने या विषयावर तयार केलेल्या वृत्तपटाने या विषयाचे गांभीर्य उपस्थितांच्या मनावर ठसवले. मुख्यमंत्र्यांनी चार ठिकाणी स्वच्छतेच्या सप्तपदीची शपथ लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांना दिली.

स्वच्छता अभियानाच्या वातावरण निर्मितसाठी अतिशय उपयुक्त ठरणाऱ्या या उपक्रमास संबंधित जिल्हा माहिती कार्यालयने उत्कृष्टरीत्या प्रसिद्धी दिली. या कार्यक्रमाच्या देखण्या आणि आकर्षक बॅनर्स आणि बॅक ड्रॉप्सचीही निर्मिती प्रदर्शने शाखेने केली.




### आम्ही डिजिटल

नव्या सरकाचे आगमन हे परिवर्तन आणि गतिमानतेचे प्रवर्तक ठरले. हीच गतिमानता महासंचालनालयाने आपल्या कामकाजात आणली. नव्या समाजमाध्यमांचा प्रभावी उपयोग हा या वर्षभरात उल्लेखनीय ठरला. अनेक जिल्हा माहिती कार्यालयांचे फेसबूक पृष्ठ तयार झाले. काही जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी ट्वीटरचाही उपयोग सुरू केला. महासंचालनालयाचे विविध व्हॉट्स ॲप ग्रुप हे तर क्रांतीकारी ठरले. या ग्रुप्सनी महासंचालनायची कनेक्टिव्हिटी कल्पनातीत वाढली. 'सीएम न्यूज' हा 'व्हॉट्स ॲप' ग्रुप म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाला गतिमानतेने प्रसिद्धी देणारा, छायाचित्रे पुरवणारा आणि माहिती देणारा ग्रुप ठरला. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या फेसबूक पेजेस आणि ट्वीटरवर तत्काळ माहिती आणि छायाचित्रे येऊ लागली. सर्वच जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी स्थानिक पत्रकार/अधिकारी/गणमान्य व्यक्ती यांचे स्थानिक गट तयार केले आहेत. त्यामुळे सर्व प्रकारची माहिती, छायाचित्रे त्यांच्यापर्यंत तत्काळ पोहोचू लागली आहेत. माहिती संपर्कतेची नवी डिजिटल क्रांती महासंचालनालयाने अतिशय प्रभावीरीत्या घडवून आणली आहे. विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर आणि महासंचालक चंद्रशेखर ओक यांच्या नेतृत्वाखाली शासन आणि जनतेमधील प्रभावी दुवा होण्याची कामगिरी यशस्वीरीत्या बजावली आहे.















**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ट्विटर या समाज माध्यमाचा अतिशय प्रभावीरीत्या उपयोग करतात. सर्व महत्त्वाच्या घटना, घडामोडी यावर तत्काळ प्रतिक्रिया देतात. शासनाचे सर्व महत्त्वाचे निर्णय, योजना यांची माहितीही ते ट्विटरद्वारे देतात. गेल्या वर्षभरातील त्यांच्या काही महत्त्वाच्या ट्विट्सचा आढावा...**




मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली त्या दिवशीच्या त्यांच्या भावना व्यक्त करताना ते म्हणतात...

Got Blessed by My Mother yesterday before taking Oath as CM of Maharashtra. Feeling Inspired on 1st day of working.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधीनंतर पहिल्यांदाच गडचिरोलीला भेट दिली तेव्हा...

I chose Gadchiroli as my 1st visit to rural area to build up the confidence of my officers & to increase tribal community's faith in Govt.

छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारायचे हे अवघ्या महाराष्ट्राचे स्वप्न. या प्रकल्पातील अडथळे दूर झाल्यानंतर मुख्यमंत्री म्हणतात...

MoEF - GoI has given clearance for Chhatrapati Shivaji Maharaj Memorial in the Arabian Sea at ...Mumbai. Thank you @PrakashJavdekar ji.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंशदानित सिलेंडर न घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांनाही अंशदानित सिलेंडर न घेण्याचे आवाहन केले.

I surrender my subsidised LPG Connection & urge all Ministers in State to use non subsidised LPG. Great initiative by Hon @dpradhanbjpji.

केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी रेल्वे अर्थसंकल्प लोकसभेत मांडल्यानंतर त्यांचे अभिनंदन करताना

गेल्या अनेक वर्षांनंतर एक प्रगतिशील, आधुनिक आणि वास्तविकतेचे भान राखणारा हा रेल्वे अर्थसंकल्प आहे. मा. सुरेश प्रभूजींचे आभार !

'स्वच्छ भारत' अभियानाच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'स्वच्छ महाराष्ट्र' अभियानाची सुरुवात करण्यात आल्यानंतर...

Maharashtra Government decides to implement Swachh Maharashtra all across Maharashtra, in Mission Mode, on the lines of Swachh Bharat.

घरांबाबत आश्वासित करताना..

We are working hard for housing for all. By 2022 no one in Maharashtra will be homeless.

अरुणा शानबाग यांच्या झुंजीला सलाम...

Maharashtra Government decides to give Late Aruna Shanbaug's name to Nursing Training School, Thane. Our infinite salutes to her spirit !

At Pandharpur since evening for Wari and various programs. The atmosphere here is full of enthusiasm & With hunam chants! Jai Hari Vithhal !

लघुउद्योगांना आव्हाने स्वीकारण्याचे आवाहन करताना..

Small scale enterprises must convert their challenges into opportunities &enter the present day competition.It helps in nation's growth too.

## ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटांसोबत 'ब्रेक फास्ट'

**Had a breakfast meeting with @RNTata2000 ji this morning. I thank for his valuable insight to take Maharashtra forward**




सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता
यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप ४० लाख वाचक
ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in
रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२४१०
राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार,
सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम
لوک راجیہ
उर्दु लोकराज्य
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
जय महाराष्ट्र
नाबाद...८०० भाग
दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.१५ ते ८ या वेळेत
प्रसारित होणारा कार्यक्रम
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@१ कोटी ६८ लाख
www.mahanews.gov.in
MAHARASHTRA
Ahead
English Magazine
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
http://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th November 2015
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य




**सर्वाधिक खपाचे मासिक**

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक